रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८७ । अंक ३२६ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. ३ मे २०२४

किंमत ४ ₹

## ‘आरक्षणाबाबत मोदींचा खोटा प्रचार’

**कोल्हापूर :** काँग्रेस सत्तेत आल्यास तुमच्या दागिन्यांचे ऑडिट होईल, स्वकमाईच्या संपत्तीचे अल्पसंख्याकांना वाटप होईल, वारसा कर लावला जाईल, ओबीसी, एससी, एसटीचे आरक्षण बदलले जाईल, असा खोटा प्रचार पंतप्रधान नरेंद्र मोदी करत आहेत. ज्या गोष्टी काँग्रेसच्या जाहीरनाम्यातच नाहीत, काँग्रेसचा कोणी नेता तसे बोललेला नाही, अशा खोट्या गोष्टी सांगून मोदी जनतेत संभ्रम निर्माण करत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कोल्हापूर येथे पत्रकार परिषदेत केला. दहा वर्षे सत्तेत असणाऱ्या मोदी आणि भाजपने असला खोटा प्रचार करण्याचे सोडून त्यांनी केलेल्या पान ५ वर

## ‘एमआयएम दंगलीच्या तयारीत’

**छत्रपती संभाजीनगर :** महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा प्रचार सुरू केल्यानेकही टवाळखोरांनी संबंधिताच्या दालनावर दगडफेक केली होती. त्यावरून आरोप, प्रत्यारोप होत आहेत. यावरून चंद्रकांत खैरे आणि इम्तियाज जलील आमने- सामने आले आहेत. एमआयएम शहरात दंगली करण्याच्या तयारीत आहे. शहरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा गंभीर आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी केला. शहरात सोमवारी एका भागात दुकानावर दगडफेकीची घटना घडली. या पार्श्वभूमीवर बोलताना खैरेंनी हा आरोप केला. शहरात शांतता प्रस्थापित करण्याचा दृष्टिकोन ठेऊन पान ५ वर

# वारं फिरलंय, जनतेचं ठरलंय

## महाडमधील सभेत सुषमा अंधारेंची जोरदार फटकेबाजी

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ पोलादपूर व महाडमध्ये गुरुवार (दि.२) प्रचारसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी मोदी सरकारसह भरत गोगावले, नारायण राणे यांच्यासह, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, सुनील तटकरे व महायुतीतील नेत्यांवर जोरदार फटकेबाजी केली.

यावेळी महाडच्या माजी नगराध्यक्षा स्नेहल जगताप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल नवगणे, शिव विचारवंत सुभान अली शेख, धनंजय देशमुख, तृप्ती रत्नपारखी, संदीप जाधव, सूर्यकांत शिलीमकर, नानासाहेब जगताप, सुरेश कळमकर, विनिता वर्फे, गजानन अधिकारी, गोपीनाथ ढोकळे,




चेतन पोटफोडे यांच्यासह इंडिया आघाडीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे सुषमा अंधारे म्हणाल्या की, गेल्या दोन दिवसांपासून ज्या प्रचारसभा पाहिल्या त्यावरुन ही निवडणूक जनतेनं हातात घेतली असल्याचं दिसून आलं. सध्या वातावरण फिरलंय, जनतेचं ठरलंय असंच चित्र पहायला मिळत आहे. महायुतीच्या सभांमधील भाषण ऐकल्यावर एक मुद्दा वारंवार बोलला जात आहे. मोदींना पंतप्रधान करायचंय. यासाठी ज्यांना १०/१२ जागा मिळाल्या ते ही ४८ जागांचा प्रचार करतात, ज्यांना चारच जागा मिळाल्या ते ही ४८ जागांचा प्रचार करतात, जानकर साहेबांना एकच जागा मिळाली ते ही ४८ जागांचा प्रचार करतात. आणि इंजिनवाल्या दादांना जागाच नाही, ते ही ४८ जागांचा प्रचार करतात. पान ५ वर

### तटकरेसाहेब उत्तर द्या

- स्मार्ट सिटीचं काय झालं?
- आदर्श ग्रामयोजनेचं काय झालं?
- १०० टक्के शौचालय पूर्ण होणारे जिल्हे दाखवा?
- १०० कि.मीचा रस्ता पूर्ण होणारी राज्ये कोणती?
- जनधन खात्यात १५ लाख जमा होणाऱ्या ९ बँका कोणत्या?
- नव्याने विजनिर्मिती प्रकल्प सुरु होणारी ९ क्षेत्रे कोणती?
- मुलांना सरकारी शाळेत शिकविणारे ९ मंत्री कोण?
- ईडीची धाड पडलेले भाजपचे ९ नेते सांगा?
- शेतकऱ्यांनी आत्महत्या न झालेले ९ जिल्हे कोणते?
- गंगेचं स्वच्छ केलेले ९ कि.मी. चे सलग क्षेत्र कोणते?
- १०० टक्के सिंचन पूर्ण झालेले ९ जिल्हे कोणते?

### चहापेक्षा किटली गरम

आजकाल नेत्यांपेक्षा त्यांचे भक्तुल्ले जास्त उडत आहेत. नेत्याच्या सांगण्यावरुन भाष्य करीत आहेत. चहापेक्षा किटली गरम अशी अवस्था झाली आहे. मात्र अशा किटल्यांचा योग्य तो बंदोबस्त लावणं आम्हाला बरोबर जमतं. मातोश्रीचा हात डोक्यावर होता, म्हणून मान होता. मात्र आता चक्रवाढ व्याजासह परतफेड करु, असा सज्जड इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी नाव न घेता गोगावले आणि तटकरेंच्या कार्यकर्त्यांना भरला.

### आदितीताई...सुनील तटकरेंच्या जीवावर उडायचं नाही

आदितीताई या सुनील तटकरेंच्या जीवावर बोलतात. त्यांच्या पाठबळामुळे त्यांच्यात बळ येतं पण सुषमा अंधारे स्वतःच्या ताकदीवर बोलते. खरं सांगायचं तर कळप लांडग्यांचे असतात, वाघिण एकटीच येते आणि लढतेही, असा टोला सुषमा अंधारे यांनी आदिती तटकरे यांना लगावला.

# अनुदानाच्या नावाने मतदारांना पैशाचे अमिष

## माजी आ. पंडित पाटील यांचा आरोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग - विरार प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबादला देण्यास सरकारने टाळाटाळ केली होती. निवडणुकीच्या हंगामातच सुमारे दोनशे कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्याच्या हालचाली जिल्हा प्रशासनाच्या सुरु आहेत. सत्ताधारी अनुदानाच्या नावाने मतदारांना पैशाचे अमिष दाखवित असल्याचा आरोप माजी आ. पंडित पाटील यांनी केला आहे.



रायगड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीच्या प्रचारतोफा पाच मे रोजी संपणार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना मतदारांकडून प्रचाराच्या दरम्यान उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. महाडपासून श्रीवर्धन, पेण, अलिबाग, श्रीवर्धन,मुरूड अशा अनेक तालुक्यांमध्ये गीतेंचे स्वागत जल्लोषात केले जात आहे. गीतेंना प्रचारात मिळत असलेल्या प्रतिसादामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील तटकरे अडचणीत सापडले आहेत. मते मिळविण्यासाठी ते फोडाफोडीचे काम करीत असतानाच सत्तेवर असलेले तटकरे प्रशासनावर दबावदेखील टाकत असल्याची चर्चा सध्या जोरात रंगत आहे. अलिबाग - विरार कॉरिडॉरच्या प्रकल्पाबाबत जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांना त्यांचा मोबदला मिळावा यासाठी त्यांनी अनेक वेळा आंदोलने केली. मात्र त्यांना मोबदला देण्यास टाळाटाळ करण्यात आली. पनवेलचे उपविभागीय अधिकारी यांनी सुमारे दोनशे कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्याची हालचाल सुरु केली असल्याचा आरोप पंडित पाटील यांनी केला. याबाबत जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याशी संपर्क साधला, मात्र होऊ शकला नाही.

**आजचा अग्रलेख**

**तोंड लपवून लढाई**

**वे|धा|क**

### महिला आयोगातून २२३ कर्मचाऱ्यांची हकालपट्टी

**नवी दिल्ली :** नियुक्ती प्रक्रियेत अनियमितता असल्याचे कारण देत दिल्लीच्या महिला आयोगात मोठी घडामोड घडली आहे. माजी अध्यक्ष स्वाती मालीवाल यांच्या कार्यकाळात नियुक्त करण्यात आलेल्या २२३ महिला कर्मचाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. दिल्लीचे राज्यपाल व्ही.के. सक्सेना यांनी या निलंबनाबाबत आदेश दिले आहेत. दिल्ली महिला आयोगाच्या तत्कालीन अध्यक्षा स्वाती मालीवाल यांनी नियमांच्या विरोधात जाऊन परवानगी न घेता त्यांची नियुक्ती केली होती, असा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर नायब राज्यपालांनी २०१७ मध्ये महिला आयोगाच्या बेकायदेशीर नियुक्ती आणि अनियमिततेच्या मुद्द्यांची तपासणी करण्यासाठी एक समिती स्थापन केली. पान ५ वर

# उन्हाच्या कहराने मतदानाचा वेळ वाढवणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

देशात सध्या राजकीय वातावरण तापलं आहे. कारण, लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. दुसरीकडे, तापमानात देखील प्रचंड वाढ झाली आहे. सूर्य अक्षरशः आग ओकत असल्याने लोकांना घराच्या बाहेर पडणेदेखील कठीण झाले आहेत. कडक उन्हाच्या परिणाम मतदानावर पडत आहे. त्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोग सतर्क झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, निवडणूक आयोगाने बिहारनंतर आता तेलंगणामध्येदेखील मतदान करण्याचा वेळ वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. १३ मे रोजी चौथ्या टप्प्यातील मतदान पार पडणार आहे. तेलंगणा लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका याच दिवशी होणार आहेत. तेलंगणामध्ये मतदानाची वेळ सकाळी सात पासून सायंकाळी पाच वाजेपर्यंत होती. पण, ती वाढवून सकाळी सात ते सायंकाळी सात वाजेपर्यंत करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या तापमान अहवालाची दखल केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतली आहे.



### निवडणूक आयोग झाला सतर्क

एका नोटीसमध्ये आयोगाने म्हटलंय की, तेलंगणातील १२ लोकसभा मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघात सकाळी सात ते सायंकाळी सात वाजेपर्यंत लोकांना मतदान करता येणार आहे. यात करीमनगर, निजामाबाद, झहीराबाद, मेडक, मलकाजगिरी, सिकंदराबाद, हैदराबाद, चेवेल्ला, महबूबनगर, नगरकुर्नूल, नलगोंडा आणि भोंगीर या मतदारसंघाचा समावेश असेल.

दरम्यान, राज्यात सध्या दोन टप्प्यातील मतदान पार पडले आहे. तिसऱ्या टप्प्यातील मतदान ७ मे रोजी पार पडणार आहे. सध्या उन्हाचा कडाका वाढला असल्याने लोक मतदान करण्यासाठी बाहेर पडत नाहीत अशी तक्रार आहे. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी निवडणूक आयोग प्रयत्न करत आहे.

# क्रिकेटच्या वादातून मृत्यू;आरोपीला जन्मठेप

**। माणगाव । वार्ताहर ।**

- **दीड लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश**
- **सरकार पक्षातर्फे तपासले दहा साक्षीदार**

क्रिकेट खेळत असताना वाईड बॉलवरून दोन तरुणांत शाब्दिक वाद निर्माण झाला होता. या वादाचा राग मनात धरून आरोपी गणेश खेरटकर याने विनोद बामणे याच्या डोक्यात बॅटने जबर मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या विनोद बामणे याचा मृत्यू झाला होता. माणगाव सत्र न्यायालयाने आरोपी गणेश खेरटकर याला दोषी ठरवत जन्मठेपची शिक्षा सुनावली आहे; तर मृत तरुणाच्या कुटुंबियांना दीड लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

विनोद बामणे खूनप्रकरणाचा तपास रोहा पोलिस ठाण्याचे तत्कालीन पोलिस निरीक्षक संजय धुमाळ यांनी केला होता.

त्यांनी आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. न्यायालयात सरकार पक्षातर्फे एकूण १० साक्षीदार तपासण्यात आले. पुराव्यामध्ये प्रत्यक्षदर्शी साक्षीदार गणेश बावकर, वैद्यकीय पुरावा, पंचांच्या साक्षीचा पुरावा सत्र न्यायाधीश हर्षल भालेराव यांनी ग्राह्य धरून आरोपी गणेश खेरटकर याला विनोद बामणे खूनप्रकरणी दोषी ठरवून त्याला अजन्म कारावासाची (जन्मठेप) शिक्षा ठोठावली.

या शिक्षेबरोबर द्रव्यदंड म्हणून २५ हजार रुपये व मृत तरुणाची पत्नी व तिची मुलगी यांना दीड लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश माणगाव सत्र न्यायालयाने दिले आहेत. फिर्यादीच्या वतीने वकील सतीश म्हात्रे व आरोपी गणेश खेरटकर याच्या वतीने वकील मनोजकुमार शिंदे यांनी काम पाहिले. रोहा तालुक्यातील पिंगळसई गावात काही तरुण २२ जून २०१४ रोजी पान ५ वर

# उन्हेरे धरणात तरूणाचा मृत्यू

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील उन्हेरे येथील धरणामध्ये बुडून डोंबिवली येथील तरुणाचा मृत्यू झाला आहे. गुरुवारी (ता.२) दुपारी दीड वाजता गुरुनाथ साठीलकर यांच्या अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी या तरुणाचा मृतदेह बाहेर काढला

याबाबत सविस्तर माहिती अशी की अविनाश दिनेश विचारे (वय २९) राहणार डोंबिवली हा आपल्या मित्रांसमवेत पान ५ वर

# विजयाचा गुलाल गीतेंचाच

## माजी आ. पंडित पाटील यांना विश्वास

**। पेण । प्रतिनिधी ।**

तटकरे शेतकरी कामगार पक्षाला छोटा पक्ष हिणवतात पण या छोट्या पक्षाच्या जोरावरच आपण खासदार झाला होतात. याचा विसर त्यांना पडला आहे. आता हा छोटा पक्षच आपल्याला खासदार होऊ देणार नाही. रायगड जिल्हा हा पुरोगामी विचारसरणीवर चालणारा जिल्हा आहे. कोणत्याही लाटेवर हा जिल्हा चालत नाही. अनंत गीते हेच ४ जूनला फटाके वाजवतील आणि गुलाल ही उधळतील, असा



विश्वास शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार पंडित पाटील यांनी व्यक्त केला.

माजी आमदार पंडित पाटील यांनी गुरूवारी पेण येथील इंडिया आघाडीच्या कार्यालयाला भेट देऊन प्रचार कार्यक्रमाचा आढावा घेतला. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, गेल्या ५ वर्षात सुनील तटकरे खासदार पान ५ वर

# आज आदित्य ठाकरे मुरुडमध्ये

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील निवडणूकीच्या प्रचारार्थ इंडिया आघाडीच्या वतीने प्रचार वेगाने सुरु आहे. मुरुडमध्ये शुक्रवारी (दि. ०३) इंडिया आघाडीची प्रचार सभा आयोजित केली आहे. यावेळी शिवसेनेचे युवा नेते माजी मंत्री आदित्य ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.



यावेळी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, आ. संजय पोतनीस, शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शिवसेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे आदी इंडिया आघाडीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. अनंत गीते यांच्या प्रचाराच्या निमित्ताने आदित्य ठाकरे यांचे आगमन होताच त्यांचे जल्लोषात स्वागत केले जाणार आहे. रॅली काढली जाणार आहे.

# मंदिरे लुटणारी टोळी गजाआड



## रायगडमधील खोपोली पोलिसांची कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मंदिरे लुटणाऱ्या टोळीला रायगडच्या खोपोली पोलिसांनी गजाआड केले. शिलफाटा-खोपोली येथील हनुमान मंदिर व बहिरी देव मंदिरातील चोरीचा गुन्हा उघडकीस करण्यात त्यांना यश आले. ही टोळी आंतरराज्यीय असून त्यांच्याकडून मंदिर चोरीची आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असल्याची माहिती पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.

खालापूर तालुक्यातील खोपोली परिसरातील बहिरी देव आणि हनुमान मंदिर ही दोन मंदिरे चोरट्यांनी आठवड्यांनी फोडली.मंदिरामधील दानपेटीतील असलेली रोकड लंपास करून ते गायब झाले होते. एकूण अठरा हजार रुपयांची रोकड चोरण्यात आली होती. याप्रकरणी खोपोली पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. खोपोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शितल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुजित गडदे, पोलीस उपनिरीक्षक अभिजीत व्हरांबळे, पोलीस हवालदार सागर शेवते, पी. व्ही. पाटील, पी. टी. कुंभार, व्ही. व्ही. जाधव, पोलीस नाईक पी.एल. भालेराव, एल.जी. शेडगे, एस.पी. बांगर, पोलीस शिपाई आर. एस. मासाळ, पी. एम. कळमकर, पी. एस. खरात, के. डी. देवकाते या पथकाने शोध सुरु केला. पान ५ वर

संपूर्ण मनःशांतीसाठी कंपनी-फिट CNG
Hyundai कंपनीच्या CNG कार अस्सल वॉरंटी, वर्धित सुरक्षा आणि उत्कृष्ट कार्यप्रदर्शन युक्त
Grand i10 NIOS लाभ ₹ 48 000* पर्यंत
AURA लाभ ₹ 33 000* पर्यंत
EXTER लाभ ₹ 10 000* पर्यंत




शक्तिशाली आणि पर्यावरणास अनुकूल पॉवरट्रेन
खास ट्यून केलेले सस्पेन्शन
सुपीरियर CNG टाकी क्षमता Grand i10 NIOS: 60 l (पाणी समतुल्य) AURA : 65 l (पाणी समतुल्य)
कॉम्पॅक्ट आणि टिकाऊ इंजेक्टरसह शांत केबिन
डबल स्टेज CNG रेग्युलेटर सह सुरळीत ड्रायव्हिंग
RDE अनुरूप आणि E20 इंधन तयार असलेले
HYUNDAI

3 YEAR 1 00 000km** Warranty Coverage
UPTO 7 YEARS Extended Warranty^
3 YEAR Unlimited** Kilometer Warranty
3 YEARS Road Side Assistance (RSA)#
UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package
UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package

*For CSD, Government and Corporate Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565

Give a missed call on 9555295868
my Hyundai app
Hyundai Promise Certified Pre-Owned Car
Hyundai Cl!ck to Buy Scan here

*Terms & Conditions apply. Benefits include cash discount, exchange bonus and benefits for government or corporate employees, whichever is applicable. Benefits may vary with variants and are subject to change without prior notice. **3-year warranty or upto 1 00 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N line. 3-year unlimited km warranty is applicable for VENUE, VENUE N Line, CRETA, ALCAZAR, TUCSON, VERNA, KONA Electric and IONIQ 5. ^Upto 7 years extended warranty is applicable only for petrol variants. HMIL reserves the right to withdraw/modify the scheme without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.

शरयू ह्युंदाई पेण वडखळ, Ph: 091679 50080, 080473 63111
विशाल ह्युंदाई पनवेल, Ph: 084228 10904 अलिबाग, Ph: 084228 10907




## वेधक

### आबा बागूल करणार धंगेकरांचा प्रचार

**पुणे :** पुण्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आबा बागुल यांचे बंड अखेर थंड झालं आहे. पुणे लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसने आपल्याला उमेदवारी द्यावी, अशी बागुल यांची इच्छा होती. त्यामुळे रविंद्र धंगेकरांना उमेदवारी जाहीर झाल्याने ते नाराज झाले होते. यासाठी त्यांनी काँग्रेस भवनात उपोषणही केले होते. पण आता त्यांनी आपल्या भूमिकेवरुन युटर्न घेतला आहे. आमची नाराजी नव्हती, आम्ही काँग्रेसचेच आहोत, निष्ठावान आहोत. आम्ही पक्षश्रेष्ठींपर्यंत आमचे म्हणणे मांडत होतो. आमचे म्हणणे ऐकून घ्या, आमच्यातही काहीतरी क्वॉलिटी आहे. हेच आम्ही त्यांना सांगत होतो, असं आबा बागुल यांनी सांगितले.

### ३८ उमेदवारांची ३८ चिन्हे

**जळगाव :** जळगाव व रावेर लोकसभा मतदारसंघात एकूण ३८ उमेदवार रिंगणात आहेत. प्रत्येकाला वेगवेगळी चिन्हे मिळाली आहेत. जळगाव मतदारसंघात १४ उमेदवारांची १४ चिन्हे, तर रावेर मतदारसंघात २४ उमेदवारांची २४ चिन्हे आहेत. ही चिन्हे कशी लक्षात ठेवावीत, असा प्रश्न मतदारांसमोर आहे. एका उमेदवाराची प्रचार फेरी घराकडून गेली, की दुसरी, मग तिसरी, अशा एका पाठोपाठ एक प्रचार फेऱ्या निघत असल्याने मतदारांची चांगलीच करमणूक होत आहे. मात्र, एवढे चिन्हे लवकर लक्षात ठेवणे कठीण आहे. उमेदवारही आवर्जुन

मतदार भेटीत आपल्या नावाचा कागद, चिन्ह देऊन अमूक चिन्हाकडे लक्ष द्या, असे सांगत आहेत.

### नाशिकमध्ये मशाल पेटवून घोषणाबाजी

**नाशिक:** महायुतीची प्रचारफेरी शालिमार भागातील ठाकरे गटाच्या कार्यालयासमोरून जात असताना कार्यकर्त्यांनी मशाल पेटवून '५० खोके, सबकुछ ओके', 'आवाज कुणाचा' अशा घोषणा देत शिंदे गटाचे उमेदवार हेमंत गोडसे यांचा निषेध केला. नाशिक मतदारसंघात निष्ठावंत विरुद्ध गद्दार अशी लढाई असल्याकडे संबंधितांनी लक्ष वेधले. पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेऊन तणाव निर्माण होणार नाही, याची खबरदारी घेतली. या मुद्यावरून एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाकडे कुठलेही काम राहिले नसल्याचे टिकास्त्र सोडले.

# मोदींची हुकूमशाही किती दिवस सहन करणार

## काँग्रेस उमेदवारासाठी शरद पवार निपाणीत

**। निपाणी । प्रतिनिधी ।**

मोदी सरकार विविध आश्वासने देऊन सत्तेवर आले. पण, एकाचीही पूर्तता केली नाही. विरोधकांना संपविण्यासाठी कुठल्याही थराला ते गेले आहेत. दिल्लीत उत्तमरीतीने सरकार चालविले जात असताना, मोदींनी अरविंद केजरीवाल यांना कारागृहात पाठवले. त्यामुळे मोदींची वाटचाल हुकूमशाहीकडे सुरू आहे, त्यामुळे त्यांची हुकूमशाही किती दिवस सहन करणार, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.

चिक्कोडी लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार प्रियंका जारकीहोळी यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे उत्तम पाटील यांच्या नेतृत्वाखाली निपाणीत बुधवारी (दि.१) सभा झाली. त्यावेळी ते बोलत होते.



शरद पवार म्हणाले, भाजपने विविध प्रकारची अस्त्रे वापरून विरोधकांना अडकवण्याचे काम सुरू ठेवले आहे. शिवाय जनतेला भूलथापा देण्याचे कामही बंद नाही. याउलट राज्यातील काँग्रेस सरकारने सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि गरिबांसाठी पंचहमी योजना अंमलात आणल्या आहेत. तरुणांकडे मोठी ताकद असून, त्यांना मोदी सरकार दुष्ट प्रवृत्तीकडे घेऊन जात आहे. परिणामी, देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पुढील काळात घटक पक्षांनी एकत्र येऊन मोदी सरकारला उलथवणे गरजेचे आहे.

पुढे ते म्हणाले, देशातील यावेळच्या निवडणुकीकडे जगातील लोकांचे लक्ष लागले आहे. अनेक देशांतील लोक निवडणूक वातावरण पाहण्यासाठी आलेले आहेत.

२०१४ मध्ये पहिल्यांदा ते सत्तेवर आले. त्यावेळी ते ५० दिवसांत पेट्रोलचे दर कमी करणार होते. आता मोदी यांची सत्ता येऊन ३६५० दिवस झाले तरी, पेट्रोलचे दर कमी झाले नाहीत. आज पेट्रोलचे दर शंभरावर आहेत. विरोधक संपवून देशात एकाधिकारशाही करण्याचे त्यांचे कारस्थान आहे. लोकशाही या लोकांना पसंत नाही, हे त्यांच्या कृतीतून दिसून येते, असाही टोला त्यांनी लगावला.

# मनसेचे इंजिन माढ्यात कधी धावणार

**। गोंदवले । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने भाजपला पाठिंबा देण्याचा निर्णय पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी घेतला आहे. त्यानुसार सातारा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्यासाठी मनसेचे इंजिन सुसाट झाले आहे; परंतु माढा मतदारसंघात मात्र, सातारा जिल्ह्यातील मनसेची भूमिका अद्यापही गुलदस्त्यातच असल्याचे पाहायला मिळत आहे.

लोकसभेच्या माढा मतदारसंघाबाबत देशात आणि राज्यात चर्चा आहे. माढा मतदारसंघाची निर्मिती झाल्यावर पहिल्यांदाच येथून राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार निवडून गेले



होते. तेव्हापासून हा मतदारसंघ देशपातळीवर लक्षवेधी ठरला. यावेळच्या लोकसभा निवडणुकीतही या मतदारसंघावर सर्वांचे लक्ष आहे.

या वेळी भाजपचे रणजितसिंह नाईक निंबाळकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) धैर्यशील मोहिते पाटील यांच्यात लढत होत आहे. दोन्हीही पक्षांचे मित्रपक्ष निवडणुकीच्या प्रचारासाठी प्रयत्न करत असल्याचे पाहायला मिळत आहे. कऱ्हाड येथे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभेसाठी मोठ्या संख्येने कार्यकर्ते नेऊन मनसेने शक्तिप्रदर्शन केले; परंतु, मनसे माढा मतदारसंघात अद्याप चार्ज न झाल्याने संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

विधानसभेच्या माण-खटाव व फलटण मतदारसंघांत मनसेचे सुमारे अठरा ते वीस हजार मतदार असल्याचा दावा पदाधिकारी करत आहेत; परंतु, अद्यापही माढ्यात मनसेने आपली भूमिका स्पष्ट न केल्याने ही हक्काची मते नेमकी कुणाच्या पारड्यात पडणार? याबाबत चर्चा सुरू आहे.

# विशाल पाटील भाजपची 'बी' टीम

**। सांगली । प्रतिनिधी ।**

लोकसभा मतदारसंघातून अपक्ष निडणूक लढवत असलेले काँग्रेसचे बंडखोर विशाल पाटील काँग्रेसची विचारधारा आणि लोकसभा मतदारसंघातील अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी स्वबळावर निवडणूक लढवत असल्याचे म्हणत आहेत. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील शिवसेनेचे उमेदवार चंद्रहार पाटील यांनी विशाल पाटील यांच्यावर सनसनीत आरोप करत ते भाजपची बी टीम असल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, सांगलीतील तिरंगी लढतीत भाजपच्या संजय काका



पाटील यांचे चंद्रहार पाटील आणि विशाल पाटील यांना आव्हान असणार आहे. अशात हे सर्वच उमेदवार एकमेकांवर जोरदार टीका करत असल्याने सांगलीची निवडणूक रंगतदार वळणावर पोहचली आहे. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात याबद्दलीची रंगत अजून वाढणार आहे.

# पक्के विरोधक एकाच व्यासपीठावर

**। बारामती । प्रतिनिधी ।**

इंदापूर तालुक्यात ज्यांच्यातून विस्तवही जात नाही, असे माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे हे महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत व्यासपीठावर एकत्र आले.

इंदापूरच्या राजकारणात हर्षवर्धन पाटील यांची अजित पवार यांनी आजवर कायम कोंडी केली. हे दोघेही एकेकाळी आघाडी सरकारमध्ये मंत्री होते. परंतु, जिल्ह्याचे पालकमंत्री पद आपल्याकडे ठेवत अजित पवार यांनी हर्षवर्धन पाटील यांची कायम कोंडी केली. जिल्हा बँकेच्या माध्यमातूनही



त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न झाला. पाटील यांचे राजकारण संपविण्याचा विडाच अजित पवार यांनी उचलला होता. शरद पवार यांना कन्या सुप्रिया यांच्यासाठी पाटील यांची लोकसभेला मदत घ्यावी लागत होती. दुसरीकडे अजित पवार यांचे समर्थक दत्तात्रय भरणे यांना पदे देत ताकद देण्यात आली. छत्रपती कारखान्याचे चेअरमन, जिल्हा बँकेचे चेअरमन, विधानसभेची उमेदवारी दिली. त्यातून पाटील यांचे राजकारण जवळपास संपविण्यात आले. सततेच्या या पवार विरोधामुळे अखेर हर्षवर्धन हे भाजपामध्ये दाखल झाले. महायुतीत अजित पवार सहभागी झाल्याने हर्षवर्धन यांच्यापुढे मोठा पेच निर्माण झाला आहे. युती धर्माचे पालन होणार का असा प्रश्न आहे.

# एका दिवसात दोन पक्षप्रवेश

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

कल्याणच्या एका माजी नगरसेवकाने २४ तासांत दोन पक्ष बदलल्याचे समोर आले आहे. माजी नगरसेवक पुरुषोत्तम चव्हाण यांनी दिवसभरात दोनदा पक्षप्रवेश केला आहे. त्यांनी सुरुवातीला शिंदेंच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला, त्यानंतर त्यांनी काही तासांमध्येच ठाकरे गटामध्ये प्रवेश केला आहे.

पुरुषोत्तम चव्हाण यांनी सांगितलं की, मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे कामासाठी गेलो होतो. पण, त्यांनी माझा पक्षप्रवेश करवून घेतला. एका दिवसात दोनदा पक्षप्रवेश करणाऱ्या चव्हाण यांची चर्चा मात्र जोरदार सुरु झाली आहे. शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये प्रवेशावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे हे उपस्थित होते.

पुरुषोत्तम चव्हाण यांच्या घरवापसीनंतर ठाकरे गटाने शिंदे गटावर जोरदार हल्लाबोल केला आहे. मुले पळवणाऱ्या टोळीसारखे कार्यकर्ते आणि पदाधिकारी पळवणारी टोळी सध्या कल्याणमध्ये सक्रिय दिसत आहे.

त्यामुळे कार्यकर्त्यांनी सावध राहावे, असे ठाकरे गटाच्या नेत्या वैशाली दरेकर म्हणाल्या आहेत.

# शिंदे सेनेतील मतभेद चव्हाट्यावर

**। पुणे । प्रतिनिधी ।**

पंतप्रधान नरेंद्र मोदींची दोनच दिवसांपूर्वी पुण्यात सभा झाली. महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्क्यानं निवडून देण्याचे आवाहन त्यांनी केले. या सभेला महायुतीचे पुणे, शिरुर, बारामती आणि मावळचे उमेदवार उपस्थित होते. या सभेमुळे मोदींनी जिल्ह्यात महायुतीसाठी वातावरणनिर्मिती करण्याचा प्रयत्न केला. मोदींच्या भव्य सभेची चांगलीच चर्चा झाली. मात्र, आता महायुतीत असलेल्या शिंदेंच्या सेनेतील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत.

शिवसेनेचे शहर प्रमुख नाना



भानगिरे पक्षाला जय महाराष्ट्र करण्याच्या तयारीत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे परवाच पुणे दौऱ्यावर होते. मोदींची सभा असल्याने शिंदे पुण्यात आले होते. त्यावेळी भानगिरेंनी मुख्यमंत्र्यांना घरी जेवणासाठी बोलावले होते. पण मुख्यमंत्री शिंदे नाना भानगिरे यांच्या घरी जेवणासाठी गेले नाहीत. त्यामुळे भानगिरे नाराज झाले. आपल्याला सातत्याने डावलले जात असल्याची भावना त्यांच्या मनात आहे.

तसेच, नाना भानगिरे यांची नाराजी दिवसागणिक वाढत आहे. भानगिरेंनी त्यांच्या कार्यकर्त्यांची बैठक बोलावली आहे. पक्षात वारंवार डावललं जात असल्याची भावना भानगिरेंच्या मनात आहे. ते लवकरच शिवसेनेला जय महाराष्ट्र करु शकतात. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

# प्रियंका चतुर्वेदींचे भाजपला प्रत्युत्तर

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

ठाकरे गटाला राज्यात पब, पार्टी आणि पॉर्न संस्कृती रुजवायची आहे का, असा सवाल करत भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांच्यावर टीका केली होती. शिवसेना ठाकरे गटाच्या एका जाहिरातीमुळे वातावरण चांगलेच तापले आहे.

मात्र, त्यांच्या या टीकेला आता शिवसेना नेत्या, राज्यसभेच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी प्रत्युत्तर दिल आहे. तुमचा तर पॉर्न कँडिडेटलाच पाठिंबा आहे, त्याबद्दल काय म्हणाल ? असा



सवाल विचारत चतुर्वेदी यांनी भाजपावर पलटवार केला आहे. कर्नाटकमधील सेक्स स्कँडलने संपूर्ण देशच हादरला आहे, त्याचाच दाखल देत प्रियांका चतुर्वेदी यांनी भाजपावर टीका केली आहे.

चित्रा वाघ यांनी ठाकरे गटावर केलेल्या आरोपाला प्रत्युतर देत शिवसेना नेत्या प्रियांका चतुर्वेदी यांनी प्रज्वल रेवन्ना प्रकरणावरून भाजपावर निशाणा साधला. तुम्ही तर पॉर्न कँडिटेट उभा केलाय त्यावर तुमचं काय म्हणणं आहे? प्रज्वलबद्दल पंतप्रधान काहीच का बोलत नाहीत ? अमित शाह हासनमध्ये का नाही गेलेत? असा प्रश्न त्यांनी विचारला.

भाजपनं प्रज्वल याला परदेशात जायला मदत केली, असा आरोपही त्यांनी केला. जरा लाज वाटू द्या आणि बुडून मरा तुम्ही, असे म्हणत चतुर्वेदी यांनी भाजपावर टीका केली.

# ठाण्यात म्हस्केंना भाजपचा फटका?

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुतीत ठाणे लोकसभेची जागा प्रतिष्ठेची ठरली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी अखेर त्यांचा बालेकिल्ला असलेली ठाण्याची जागा मिळवली. इथून ठाणे महापालिकेचे माजी महापौर नरेश म्हस्के यांना उमेदवारी देण्यात आली आहे. म्हस्के हे शिंदेंचे निकटवर्तीय मानले जातात. पण त्यांना ही निवडणूक जड जाण्याची शक्यता आहे. भाजपमध्ये



असलेली नाराजी पाहता म्हस्के यांना फटका बसू शकतो.

नवी मुंबईतील भाजपचे बडे नेते आणि आमदार गणेश नाईक यांच्या क्रिस्टल हाऊसवर सकाळी १० च्या सुमारास बैठक झाली. ठाण्याची जागा शिवसेनेला गेल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. संजीव नाईक गेल्या अनेक महिन्यांपासून मतदारसंघ पिंजून काढत होते. ते निवडणूक लढवण्यास उत्सुक होते. पण तरीही ठाण्याची जागा शिंदेसेनेला सोडण्यात आल्यानं भाजपमध्ये नाराजी आहे. संजीव नाईकांच्या जागी विनय सहस्त्रबुद्धे, केळकरांना उमेदवारी दिली असती तरीही चाललं असतं. पण जागा शिवसेनेला का सोडली, असा भाजप कार्यकर्त्यांचा सवाल आहे. प्रचार करणार नाही. त्याऐवजी उटी, गोवा, म्हैसूरला जाऊ. मतदानाच्या दिवशी येऊ. मतदान कोणाला करायचे ते तेव्हा पाहू, असा प्लान पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसे घडल्यास शिवसेनेचे उमेदवार म्हस्केंना निवडणूक जड आहे.

# निवडणूक आयोगाने माती खाल्ली

## संजय राऊत यांचा आरोप

**। सांगली । प्रतिनिधी ।**

देशातील निवडणूक आयोग हा मोदींच्या पगडीत गुदमरला आहे. पाकिस्तानच्या लष्करी राजवटीप्रमाणे मोदी आणि शाहांच्या दबावाखाली निवडणूक आयोग काम करत असून निवडणूक आयोगानं माती खाल्ली आहे,'अशी टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली. निवडणूक प्रक्रियेमध्ये पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यानंतर सहा ते सात टक्के मतदान ११ दिवसांनी वाढलं, असा गंभीर आरोप देखील निवडणूक आयोगावर संजय राऊत यांनी केला.

एका मुलाखती दरम्यान देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांनी आपल्याला मुख्यमंत्रीपदाची ऑफर दिली, असा गौप्यस्फोट केला. यावर बोलताना संजय राऊत यांनी देवेंद्र फडणवीसांना टोला लगवाला आहे. देवेंद्र फडणवीसांचा तो स्फोट वगैरे काही नसून लवंगी फटाका आहे. कारण गेल्या काही दिवसांपासून देवेंद्र फडणवीस भरटकल्यासारखं बोलत आहेत. ते निवडणूक हरतायत राजकारण हरतायत, त्यामुळे या निवडणुकीमध्ये त्यांच्या पायाखालची वाळू घसरू लागली आहे. आता ते अशा प्रकारचं वक्तव्य करत आहेत, अशी टीका संजय राऊतांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली.

# शिंदेंवर जागा सोडण्याची नामुष्की

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

लोकसभेच्या पालघरच्या जागेवरून महायुतीत भाजप आणि शिवसेनेत मोठी रस्सीखेच सुरू होती. शिवसेना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी राजेंद्र गावीत यांची ऊमेदवारी एक महिना अगोदरच जाहीर केली होती. त्यादृष्टीने गावीत यांनी प्रचारही सुरू केला. मात्र, या निर्णयाला भाजप पालघर जिल्हाध्यक्ष भरत रजपूत यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी विरोध केला. अखेर, भाजपच्या वरिष्ठांना त्याची दखल घेतली. शिवसेनेवर पालघरची जागा सोडवण्याची नामुष्की ओढवली. ही जागा भाजपला मिळाल्याने, भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बंडाला यश आल्याची जिल्ह्यात चर्चा रंगली आहे.

# ठाकरेंच्या एकामागोमाग एक सभा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये येत्या सात मे रोजी निवडणूक आहे. यामुळे प्रचाराला फार कमी दिवस उरले आहेत. हा प्रचार थंडावण्यापूर्वीच तेथील राजकीय वातावरण तापविण्यासाठी ठाकरे बंधू एकमेकांविरोधात सभा ठाकणार आहेत. उद्धव ठाकरे गटाचे विनायक राऊत यांच्यासाठी उद्धव ठाकरे सभा घेणार आहेत. तर राज ठाकरे उद्धव ठाकरेंना प्रत्यूत्तर देण्यासाठी नारायण राणेंची प्रचार सभा घेणार आहेत. या दोघांच्या एकामागोमाग एक अशा सभा होणार आहेत. उद्धव ठाकरेंची सभा ३ मे रोजी तर राज यांची



सभा ४ मे रोजी होत आहे. उद्धव ठाकरेंची सभा आधीच ठरलेली होती. राज यांच्या पाठिंब्यानंतर राणे यांनी राज यांची सभा ४ मे रोजी कणकवलीतीलच दुसऱ्या मैदानावर ठेवली आहे.

उद्धव ठाकरेंची सभा शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता कणकवली उपजिल्हा रुग्णालयासमोरच्या मैदानात होत आहे. आमदार वैभव नाईक, माजी नगराध्यक्ष संदेश पारकर आदींनी या सभास्थळाची पाहणी केली आहे. तर राज ठाकरेंची सभा शनिवारी नगरपंचायत मैदानावर होत आहे. मनसेचे नेते अविनाश जाधव यांनी या सभास्थळाची पाहणी केली आहे. राज ठाकरेंच्या सभेला मनसेचे कार्यकर्तेच येतात, की राणे समर्थकही येतात हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. महत्वाचे म्हणजे राज ठाकरेंनी यापूर्वी कधीच अशी नारायण राणेंसाठी उद्धव ठाकरेंविरोधात उघड भुमिका घेतली नव्हती. नारायण राणेंनी जेव्हा शिवसेना सोडलेली तेव्हा सिंधुदुर्गात राज यांनाही प्रचंड विरोध सहन करावा लागला होता. राणे समर्थकांनी त्यांच्या गाड्या अडविल्या होत्या.

अखेर राज यांना माघारी फिरावे लागले होते. राज हे शिवसेनेपासून वेगळे झाले तेव्हाही राज यांनी राणेंसाठी पक्ष वेगळे असले तरी कधी प्रचार केला नव्हता. मात्र, आता ते राणेंसाठी सभा घेणार आहेत.

# धंगेकरांचा फडणवीसांवर हल्लाबोल

**। पुणे । प्रतिनिधी ।**

मविआचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांच्या प्रचारासाठी काँग्रेस नेते राहुल गांधी यांची पुण्यात सभा होणार आहे. मोदी हे पुण्यात येऊन गेल्यानंतर राहुल गांधींची पुण्यात सभा होणार आहे. दरम्यान, प्रचाराच्या निमित्ताने राहुल गांधी येत असून मोदींच्या सभेला उत्तर म्हणून ही सभा नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. तर, महाविकास आघाडीकडून उमेदवारी मिळालेले काँग्रेसचे

उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी महायुतीचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. ज्या दिवशी



देवेंद्र फडणवीस सत्तेत नसतील तेव्हा त्यांना नमस्कार घालायला सुद्धा माणूस नसेल, असे वक्तव्य रवींद्र धंगेकर यांनी करत देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला आहे. आतापर्यंत अनेक मुख्यमंत्री आपण पाहिलेत, पण कोरोना काळात केलेलं श्रेय हे उद्धव ठाकरे यांना द्यावं लागेल, असे म्हणत त्यांनी ठाकरेंचे कौतुक केले आहे.

धनगेकरांनी यावेळी भाजपासह महायुतीतील नेत्यांचा त्यांच्या धोरणाचां चांगलाचा समाचार घेतला.

## वे|ध|क

# रत्नागिरी भागात अनंत गीतेंना वाढता पाठिंबा

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

रायगड लोकसभा मतदार संघाची निवडणूक अत्यंत अटीतटीची राहील, असे चित्र मतदार संघात दिसून येत आहे. रायगडातील १५ तालुके आणि रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर, दापोली, खेड, मंडणगड या तालुक्यातील भाग रायगड लोकसभा मतदार संघात येत असल्याने निवडणुकीत कोण बाजी मारेल याचा अंदाज लावणे अवघड बनले आहे. तटकरे हे रायगडचे रहिवासी तर अनंत गीते रत्नागिरी जिल्ह्यातील रहिवासी असल्याने कांटे की टक्कर होईल यात शंकाच नाही.

मंडणगड तालुक्यातील खडप निगडी या गावी राजकीय कानोसा घेता असे दिसून येते की, या तालुक्यात निष्ठावान कडवे उबाठा गटाचे शिवसैनिक ठाम असल्याने तटकरे यांना येथे मताधिक्य वाढवण्यासाठी कडवी झुंज द्यावी लागेल. या भागात अनेक ठिकाणी तटकरेंना लोकसभा निवडणूक सोपी नाही. रायगड लोकसभा मतदार संघात दापोली, खेड, मंडणगड, गुहागर भागात महाविकास आघाडीचे अनंत गीते यांना आधिक मताधिक्य कसे मिळेल, यासाठी गावोगावी शिवसैनिकांनी कंबर कसली असून मुंबई-पुण्यातील चाकरमानी निष्ठावान शिवसैनिक १ मे पासून गावी येऊ लागले आहेत. यामुळे आता गीते यांना वाढता पाठींबा मिळत असून मताधिक्य वाढेल, असे येथील शिवसैनिकांचे मत आहे.

शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार आणि मित्र पक्षांची भक्कम साथ तसेच, मुस्लिम बांधवाचा कल देखील उबाठाकडे असल्याने गीते यांना मोठा लाभ होण्याची दाट शक्यता आहे. ही चुरशीची निवडणुक असल्याने कोणत्याही राजकिय पक्षाला आता फाजील आत्मविश्वास किंवा छोट्या गोष्टींकडे देखील दुर्लक्ष करून चालणार नाही. राजकारणात जेवढा भपका दिसतो तेवढा तो खरा नसतो, अशी अनुभवी मंडळींमध्ये चर्चा येथील ग्रामीण भागांत होत आहे.

# उरणमध्ये मतदार जनजागृती



**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र दिन आणि जागतिक कामगार दिनाचे औचित्य साधून संविधान आणि लोकशाही विचार मंच उरणच्यावतीने देशाची सद्याची राजकीय अराजकता आणि दडपशाही विरुद्ध मतदार जनजागृती कार्यक्रमाकरिता बुधवारी (दि.१) धाकटी जुई, विंधणे उरण येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी आनंद ओहाळ म्हणाले की, गेल्या दहा वर्षांतील केंद्र सरकारची कामगीरी अत्यंत निराशाजनक आहे. या केंद्र सरकारची सर्व धेय्य-धोरणे शेतकरी आणि सामान्य नागरिकांच्या विरोधी आणि फक्त मर्जीतले उद्योगपती व पुंजीपतींसाठी राबविली जात आहे. जे सरकार लोकशाही मोडीत काढून हुकुमशाहीकडे निघाले आहेत. त्यांना सत्तेतून खाली खेचण्यासाठी आपल्याला ठोस भूमिका घ्यावी लागेल. तेव्हा येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये सर्वांनी मतदारांपर्यंत पोहचून सरकारच्या विरोधात आणि इंडिया आघाडीला मतदान करण्यासाठी त्यांनी आवाहन केले. तसेच, गावांतील उपस्थित महिलांनी, त्यांना भेडसावत असलेल्या समस्या महागाई, बेकारी आणि शेतकऱ्यांवर स्थानिक प्रशासनाच्या दडपशाही विरोधात संताप व्यक्त केला.

या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारला सत्तेतून हद्दपार करण्यासाठी आणि इंडिया आघाडीच्या उमेद-वाराला विजयी करण्यासाठी प्रयत्न करणे, असा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला. तसेच, यावेळी १ मे या हुतात्मा दिनाच्या निमित्ताने भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्मा आनंदा माया पाटील यांच्या स्मारकास भेट देऊन सर्वांनी हुतात्म्यांना मानवंदना दिली. याप्रसंगी प्रभाकर घरत, सुनील जोशी, सविता सोनावणे-कदम, जितेश पाटील, गोंधळी आदी उपस्थित होते.

# गीतेंना मताधिक्य देणार



## अजित तारलेकर यांचा विश्वास

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघातील इंडिया आघाडीच्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ माणगावात उद्धव ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते जोमाने कामाला लागले असून अनंत गीते यांचा घर टू घर प्रचार करीत आहेत. माणगाव नगरपंचायत हद्दीतून अनंत गीतेंना जास्तीत जास्त मताधिक्य देणार असा विश्वास नगरपंचायतीचे नगरसेवक अजित तारलेकर यांनी प्रचार फेरी दरम्यान प्रसार माध्यमांजवळ बोलताना व्यक्त केला.

रायगड लोकसभा मतदार संघाची निवडणूक येत्या ७ मे रोजी होत असून या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून आहे. या मतदार संघात एकूण १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून खरी लढत इंडिया आघाडीचे अनंत गीते व महायुतीचे तटकरे या दोन उमेदवारांमध्ये आहे. अनंत गीते हे सहा वेळा खासदार म्हणून निवडून आले असून दोन वेळा केंद्रात त्यांनी मंत्री म्हणून काम केले आहे. एक अनुभवी लोकप्रतिनिधी व सदाचारी व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे जनता आदराने पाहत आहे. त्यांच्यासारख्या लोकप्रतिनिधींची रायगडवासीयांना गरज असल्याने त्यांच्या विजयासाठी इंडिया आघाडीचे कार्यकर्ते दिवस-रात्र एक करून कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांची मशाल निशाणी घराघरात पोहचवुन अथक परिश्रम घेऊन त्यांना सातव्यांदा रायगडचा शिलेदार म्हणून निवडून पाठविण्यास उत्सुक आहेत.

भाजपच्या भूमिकेवर नाराज असलेले अनेक मुस्लिम बांधवही उद्धव ठाकरे यांनी कोविड काळात केलेली कामगिरी पाहता व राज्यातील राजकीय समीकरणे बदलल्यावर त्यांचे मुख्यमंत्री पद गेल्याने त्यांना सहानुभूती म्हणून त्यांना ताकद देण्यासाठी गीते यांना निवडून आणण्यासाठी एक दिलाने काम करत आहेत. माणगाव नगरपंचायत हद्दीतील सर्व १७ वार्डांतून उबाठा शिवसेनेचे कार्यकर्ते नगरसेवक अजित तारलेकर, अजिंकेश जाधव, इब्राहिम करेल, परेश उभारे, प्रवीण पाटोळे, दादाराम चव्हाण, राजू चव्हाण, गंगाराम काते, ऋषी मोरे, यज्ञेश शिंदे, विशाल घरवे, सागर गांधी, अनिल सोनार, लालू, हार्दिक काते, अभिजित घोणे, अजिंक्य मिरजकर, अंकित कदम व त्यांचे इतर सर्व कार्यकर्ते प्रचार फेरी काढून अनंत गीते यांना जास्तीत जास्त मताधिक्य मिळून देण्यासाठी उत्सुक आहेत.

या प्रचार फेरीदरम्यान नगरसेवक अजित तारलेकर म्हणाले कि, आमच्या इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीतेंना सर्व वार्डांतून उत्स्फूर्त असा प्रतिसाद बंधू-भगिनीं मतदारांचा लाभत आहे. जीवनाआवश्यक वस्तूंचे प्रचंड वाढलेले भाव, इंधनाचे वाढलेले भाव, वाढती बेरोजगारी, लहान-मोठ्या व्यावसायिकांवर लादण्यात आलेली जीएसटी, शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या, मुस्लिम बांधवांच्या विध्यार्थ्यांना मौलाना अबुल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून मिळत नसलेली शिष्यवृत्ती या साऱ्या प्रश्नाच्या बाबतीत महायुतीच्या सरकारबद्दल जनतेत प्रचंड नाराजी आहे. याचा फायदा इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना होऊन ते प्रचंड मतांनी निवडून येतील, असा विश्वास तारलेकर यांनी व्यक्त केला.

# अनंत गीतेंना युवावर्गाचा पाठिंबा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

रायगड लोकसभेसाठी महाविकास आघाडीचे लोकप्रिय उमेदवार अनंत गीते यांना युवा वर्गाचा भरगोस पाठिंबा मिळत आहे. देशात सध्या वाढती महागाई आणि बेरोजगारी विरोधात युवकांमध्ये प्रचंड संताप आहे. येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत जिल्ह्यातील युवक आपला राग मतपेटीतून व्यक्त करतील, असे मत अलिबाग-मुरुड विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अँड. कौस्तुभ पुनकर यांनी बोलताना व्यक्त केले. देशात सध्या एकाधिकारशाही सुरू असून देश पुन्हा हुकूमशाहीकडे वाटचाल करीत आहे. हि निवडणूक देशाचे लोकतंत्र, संविधान वाचवण्यासाठीची लढाई असून युवक आता इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना विक्रमी मतांनी विजयी करतील. संपूर्ण अलिबाग-मुरुड विधानसभेत युवक काँग्रेसची फळी जोमाने प्रचाराचे काम करत आहे. अलिबाग-मुरूड विधानसभा मतदारसंघातून इंडिया आघाडीच्या उमेदवाराला विक्रमी मताधिक्य मिळेल, असे मत अँड. कौस्तुभ पुनकर यांनी व्यक्त केले.



# गीतेंचा गावागावातून प्रचार

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रायगड-रत्नागिरी लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते हे विक्रमी मतांनी विजय होण्यासाठी रोहा तालुक्यातील कोलाड आंबेवाडी येथील महाविकास आघाडीचे कार्यकर्ते गावागावात जाऊन मतदारांची भेट घेत प्रचारात आघाडी घेत आहेत. तसेच, आंबेवाडी-खांब जिल्हा परिषद मतदार गणातून अनंत गीते यांना मतदारांचा भरघोस प्रतिसाद मिळत आहे. एक संयमी, अभ्यासू व शांत स्वभावाचे नेतृत्व व एकही भ्रष्टाचाराचा आरोप नसलेला कणखर उमेदवार म्हणजे अनंत गीते म्हणून त्यांची ख्याती असून शिवसेना उबाठा गट, शेकाप, राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेससह महाविकास आघाडीतील सामजिक संघटनाचे पदाधिकारी व कार्यकर्ते हे गावा गावात जाऊन दौरे करीत आहेत. तसेच, मतदारांजवळ संपर्क करीत उमेदवार गिते यांची ताकद आधिक बळकट करत असताना दिसत आहेत.

राष्ट्रवादी अजित पवार गट, बीजेपी, शिवसेना शिंदे गट आदी महायुतीचे अधिकृत उमेदवाराला पराभूत करण्यासाठी भयानक लाट आहे. गद्दारी विरुद्धची हि लढाई जिंकण्यासाठी तसेच देशाचे संविधान वाचविण्यासाठी येथील महाविकास आघाडीचे कार्यकर्ते गावोगावी प्रचार करत आहेत. मतदार तसेच आबालवृद्ध यांची भेट घेत गद्दारी विरुद्ध आवाज उठवून आणि अनंत गीते यांना शंभर टक्के मतदान करून निवडून देऊन भरघोस मतांनी निवडून देत लोकसभेत पाठविण्यासाठी ऐकटवले आहेत. रायगडच्या राजधानीत नावीन्यपूर्ण विजय प्राप्त करण्यासाठी महाविकास आघाडीचे कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थीती दर्शवित प्रचारात आघाडी घेताना दिसत आहेत.

रायगड जिल्हासह कोकणात महाविकास आघाडीच्या प्रचार सभा घेतल्याने वातावरण आघाडीचे झाले आहे. पदाधिकारी व कार्यकर्ते हे प्रचारासाठी उतरले आहेत. एकत्र एक दिलाने काम करीत असल्याचे चित्र या निवडणुकीत सर्वत्र पाहावयास मिळत आहे. यावेळेस अनंत गीते यांचा प्रचंड मतांनी विजय सुनिश्चित असल्याचे प्रचार दरम्यान शेकापचे नेते शिवराम महाबले आणि उबाठाचे शिवसैनिक चंद्रकांत लोखंडे यांनी व्यक्त केले आहे.

# वयोवृद्ध, अपंगांचे टपाली मतपत्रिकाद्वारे मतदान



**। महाड । प्रतिनिधी ।**

वयोवृद्ध ८५ वर्षांवरील आणि अपंग व्यक्तिंना मतदान केंद्रावर मतदानाच्या दिवशी होणारा त्रास पाहता शासनाने गृह मतदान टपाली मतपत्रिकेद्वारे ७ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी घरी जाऊन त्यांच्याकडून मतदानाचा हक्क मंगळवार दि.३० एप्रील रोजी बजावून घेतला. शासन निर्देशानुसार गृहमतदान टपाली मतपत्रिकाद्वारे मतदान करून घेण्यासाठी पथक तयार करण्यात आले आहे. हे पथक वयोवृद्ध व अपंग व्यक्तीच्या घरी जाऊन मतपत्रिकेद्वारे मतदान करून घेत आहेत. महाड तालुक्यात या मतदानासाठी ३४५ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती तहसीलदार महेश शितोळे यांनी दिली. अर्जा नंतर त्यांच्या घरी जाऊन ते खरोखर या मतदानासाठी पात्र आहेत का, याची चौकशी केली. यानंतर जाहीर केलेल्या तारखेला घरी जाऊन सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान मतदान घेण्यात आले. ३४५ प्राप्त झालेल्या अर्जामधून २ लोकांचा अचानक मृत्यू झाल्यामुळे २४३ मतदार आपला मतदानाचा हक्क घरी बजावणार आहेत. या मतदानासाठी दोन दिवस देण्यात आले होते.

# गृहमतदानाला अलिबाग मतदार संघापासून सुरुवात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

रायगड लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीकरिता मतदार संघातील निवडणूक यंत्रणा ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांची घरोघरी जाउन मतदान नोंदविण्याची प्रक्रियेला अलिबाग विधानसभा मतदार संघापासून सुरुवात झाली आहे. भारत निवडणूक विभागाने सुरु केलेल्या या सुविधेमुळे वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांनी गृह मतदानाच्या या प्रक्रियेबाबत आनंद व्यक्त केला आहे.

मतदार संघातील ८५ वर्षांपेक्षा जास्त आणि दिव्यांग मतदारांच्या गृह मतदानास सुरुवात झाली असुन या मतदारसंघात २७५ मतदाते आहेत, अशी माहिती अलिबाग विधानसभा संघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांनी दिली आहे. तसेच, मुरुड तालुक्यात ४२ मतदाते असल्याची माहिती तहसिलदार रोहन शिंदे यांनी दिली. कोणताही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाने यावर्षी प्रथमच ८५ वर्षांवरील



मतदार आणि दिव्यांग मतदारांसाठी गृह मतदानाची सोय उपलब्ध करून दिली आहे. गृहमतदानाला रायगड लोकसभा मतदारसंघात सुरुवात झाली. यावेळी दिव्यांग व वयोवृद्ध व्यक्तींनी उत्स्फूर्तपणे बॅलेट पेपरद्वारे गोपनीयता बाळगत मतदान करुन मतदानाचा हक्क बजावला.

दुसऱ्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकांमध्ये रायगड ३२ लोकसभा मतदारसंघासाठी येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे. यावर्षी आयोगाने ८५ वर्षाहून अधिक वय असणारे मतदार व दिव्यांग मतदार ज्यांनी १२ डी नमुना भरून दिला, त्यांच्या घरी जाऊन आयोगाच्या निर्देशानुसार मतदान प्रक्रिया करण्यात येत आहे.

## विद्यमान खासदारांविरोधात
# जनतेमध्ये रोष

**। पनवेल । वार्ताहर ।**

१८ व्या लोकसभेची निवडणूक जनता विरुद्ध भाजपा अशी होणार आहे, असे रोखठोक प्रतिपादन करत पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड यांनी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'कृषीवल'च्या प्रतिनिधीशी संवाद साधला. ते म्हणाले की, गेली दहा वर्षे मावळ लोकसभा मतदारसंघाचे दिल्लीतील लोकसभेत प्रतिनिधित्व करणाऱ्या विद्यमान खासदारांविरोधात जनतेमध्ये प्रचंड रोष असल्याचे दिसून येते. तर महाविकास आघाडीचे अधिकृत आणि लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांची मशाल यंदाच्या निवडणूक बाजी मारणार, असे अभ्यासपूर्ण विश्लेषण केल्यानंतर त्यांनी मत प्रकट केले.

पुढे ते म्हणाले की, मी जेव्हा आकुर्डी येथे आमचे अधिकृत आणि लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा अर्ज भरण्याकरता गेलो होतो. तेव्हा पाहिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता मी प्रतिक्रिया दिली होती की, संजोग वाघेरे पाटील निवडून येणारच. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांचे पदाधिकारी कार्यकर्त्यांची गर्दी होणे हे तर फार स्वाभाविकच होते. परंतु, त्या ठिकाणी जो जनसागर लोटला होता त्यामध्ये बहुतांश उपस्थिती सामान्य नागरिकांची होती, यात लक्षणीय उपस्थिती महिला वर्गाची होती आणि तितकीच लक्षणीय उपस्थिती तरुणांची देखील होती.

मल्लिनाथ गायकवाड यांनी सुरुवातीच्या काळात एका खासदारांचा स्वीय सहाय्यक म्हणून अत्यंत प्रभावी कामगिरी करून दाखविली आहे. त्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर विद्यमान खासदारांच्या दोन टर्म बद्दल विचारले असता मल्लिनाथ गायकवाड यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने विशद केले की, एखाद्या लोकसभेच्या मतदारसंघाची व्याप्ती फार मोठी असते. त्यामुळे खासदाराने व्यक्तीसापेक्ष संपर्क ठेवून काम करणे त्यांच्याकडून अभिप्रेत नसते. परंतु, केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांबाबत जर नागरिकांना समस्या असल्या तर त्या सोडवण्याची जबाबदारी खासदारांची असते. तसेच, राज्य सरकार विविध उपक्रम राबवत असते. त्याकरता केंद्र सरकारच्या माध्यमातून निधी मिळवून देणे, अनुमत्या प्राप्त करून देणे व या कामांवर अंकुश ठेवणे ही देखील त्यांची जबाबदारी असते. दुर्दैवाने विद्यमान खासदारांकडून या कुठल्याच पातळीवर समाधानकारक काम झालेले नाही.

विमानतळाच्या नामकरणचा वाद असेल, रेल्वे स्थानकातील ढीगभर समस्यांचा प्रश्न असेल, पासपोर्ट कार्यालयाच्या बाबतीत घातलेला घोळ असेल या साऱ्या गोष्टींतून विद्यमान खासदारांचा निष्क्रियपणा चव्हाट्यावर येतो. देशभरात देखील महागाई, बेरोजगारी, धार्मिक ध्रुवीकरण, केंद्रीय संस्थांचा अतिरेकी वापर, लोकशाहीला तिलांजली देत हुकूमशाहीकडे होत असणारा प्रवास या साऱ्यामुळे सामान्य जनतेत केंद्र सरकारबद्दल तीव्र नाराजी आहे. हा सारा रोष असल्यामुळे ही निवडणूक जनतेची निवडणूक झालेली आहे. या पार्श्वभूमीवर मविआचे लोकप्रिय उमेदवार संजोग वाघेरे पाटील हे अत्यंत विनम्र आहेत. प्रचंड विकास कामाचे पाठबळ घेऊन ते मतदारांकडे जात आहेत.



● म्हसळा-श्रीवर्धन येथे गुरूवारी (दि.१) इंडिया आघाडीची सभा संपन्न झाली. यावेळी शेकाप सरचिटणीस आ.जयंत पाटील यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला. याप्रसंगी माजी आ. पंडीत पाटील, शेकाप श्रीवर्धन तालुका चिटणीस वसंत यादव, अल्लाहुद्दिन सनगे, तेजस मेंगे, शरद साठे, सुप्रिया साठे, कांचन शिंदे, कल्पेश शिंदे, महेंद्र शिंदे, जितेश शिंदे, अखलाख माहिमकर अशोक अंजरलेकर व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



● अलिबाग तालुक्यातील आक्षी ग्रामपंचायत हद्दीत इंडीया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना जास्तीत जास्त मताधिक्याने निवडून देण्यासाठी शेतकरी कामगर पक्षाच्या कार्यकर्त्यांनी गुरूवारी (दि.२) प्रचाराला सुरवात केली. यावेळी शेकाप नेते द्वारकानाथ नाईक, सरपंच रश्मी पाटील, उपसरपंच आनंद बुरांडे, सदस्य रश्मी वाळंज, निरजा नाईक, कार्यकर्ते विलास राणे, रश्मीन गुरव, रवींद्र पाटील, शिवनाथ पाटील, सुनिल नाईक, अभिजीत वाळंज, आश्लेषा नाईक, संतोष राऊळ, दिपक फाळके, रमण पाटील, नंदू राणे, निलेश गुरव, शक्ती बानकर व काँग्रेस नेते प्रभाकर राणे आदी उपस्थित होते.

# तोंड लपवून लढाई

भाजप आणि त्यांचे दोन फुटीर मित्र यांचे जागावाटप अखेर झाले आहे. निदान त्यांनी तसे तोंडदेखले चित्र उभे केले आहे. चार महिन्यांपासून घासाघीस चालू होती. रात्र-रात्र बैठका चालू होत्या. दोनदा सगळ्या नेत्यांना टाकोटाक दिल्लीत बोलावून घेण्यात आले. मग अजित पवार म्हणाले की मी आता पुन्हा दिल्लीला येणार नाही. नंतर एकदा अमित शाह हेच महाराष्ट्रात आले. लढवून जिंकता येतील इतक्याच जागा मागा अशा कानपिचक्या त्यांनी दिल्या. शाह हे गृहमंत्री आहेत. इडी व सीबीआय त्यांच्या हातात आहे. ते कधीही कुठलीही केस सुरू करू शकतात. नाहीतरी, कोणाही फुटिराविरुध्दची एकही केस आम्ही बंद केलेली नाही असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले आहेच. हा एका परीने इशारा आहे. त्यामुळे राज्यातले फुटीर एरवी कितीही गमजा मारत असले तरी शाह आणि मोदींसमोर मान खाली घालूनच उभे राहावे लागते. शिवाय त्यांनी मान खाली घालायला लावणारे काहीही सांगितले तरी ते ऐकावे लागते. अजितदादांनी तेव्हा परस्पर जाहीर केले की चार जागा लढवणार. पण भाजपने त्यांना हसण्यावारी नेले असावे. साताऱ्याची जागा सोडून द्यावी लागली. शिरुरमध्ये शिवाजीराव आढळराव पाटलांना आयात करावे लागले. हे यांचे कालपर्यंतचे शत्रू. बारामतीत सुनेत्रावहिनींची उमेदवारी जाहीर केली. पण विजय शिवतारेंची समजूत काढताना नाकात दम आला. धाराशिवमध्ये तर पार नक्षा उतरला. भाजपच्या दबावामुळे त्यांच्या आमदारांच्या पत्नीला आयात करून उमेदवारी द्यावी लागली. ती म्हणते मी कशाला राष्ट्रवादी वाढवू? म्हणजे घर फुटले, सख्खे भाऊ, पुतणे विरोधात उभे राहिले. आणि, बाहेरही सगळीकडे अशी नामुष्की झाली. इतके करूनही अजितदादांच्या चारही जागा पडतील असे आतापर्यंतच्या सर्व सर्वेक्षणांमध्ये म्हटले आहे. त्यामुळे प्रचारातली जानच गेली आहे. रायगडमध्ये आपण ते रोज पाहतो आहोच.

## शिंद्यांच्या आडोशाने

दादांच्या मानाने शिंदे गटाने बऱ्याच जागा सोडवून घेतल्या. आता भाजप २८, शिंदे गट १५ आणि दादा गट चार, अधिक एक महादेव जानकर(परभणी) असे वाटप झाले आहे. पण मतदानाच्या दोन फेऱ्या झाल्यावर आणि चौथ्या फेरीचे उमेदवारी अर्ज भरायच्या शेवटच्या दिवशी ही वाटप पूर्ण झाले हे लक्षात घ्यायला हवे. जानेवारीत हे सगळ्यांना आयेगा तो मोदीही असे ऐकवत होते. विरोधक आहेतच कुठे असा यांचा प्रश्न होता. प्रत्यक्षात यांना स्वतःच्या जागा आणि उमेदवार कोण हे यांना अजून ठरवता आले नव्हते. यांचे कारण महायुती नावाने जे काही उभे आहे ती निव्वळ स्वार्थाचे दुकान आहे. इडीच्या भीतीने या दुकानाच्या आडोशाला आलेले दोन जण आणि दुकानदार अशी ही युती आहे. शोलेमधला संवाद प्रसिध्द आहे. गब्बरसिंग से तुम्हे एकही आदमी बचा सकता है, वो है गब्बरसिंग. आज इडीपासून तुम्हाला एकच जण वाचवू शकतो, तो म्हणजे इडीचा मालक अशी स्थिती आहे. महाराष्ट्रात या आडोशाला आलेल्यांच्या मदतीखेरीज उभे राहणेही कठीण आहे हे भाजपला माहिती आहे. देशात तीनशेचा पल्ला गाठायचा असेल तर उत्तर प्रदेशाच्या ८० जागांच्या खालोखाल महाराष्ट्राच्या जागा महत्वाच्या आहेत. आधी भाजप ४० जागा लढवेल अशी स्वप्ने बावनकुळे वगैरे मंडळी पाहत होती. शिंदे व दादांना विधानसभेपुरते ठेवू असा त्यांचा हिशेब होता. पण शिंदे यांनी आपला हट्ट सोडला नाही व जागा मिळवल्या. अर्थात या जागा सोडण्यामध्ये भाजपचा एक हेतू साध्य होईलच. तो म्हणजे दोघा शिवसेनावाल्यांना आपसात लढवायचा. आता जे जागावाटप झाले आहे त्यानुसार, ईशान्य मुंबई, रत्नागिरी अशा काही मोजक्या जागांवर भाजप आणि ठाकरे सेना यांची थेट लढत होणार आहे. बहुतेक ठिकाणी शिंदे वा दादांचेच उमेदवार ठाकरे गटाशी लढणार आहेत. या जागा भाजपने लढवल्या असत्या तर कदाचित सेना फोडल्याबद्दलची नाराजी लोकांनी जोरात दाखवली असती.

## भाजपचे कारस्थान

आता मूळचे सेनेचेच असलेले दोन नेते एकमेकांविरुध्द लढणार असल्याने मतांमध्ये सेनेच्या मतदारांमध्येच फाटाफूट होणार आहे. ठाण्यात राजन विचारे विरुध्द नरेश म्हस्के किंवा संभाजीनगरमध्ये चंद्रकांत खैरे विरुध्द संदिपान भुमरे अशा या लढाया होणार आहेत. शिवसेनेला फोडूनही तिला संपवता आले नाही. त्यामुळे निवडणुकीच्या मतदानातून ही फाटाफूट घडवून आणली जाईल. त्यातून उद्या कोणीही निवडून आले तरी शिवसेनेची मूळ ताकद विभागली जाईल असा हा कुटील हिशेब आहे. शिवसेनेचा सर्वाधिक प्रभाव आहे त्या रत्नागिरी व सिंधुदुर्गाची जागेवरदेखील विनायक राऊतांच्या विरोधात राणे या जुन्या सेना नेत्यालाच उभे केले आहे. एरवी भाजपने आपल्या सर्वेक्षणांचे दाखले देऊन शिंदे गटाला काही ठिकाणी उमेदवार बदलायला लावले. पण दक्षिण मुंबईत अरविंद सावंतांच्या विरोधात यामिनी जाधव किंवा वायव्य मुंबईत अमोल कीर्तीकरांच्या विरोधात रवीन्द्र वायकर यांना लढायला होकार दिला. गंमत म्हणजे याच जाधव आणि वायकर यांना तुरुंगात पाठवणारच असा किरीट सोमय्या यांचा पण होता. वायकर यांच्यावर तर महिन्याभरापूर्वीपर्यंत आरोप चालू होते. तरीही त्यांना भाजपने विरोध केलेला नाही याचे कारण मुंबईकर मराठी जनतेच्या रागाला सामोरे जाण्याची हिंमत भाजपकडे नाही. त्यामुळे देवेंद्र फडणवीस आणि मंडळीची शिंद्यांच्या आड तोंड लपवून ही लढाई सुरु आहे. शिंद्यांकडेही अनेक जागांवर द्यायला उमेदवारच नाहीत. हेमंत गोडसे यांच्याविरुध्द नाराजी आहे असे कळूनही वेळ कमी राहिल्याने त्यांनाच तिकिट दिले आहे. तीच स्थिती बुलढाण्याची आहे. भुमरे व वायकर हे तर स्वतःच नाखूष होते. तरीही त्यांना घोड्यावर बसवण्यात आले आहे. एकूण भाजपने शिंदे गटाला आपल्या जागा राखू दिल्या असल्या तरी शिवसेनेला संपवण्याच्या कारस्थानाचाच तो भाग आहे. असे तोंड लपवून लढणाऱ्यांना मराठी जनता मतदानातून चोख उत्तर देईल यात शंका नाही.

विचार

# कृत्रिम बुद्धिमत्ता अवकाश व्यापतेय...

**एव्हाना जगभरात एआयची वाटचाल खऱ्या अर्थाने सुरु झाली आहे. लवकरच एआय आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग होणार आहे. भविष्यात रोबोट्स आपल्यासोबत आपले सहकारी म्हणून काम करतील, अशीही शक्यता आहे. त्यामुळे आपला वेळ आणि श्रम यांची बचत होईल. नवीन संधी उपलब्ध होतील आणि आपलं जीवन अधिक सुखदायी होईल. हा बदल कसा आकारला यईल? त्यामुळे कोणत्या क्षेत्रांवर परिणाम होईल?**



**मेधा इनामदार**

कृत्रिम बुद्धिमत्ता, आर्टिफिशियल इंटेलिजन्स किंवा एआय हे शब्द आणि ही संकल्पना आता नवी राहिलेली नाही. गेल्या काही वर्षांमध्ये एआयने मोठ्या झपाट्याने जग काबीज केले आहे. इंजिनिअरिंगची एक नवी आणि लोकप्रिय शाखा बनण्याइतके एआयने नव्या-जुन्या पिढ्यांवर तंत्रज्ञानाचे गारुड केले आहे. सध्या नवीन टेक्नॉलॉजी वेगाने बदलत आहे. अवघ्या वर्षभरातच तंत्रज्ञान जुने होते आणि नवीन तंत्रज्ञान त्याची जागा घेते. आजवर फक्त माणूसच करू शकत असलेली कामेदेखील एआय करू शकत आहे. आता मशीनच माणसासारखा विचार करू लागली आहेत. वैद्यकीय क्षेत्रात आजारांचे निदान, औषधांचा शोध, शस्त्रक्रिया इत्यादी बाबतीत वित्तीय क्षेत्रात गुंतवणूक सल्लागार, फसवणूक रोखण्यासाठी एआय काम करते तर वाहतूक क्षेत्रात स्वयंचलित वाहने, वाहतूक नियंत्रण, अपघात टाळणे यासाठी याचा वापर केला जातो. ग्राहक सेवाक्षेत्रात चॅटबॉट्स, कस्टमर केअर, जाहिराती बनवणे यासाठी एआय उत्तम काम करते. टेक्स्ट एआय हे सॉफ्टवेअर तर आता जगात सगळीकडे वापरले जाऊ लागले आहे. अगदी विद्यार्थीही याचा सहज उपयोग करतात. हे खूपच दमदार माध्यम आहे, कारण ते सॉफ्टवेअर म्हणते, 'आस्क मी एनिथिंग! मला काहीही विचारा'. आपण कोणत्याही भाषेत त्याच्याशी संवाद साधू शकतो. मग आपण त्याला निसर्ग आणि मनुष्याच्या नात्यावर कविता लिहायला सांगितली की तो झटपट काव्यनिर्मिती करतो... निसर्गाने सारे दिले ते मनुष्याने हरवले, आता निसर्ग कोपला, आणि मनुष्य जागला...' वगैरे. आपण एआयला देत असलेल्या आदेशाला 'प्रॉम्पटिंग' म्हणतात. अचूक एआय प्रॉम्पटिंग करणे खूप महत्वाचे आहे. कारण प्रॉम्पटिंग जितके परफेक्ट, तितकी निर्मिती चांगली...

एआयमध्ये नव्याने समाविष्ट झालेले डेविन हे सॉफ्टवेअरदेखील तितकेच आश्चर्यकारक आहे. अमेरिकेतल्या कॉग्निशन या कंपनीने हे इंजिनिअरिंग सॉफ्टवेअर बनवले आहे. कॉग्निशनने जाहीर केले आहे की जगातला पहिला एआय सॉफ्टवेअर इंजिनियर त्यांनी तयार केला आहे. त्याचे नाव आहे डेव्हिन. हा डेव्हिन अनेक गोष्टी माणसाच्या मदतीशिवाय करू शकतो. तो कोड लिहितो. कोणतीही समस्या 'डीबग' करून 'प्रो-लेव्हल' वेबसाइट आणि व्हिडिओ तयार करू शकतो. डेव्हिनमध्ये स्वतःची अशी एक कमांडिंग यंत्रणा आहे. त्यामध्ये शेल, कोड एडिटर आणि वेब ब्राउझर आहे. त्यामुळे तो इंजिनिअरिंगचे वेगवेगळे टास्क सॉल्व्ह करतो. आश्चर्य म्हणजे डेव्हिनने इंजिनिरअरींग जॉबसाठीचे इंटरव्ह्यूदेखील पास केले आहेत. त्यामुळे तो खऱ्याखुऱ्या सॉफ्टवेअर इंजिनियर्सची जागा घेऊ शकतो, असेही कंपनीने म्हटले आहे.

काही दिवसांपूर्वीच केरळमधल्या एका शाळेत एका एआय शिक्षिकेचा प्रयोग यशस्वी झाला. केरळच्या तिरुवनंतपुरमच्या केटीसीटी हायर सेकेंडरी स्कूलमध्ये 'ईरीस' या फीमेल टीचर रोबोटने विद्यार्थ्यांना शिकवले. साडी नेसून मुलांना शिकवणाऱ्या 'ईरीस' मध्ये अनेक वैशिष्ट्ये दिसली. हा रोबोट आणणारी कंपनी 'मेकरलॅब्स एड्युटेक' म्हणते, 'ईरीस' ही केवळ केरळमधलीच नव्हे तर देशातली पहिली जनरेटिव्ह एआय टीचर आहे. ईरीस तीन भाषांमध्ये बोलू शकते. तिचां नॉलेज बेस चॅटजीपीटीसारख्या प्रोग्रामिंगने तयार करण्यात आला आहे. एका खऱ्याखुऱ्या शिक्षकाच्या तुलनेत तिच्याकडे जास्त माहिती आहे. अर्थात ही माहिती केवळ तिच्या मेमरी कार्डमध्ये कॉपी पेस्ट केलेली आहे. पण तिच्या शिकवण्याची पद्धत फार आवडते, असे विद्यार्थी म्हणतात. ती मुलांच्या प्रत्येक प्रश्नाचे सखोल उत्तर देते.

ओपन एआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी काही दिवसांपूर्वीच 'सोरा' या नवीन एआय टूलची माहिती दिली. त्यांनी त्यासंबंधीचा व्हिडीओदेखील शेअर केला. ते म्हणतात की 'सोरा' काय करू शकते ते तुम्हाला दाखवायला आम्हाला आवडेल. मग लोकांनी त्यांना आपण पाहू इच्छीत असलेल्या व्हिडीओंची माहिती दिली आणि त्याबरहुकूम सोराने व्हिडिओ बनवले. हे व्हिडिओ अत्यंत खरेखुरे वाटतात. ओपन एआयच्या 'सोरा'चे वैशिष्ट्य म्हणजे या टूलद्वारे कोणत्याही क्लिप किंवा फोटोशिवाय एचडी व्हिडीओ जनरेट करता येतो. म्हणजे तुम्ही फक्त टेक्स्ट म्हणजेच शब्द- वाक्य दिले की सोरा व्हिडिओ बनवू शकते. सध्या तरी ती एक मिनिटाचा व्हिडिओ बनवते आहे. हे सॉफ्टवेअर अजून सर्वत्र उपलब्ध नाही. पण लवकरच ते होईल. मग जे व्हीडिओ किंवा इमेजेस पूर्वीच उपलब्ध आहेत ते वापरुन ही सोरा अधिक लांबीचे व्हिडिओ बनवू शकेल. तरुण अमिताभ किंवा दिलीपकुमारच्या इमेजेस वापरुन, आधीच उपलब्ध असलेल्या सेट्सच्या इमेजेसचा वापर करून नवीन चित्रपटदेखील बनवता येईल.

आवाजाच्या क्षेत्रातही एआयने स्पर्श केला आहे. काही दिवसांपूर्वी 'कल हो न हो' हे सोनू निगमने म्हटलेले गाणे साक्षात किशोरकुमारच्या आवाजात व्हायरल झाले. 'ॲपो असिस्टंट' हे एक लोकप्रिय ॲप आहे. या ॲपच्या मदतीने कोडिंग, कंटेंट समरी यासारखी कामे करता येतात. हे ॲप यूजरसाठी गणितातील समस्या आणि संगीताची रचनादेखील लिहू शकते. 'चॅटऑन' या ॲप्लिकेशनच्या मदतीने लेखन रचना सुधारता येते. यूजर एखाद्या व्यवसायाशी संबंधित असेल आणि लोकांना आकर्षित करण्यासाठी चांगला मजकूर लिहायचा असेल तर या ॲपच्या मदतीने हे काम करणे अधिक सोपे झाले आहे. केवळ याच नव्हे तर प्रत्येक क्षेत्रात एआयने प्रवेश केला आहे. शेतीच्या विकासासाठीही आता याचा वापर सुरू झाला आहे. परवडणाऱ्या ऊसशेतीसाठी ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने मायक्रोसॉफ्ट, ऑक्स्फर्ड विद्यापीठ आणि ॲग्री पायलट एआय या जागतिक संस्थांच्या सहयोगाने कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित काटेकोर शेती तंत्रज्ञान विकसित केले आहे.

ओपन एआयला उत्तर देण्यासाठी गूगलने जेमिनी नावाचे तंत्रज्ञान आणले आहे. त्यात जेमिनी हे एक नवीन कृत्रिम बुद्धिमत्ता मॉडेल आहे; जे समजून घेणे, सारांश देणे, तर्क करणे, कोडिंग आणि नियोजन करणे यासारख्या कामांमध्ये इतर मॉडेल्सपेक्षा जास्त कामगिरी करते. हे सॉफ्टवेअर प्रो, अल्ट्रा आणि नॅनो या तीन आवृत्त्यांमध्ये सादर केले गेले आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रात सध्या विकसित होत असलेल्या नवीन तंत्रज्ञानांमध्ये मुख्यतः गूगल, ओपन एआय, मेटा या कंपन्या आहेत. त्यांच्यातील स्पर्धा ही लोकांच्या दृष्टीने लाभदायक आहेच. पण त्याचबरोबरच काहीशी भीतीदायकही आहे. या वाढत्या स्पर्धेमुळे आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या क्षेत्रात जबरदस्त क्रांती होणार आहे, यात शंका नाही. त्यामुळे नजीकच्या भविष्यात काम करणाऱ्या माणसांची गरज कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शिक्षक, चित्रकार, पत्रकार, लेखक, कवी, कॉम्प्युटर ऑपरेटर, टायपिस्ट, बॅनर मेकिंग, व्हिडिओ एडव्हरटाईजमेंट, फोटोग्राफी यासारखे अनेक जॉब आता धोक्यात येऊ शकतात. टेक्स्टचे आवाजात रूपांतर करणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कथावाचक, रेडिओ वृत्तनिवेदक, व्होकल आर्टिस्ट या मंडळींचे काम कमी झाले आहे. 'सोरा'सारख्या तंत्रज्ञानामुळे डायरेक्टर, कॅमेरामन, छोटे मोठे तंत्रज्ञ, संवाद लेखक, डबिंग आर्टिस्ट, बॉडी डबल, पटकथालेखक, भव्य दिव्य सेट उभारणारे कला दिग्दर्शक, गायक, गीतकार, संगीतकार, ध्वनी संयोजक, नृत्य दिग्दर्शक यांनाही धोका आहे. लवकरच संशोधन क्षेत्रातही एआयचा वापर सुरू होईल आणि त्यानंतर काय घडेल याचा अंदाज आताच करणे अशक्य आहे. एआयची वाटचाल आता खऱ्या अर्थाने सुरु झाली आहे. लवकरच एआय आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग होणार आहे. भविष्यात रोबोट्स आपल्यासोबत सहकारी म्हणून काम करतील, अशी शक्यता आहेच. त्यामुळे आपला वेळ आणि श्रम यांची बचत होईल, नवीन संधी उपलब्ध होतील आणि आपले जीवन अधिक सुखदायी होईल. त्यासाठी सभोवताली घडून येत असलेले बदल बारकाईने तपासून पहायला हवेत, हे मात्र नकी.

आजकाल

# साताऱ्यात भाजपच्या पायाखालची वाळू सरकली

**तुषार गायकवाड**

सन २००८ ते २०१३ या काळातील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती मधील चटई क्षेत्र (एफ.एस.आय) घोटाळा झाल्याचा ठपका ठेवत तत्कालीन सभापती, २३ संचालक आणि बाजार समितीचे सचिव यांचेविरोधात शासनाची फसवणूक करण्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या २३ संचालकांपैकी एक संचालक शशिकांत शिंदे आहेत इतकाच त्यांचा या तथाकथित घोटाळ्याशी संबंध.

वास्तविक मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे तत्कालीन सचिव यांचेवर सरकारी व्यक्ती असून शासनाची फसवणूक, संगनमत करणे, शासनाशी विश्वासघात अशा कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन २०१४ ते २०१९ देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व गृहमंत्री होते. गेले २ वर्षे फडणवीस उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आहेत. नरेंद्र मोदी गेली १० वर्षे पंतप्रधान आहेत. तरीही २०१३ च्या अगोदर झालेल्या तथाकथित घोटाळ्यावर कारवाई होण्यासाठी लोकसभा निवडणूकीत शशिकांत शिंदेंच्या उमेदवारीचा मुहूर्त का? या प्रश्नातच शशिकांत शिंदे भाजपच्या पुढे गुडघे टेकत नसल्याने राजकीय सूडातून कारवाई होतेय हे उत्तर लपलेले आहे.

भ्रष्टाचाराचे आरोप करायचे आणि भिती घालून अशा नेत्यांना आपल्या पक्षात घेवून संविधानिक पदावर बसवत पवित्र जाहीर करायचे हे भाजपचे तंत्र संपूर्ण देशाने अजित पवारांच्या रुपाने बघितले आहे. शशिकांत शिंदेंना साताऱ्याने व उभ्या महाराष्ट्राने विधानसभा, मंत्रिमंडळ, विधान परिषदेत जनतेचे प्रश्न हिरीरीने मांडताना व सोडवताना बघितले आहे.

तुलनेत उदयनराजेंच्या सन २०१४ ते २०१९ या ५ वर्षांच्या लोकसभा सदस्यत्वाच्या कालखंडात त्यांनी संसदेत एकही प्रश्न उपस्थित केला नाही. ५ वर्षांच्या टर्ममध्ये संसदेत त्यांच्या उपस्थितीचं प्रमाण फक्त ३० टक्के इतकं आहे. प्रश्न न विचारण्यासोबत संसदेच्या अधिवेशनात होणाऱ्या एकाही चर्चेत उदयनराजेंचा सहभाग नाही. एकही खाजगी विधेयक मांडलेलं नाही.

२०१९ च्या सातारा लोकसभा पोटनिवडणूकीत भाजपच्या चिन्हावर पराभूत झाल्यानंतर उदयनराजे गेली ४ वर्षे राज्यसभेवर आहेत. या ४ वर्षांत ५ अतारांकीत प्रश्न त्यांनी २०२१ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विचारले आहेत. यापैकी एकही प्रश्न सातारा जिल्ह्यातील नाही. गेल्या ४ वर्षांत उदयनराजेंनी राज्यसभेत एकही तारांकीत प्रश्न विचारलेला नाही. ४ वर्षांत एकाही डिबेट (चर्चेत) मध्ये सहभाग नाही.

संसदेच्या पावसाळी अधिवेशन २०२१ मध्ये फक्त ५ दिवस हजर होते. हिवाळी अधिवेशन २०२१ मध्ये फक्त १ दिवस हजर होते. हिवाळी अधिवेशन २०२२ मध्येही फक्त १ दिवस हजर होते. सप्टेंबर २०२३ मधील हिवाळी अधिवेशनाला उपस्थितच नव्हते. ४ वर्षांतील राज्यसभेत उदयनराजेंची सरासरी उपस्थिती २.८ टक्के आहे. असे संसदेची वेबसाईट सांगते.

याशिवाय भाजपाचे उमेदवार उदनराजे भोसले यांनी २०१९ पूर्वी ॲट्रोसिटी कायदा रद्द करण्याची मागणी केली होती. सध्या तो व्हिडीओ सोशल मेडीयावर धुमाकूळ घालतोय. त्यामुळे सातारा जिल्ह्यातील आंबेडकरी मतदार उदयनराजेंच्या विरोधात शशिकांत शिंदे यांच्याकडे एकवटलेला आहे. बरं गुन्ह्यांचे म्हणाल तर उदयनराजेंच्या विरोधात आयपीसी कलमांचे २६ गुन्हे दाखल आहेत. ८ एफआयआर दाखल आहेत. सदरची माहिती त्यांनी २०१९ मध्ये निवडणूक आयोगाला शपथपत्रावर दिलेली आहे.

लोकप्रतिनिधीने जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी संसदेत प्रतिनिधित्व करायचे असते. उदयनराजेंनी लोकसभा / राज्यसभेवर प्रतिनिधीत्व करताना जिल्ह्यातील एकही प्रश्न उपस्थित केलेला नाही. उदयनराजेच्या तुलनेत शशिकांत शिंदे कामदार लोकप्रतिनिधी आहे. त्यामुळे शशिकांत शिंदे यांचे चारित्र्यहनन हा एकमेव अजेंडा भाजपकडून रेटला जात आहे. भाजपच्या या कृत्यातून त्यांच्या पायाखालची वाळू सरकल्याचे स्पष्ट दिसत आहे. शरद पवारांना हलक्यात घेतल्यास उदयनराजेंचे राजकीय करीअर अडचणीत येणार हे निश्चित!

**(साभार)**

लोकसंसद

## पर्यटन क्षेत्रात सुमारे ५. ८२ कोटी रोजगार

हल्ली पर्यटन क्षेत्राचा ट्रेंड पूर्णपणे बदलला आहे. अनेक जण आपल्या साठवलेल्या पैशातून हमखास कुठली ना कुठली ट्रिप आयोजित करत आहेत. यासाठी ते पैशाची थोडी थोडी बचत सुद्धा करत आहेत. त्यामुळे विविध पर्यटनस्थळांवर हल्ली गर्दी दिसते. या क्षेत्रात अनेक जण नोकऱ्या सुद्धा करत आहेत. यामध्ये गाईड, छायाचित्रकार टूर गाईड अशांचा समावेश आहे. दुभाषे यांना सुद्धा मोठा वाव आहे. कोविड १९ च्या साथीनानंतर यात विशेष वाढ झाली आहे. कित्येक जण परदेशी टूर ला सुद्धा जात आहेत. त्यामुळे अनेक यात्रा कंपन्या यात गजबजून गेल्या आहेत. एका आकडेवारीनुसार येत्या सुमारे नऊ वर्षात देशात जवळपास ५.८२ कोटी नोकऱ्या पर्यटन क्षेत्रात उपलब्ध होतील अशा या क्षेत्रातील जाणकारांचा विश्वास आहे एकट्या २०२३ या वर्षात सुमारे १६ लाखांना रोजगार दिला होता. अनेक परदेशी पर्यटक सुद्धा भारतातील अनेक जागतिक वारसा स्थळांना भेटी देत आहेत. त्यामुळे साहजिकच भारताला परदेशी चलन सुद्धा मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहे. भारतात सुमारे ४० जागतिक वारसा स्थळे आहेत साहजिकच परदेशी प्रवाशांना त्याची भुरळ आहे. आगामी दोन वर्षात या क्षेत्रात सुमारे २० टक्के वाढ होईल. एकूणच या क्षेत्रात रोजगाराच्या प्रचंड संधी निर्माण होत आहेत ही एक चांगली घटना आहे. देशातील बेरोजगारी काही प्रमाणात तरी कमी करण्याचे श्रेय देशातील पर्यटन क्षेत्राला जाणार आहे.

**- शांताराम वाघ**, पुणे

## मराठी साहित्यिक दिनविशेष

तीन मे

**१८८६:-** नाटककार, समाजसेवक विश्वनाथ गोपाळ शेट्ये यांचा जन्म. 'लोकशासन' हे त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर 'रक्षाबंधन', 'जुगारी', 'संगीत राम रहीम' अशी सामाजिक नाटकेही लिहिली. 'चितोडची राणी', 'संगीत पंढरपूर' ही संत चरित्र व पौरोणिक, तसेच 'संगीत बोहल्यावर' हे सामाजिक नाटक, 'अभागी', 'सुशीला' या कथा, 'गोड गुलकंद' ही दीर्घकथा आणि 'माझी जीवन स्मरणी' हे आत्मचरित्र, अशी साहित्य संपदा. **१९२३:-** शाहीर विश्वासराव कोंडोबा फाटे यांचा जन्म. नाटिका, वगनाटये आदी स्वरुपाचे लेखन. त्यामध्ये 'दहशतपूरचे दादा', 'मैना मुरळी' हे वगनाट्य, 'मुंबई महाराष्ट्राची' ही नाटिका, 'नवे फार्म भाग १, २' आणि 'भटकंती' हे आत्मवृत्त, अशी साहित्य संपदा. **१९२८:-** लेखिका कमल दत्तात्रेय राजूरकर यांचा जन्म. 'संवाद अनुभूतीचा व भारतीय सौंदर्यशास्त्र समीक्षा' हे ग्रंथ प्रकाशित. **१९२९:-** मराठी साहित्यक्षेत्रात कोश व सूची निर्मितीतील महत्वपूर्ण योगदानाप्रित्यर्थ 'साहित्य वाचस्पती' या उपाधीने सन्मानित झालेले लेखक डॉ. वसंत विष्णू कुलकर्णी यांचा जन्म. त्यांच्या लेखन संपदेत 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' यावरील ४० लेखांशिवाय एकूण २१ ग्रंथ त्यात 'ग्रंथालय शास्त्रावरील ८ ग्रंथ पुढीलप्रमाणे - 'ग्रंथालयीन व्यवस्थेची रुपरेखा', 'ग्रंथालय प्रशासन', 'संदर्भ साधनांचे प्रकार, भाग १', 'संदर्भ साधनांचे प्रकार भाग २', 'ग्रंथसूचीचे प्रकार', 'समंत्रण मार्गदर्शिका १', 'समंत्रण मार्गदर्शिका २', 'सेट नेट युनिट।।।', 'अभ्यास क्रमानुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र' याशिवाय त्यांनी संपादित केलेले १३ कोश पुढीलप्रमाणे - 'ग्रंथालयशास्त्र परिभाषा कोश', 'अभिनव सुविचार कोश', 'मराठी प्रबंध सूची', 'व्यक्तिविकास सुविचार कोश', 'वैदर्भीय मराठी प्रबंधसूची', 'पाच हजार आदर्श सुविचार कोश', 'ग्रंथालय आणि माहितीशास्त्रावरील मराठी ग्रंथांची सूची', 'प्राचार्य राम शेवाळकर साहित्य सूची', 'मराठी कोश व संदर्भ साधने यांची समग्र सूची', 'वैदर्भीय ग्रंथसंपदा', 'डॉ. गणेश त्र्यंबक देशपांडे', 'जन्मशताब्दी वाङ्मय सूची', आणि 'मराठी प्रबंधसूची' अशी साहित्य संपदा. **१९३२:-** सत्यशोधक विचारधारेतील खंदे पत्रकार आणि ब्राह्मणेतर चळवळ विचारांनी समृध्द करणारे कार्यकर्ते दिगंबर शंकर जवळकर यांचे निधन. लोकमान्य टिळकांनी आंतरजातीय विवाहाच्या बिलास विरोध दर्शविताच जवळकरांनी त्यावर 'प्रणवप्रभाव' हे नाटक लिहिले होते. काही लोकशिक्षणपर काव्यरचनाही त्यांनी केल्या. परंतु त्यांचे महत्त्वाचे लिखाण नैमित्तिक लेखांच्या स्वरुपात झाले. पुढे महाराष्ट्राच्या राजकीय विचारांच्या इतिहासाचे अभ्यासक य.दि. फडके यांनी जवळकरांचे समग्र वाङ्‌मय संपादित केली. **१९३४:-** लेखक गजानन वामनाचार्य यांचा जन्म. इंडिया, भारत आणि हिंदुस्थान या पुस्तकातून सामाजिक बांधीलकी असलेले २५ लेख. प्रत्येक लेखात ज्ञान-विज्ञान, प्रबोधन, व्यावहारिक बाबतीत मनन, चिंतन आणि शेवटी करमणूकही आहे. तसेच 'वाचणारा लिहितो' या पुस्तकातून सध्याच्या युगात 'वाचणे' आणि 'लिहिणे' या क्रियांचे प्रमाण कमी होऊन 'बोलणे' (फोन), 'ऐकणे' (ऑडिओ टेप आणि सीडी), आणि 'पाहणे' (टीव्ही डीव्हीडी) या क्रिया खूपच लोकप्रिय होताहेत. प्रसार माध्यमातील मजकूर वाचून, मनात निर्माण झालेले विचारतरंग कागदावर उतरविलेले २६ लेख आणि 'बाळ गोजिरे नाव साजिरे' हे पुस्तक गोजिऱ्या बाळासाठी साजेलसे नाव सहज सावे असा, संग्रही ठेवण्याजोगा, सुमारे १६,५०० नावांचा संग्रह आहे. सध्या त्यांचे 'पारंपारिक अध्यात्म आणि आधुनिक विज्ञान' या विषयावर लेखन सुरु आहे. **१९३६:-** लेखिका सुनेत्रा शंकर ओक यांचा जन्म. ह्यांची 'आय कन्फेस' ही कथा, 'घराबाहेर' ही कादंबरी आणि 'चेतसी' हे काव्य अशी साहित्य संपदा प्रकाशित झाली आहे. **१९४५:-** लेखक पेशाने होमिओपॅथी डॉ. आनंद भिकाजी पटवर्धन यांचा जन्म. 'होमिओपॅथिक रोगचिकित्सा' हा त्यांचा ग्रंथ. 'घरगुती औषध उपाय कसे करावेत' हा डॉ. ज्यूई यांच्या इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद आहे. **१९५१:-** लेखिका, बातमीदार दै. सकाळच्या उपसंपादिका सरिता श्रीकांत भावे यांचा जन्म. सकाळ, स्वराज्य, तरुण भारत इत्यादीतून लेख मुलाखतीसह ४०० हून अधिक लेख विविध विषयांवर प्रसिध्द. याखेरीज 'जीवन गंधा' हे दैनंदिन जीवनात स्त्रियांना घरच्या घरी उपयोग करता येईल असे माहितीवजा पुस्तक प्रसिध्द. **१९५२:-** लेखिका डॉ. वृंदा कौजलगीकर यांचा जन्म. 'मनरेखा' या कथासंग्रहासह 'गंध मनाचा' हा काव्यसंग्रह आणि 'उनाडक्या' ही एकांकिका त्यांच्या नावावर आहे. याशिवाय साहित्यात नवरसांवर आधारित त्या कार्यक्रम सादर करतात. कथाकथन तसेच नाटकातून भूमिका करणाऱ्या डॉ. वृंदा यांनी '१९६० नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी' या विषयावर प्रबंध लिहिला. **१९५८:-** लेखक ॲड. श्रीपाद जोगेवरराव पाटील यांचा जन्म. पेशाने वकील. ह्यांचे 'तबलावादन' हे शैक्षणिक, 'कैवल्याचा नजराणा' हा काव्यसंग्रह आणि 'दत्तस्मृती', 'दत्तलिलामृत' ही अध्यात्मक पुस्तके प्रसिध्द झाली आहेत. यातील 'दत्तस्मृती' ग्रंथ मराठी बाराखडीनूसार ओवीबध्द रचला आहे. **२०२३:-** लेखक दिग्दर्शक स्वप्निल मयेकर यांचे निधन. 'मराठी पाऊल ते पुढे' हा त्यांचा पहिला लेखन आणि दिग्दर्शक म्हणून केलेला चित्रपट तथापि तो प्रदर्शन होण्यापूर्वीच त्यांचे निधन झाले.

**- संजय वझरेकर**
९९७५५७६६७५

# विद्यार्थ्यांना मिळणार पाठ्यपुस्तके

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**समग्र शिक्षा अभियानातंर्गत रायगड जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या १ लाख ८४ हजार १६२ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी राज्य सरकारकडे केली आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.**



समग्र शिक्षा अभियानातंर्गत जिल्हा परिषद, नगरपालिका, खाजगी अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येते. यानुसार जिल्ह्यातील १ लाख ८४ हजार १६२ विद्यार्थ्यांना पुस्तके मिळावीत, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने राज्य सरकारच्या बालभारती विभागाकडे केली आहे. मागणी केलेली पुस्तके शिक्षण विभागाकडे उपलब्ध झाल्यानंतर, ही पुस्तके तालुकास्तरावरील गटशिक्षण अधिकाऱ्यांकडे देण्यात येतील. तेथून केंद्रप्रमुख तसेच मुख्याध्यापकांकडे पुस्तके पोहचविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना सर्व पुस्तके पहिल्याच दिवशी देण्यात येणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात येत आहे.

### मोफत पाठ्यपुस्तक देण्यात येणार

**जिल्ह्यात पहिली ते आठवीपर्यंत सर्वात जास्त ४९ हजार ९३३ विद्यार्थी पनवेल तालुक्यात असून, अलिबाग १३ हजार २२, पेण १५ हजार ३२५, उरण ९ हजार ५९८, कर्जत २० हजार ३५७, खालापूर १५ हजार ३३८, सुधागड ७ हजार ३०३, रोहा १० हजार ६१३, माणगाव ११ हजार ७६५, महाड ११ हजार २२९, पोलादपूर २ हजार ६४०, म्हसळा ४ हजार २६, श्रीवर्धन ५ हजार ७४९, मुरुड ४ हजार ७२८, तळा २ हजार ५३६ विद्यार्थी आहेत.**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ मे

१) श्रीम. सुशीला तिलोटकर
सासवणे, अलिबाग
०३-०५-१९३७

२) श्री. शरदचंद्र गोपाल पाटील
कामतआळी, अलिबाग
०३-०५-१९४९

३)श्री.कृष्णा शंकर गोंधळी
खंडाळा, अलिबाग
०३-०५-१९५१

४)श्री.विलास कृष्णाजी ठाकूर
अलिबाग
०३-०५-१९५६

५)श्रीम.ज्योती विनायक शिंपी
चेंढरे-अलिबाग
०३-०५-१९५६

## नागपूर विमानतळ बॉम्बने उडवण्याची धमकी जर्मनीहून!

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतराष्ट्रीय विमानतळला बॉम्बने उडवून देण्याच्या धमकीचा ई -मेल जर्मनीहून आल्याची माहिती समोर आली. नागपूर विमानतळ प्रशासनाला एक ई-मेल प्राप्त झाला होता. आता तपासादरम्यान हा मेल जर्मनीहून आल्याची बाब समोर आली आहे. विमानतळाला बॉम्बने उडवण्याचा ईमेल येताच बॉम्ब शोधक व नाशक पथक आणि श्वान पथक विमानतळावर तैनात करण्यात आले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**शकुंतला रामेश्वर कर्वे, स्मृतिदिन**

# प्रज्वल रेवण्णाना ग्लोबल लूकआऊट नोटीस

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जेडीएसचे नेते प्रज्वल रेवण्णा यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. रेवण्णा यांच्या सेक्स टेप प्रकरणी एसआयटी तपास करत आहे. एसआयटीने याप्रकरणी ग्लोबल लूकआऊट नोटीस जारी केली आहे. त्यामुळे प्रज्वल रेवण्णा यांना ताब्यात घेण्यासाठी यंत्रणा सक्रिय झाल्याचं दिसत आहे.

जगातील सर्व इमिग्रेशन पॉईंट्सना ही नोटीस पाठवण्यात आली आहे. कथित सेक्स टेप समोर आल्यानंतर रेवण्णा फरार झाले आहेत. ते जर्मनीत असल्याची माहिती आहे. या मुद्द्यावरुन मोठा वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसने या मुद्द्यावरुन भाजपला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. जेडीएसने याआधीच रेवण्णा यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. प्रज्वल हे माजी पंतप्रधान आणि जेडीएसचे प्रमुख एचडी देवेगौडा यांचे नातू आणि माजी मंत्री एचडी रेवण्णा यांचे पुत्र आहेत. जेडीएस हा एनडीएचा घटकपक्ष आहे. भाजप आणि जेडीएस एकत्र निवडणूक लढवत आहेत. प्रज्वल हे जेडीएसकडून हसन मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढवत आहेत.

# दोन ट्रकची भीषण धडक

## दोघांचा मृत्यू, ३०० बकऱ्या ठार

**। यवतमाळ । वृत्तसंस्था ।**

यवतमाळ पांढरकवडा मार्गावरील सायखेडा धरण फाट्याजवळ आज गुरूवारी सकाळी परस्पर विरुद्ध दिशेने धावणाऱ्या दोन ट्रकची भीषण टक्कर झाली. या अपघातात ट्रकमधील दोन जण जागीच ठार झाले, तर दोघे गंभीर जखमी झालेत. यासोबतच ट्रकमधून वाहतूक करण्यात येत असलेल्या जवळपास ३०० बकऱ्या अपघातात ठार झाल्या.

चंद्रपूर येथून सिमेंट भरून यवतमाळकडे निघालेल्या ट्रक (एमएच ४०- एम २८५८) आणि मध्यप्रदेशातून तेलंगणात बकऱ्या घेवून निघालेला ट्रक (एमएम ४०- सीटी ५५५८) या दोन ट्रकमध्ये समोरासमोर टक्कर झाली. सकाळी ६ ते ७ वाजताच्या दरम्यान हा अपघात झाला.

अपघातात ट्रकमधील दोघेजण जागीच ठार झाले, इतर दोघे गंभीर जखमी झाले. ट्रकमधील सुमारे ३०० बकऱ्या ठार झाल्याने रस्त्यावर मृत बकऱ्यांचा खच पडला होता. या अपघातात दोन्ही ट्रकचे मोठे नुकसान झाले. अपघातातील दोन्ही मृतांची ओळख पटली नव्हती.

जखमींना बाहेर काढण्यासाठी जेसीबीची मदत घ्यावी लागली. जखमींना तातडीने उपचारार्थ दवाखान्यात दाखल करण्यात आले. अपघातामुळे यवतमाळ पांढरकवडा मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहनांच्या दोन किलोमीटरपर्यंत लांब रांगा लागल्या होत्या.

त्यामुळे सकाळी हैद्राबाद, वणी, पांढरकवडाकडे जाणाऱ्या प्रवाशी अडकून पडले होते. काही वेळानंतर पांढरकवडा पोलिसांनी दोन्ही अपघातग्रस्त वाहनांना बाजूला करून वाहतूक सुरळीत केली.

पान १ वरुन

## वारं फिरलंय, जनतेचं ठरलंय

भरत गोगावले, नारायण राणे पैसा गोळा करण्यात इतके दंग झाले आहेत, की आपल्या लेकरांवर संस्कार करायलाच ते विसरले. विकास आणि त्याचा काहीही संबंध नाही असं नाव गोगावलेंनी ठेवले आहे, असा टोलाही सुषमा अंधारे यांनी गोगावलेंना लगावला.

भरत गोगावले यांनी एकनाथ शिंदे यांना मोठं करावं. सुनील तटकरे यांनी दादांना मोठं करावं, पण मोदींच्या नावाचा जप कशाला. हे म्हणजे दुसऱ्याच्या लग्नात बुंदी वाटण्यासारखं आहे, असे त्या म्हणाल्या.

महायुतीने महाडनगरीत सभा घेतली ती सभा लोकसभेच्या प्रचाराची कि नगरपालिका निवडणुकीची सभा होती असा प्रश्न महाडकर जनतेला पडला होता. महाडकरांवरील उपकाराची भाषा तटकरेंना शोभत नाही. आम्ही महाडवरील आपत्तीच्या प्रसंगात कौतुकाची थाप मिळविण्यासाठी शहरात फिरत नाही तर ते आमचे कर्तव्य आहे. महाडकरांना त्यांच्यासोबत कोण याची जाणीव आहे. यामुळे येत्या निवडणुकीत महाडकर त्यांचे कर्तव्य निश्‍चित बजावतील. माणिकराव जगताप यांच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी महाडकर सज्ज झाला आहे, असे महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप यांनी सांगितले.

रायगड लोकसभा मतदार संघाच्या २०१९ च्या निवडणुकीत सुनील तटकरेंच्या व्यासपीठावर येण्यास महाडचे आधारस्तंभ माणिकराव जगताप येण्यास तयार नव्हते. त्यांनी तटकरेंच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून गद्दारी रक्तात असणाऱ्यांसोबत जाऊ नका असे सांगितले होते. त्याचा प्रत्यय महाराष्ट्रातील पक्ष फोडीच्या कारवायांमध्ये पहावयास मिळाला. महाराष्ट्राची अस्मिता असणारे राजकीय पक्ष फोडण्यात टाकणारे अग्रेसर राहिले. शरद पवारांच्या गळ्यातील ताईत असलेल्या तटकरेंनी त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला. अशा गद्दार असणाऱ्या तटकरेंना मतदारांनी जागा दाखवायला हवी. मराठा आरक्षणाच्या आंदोलनात मराठ्याचे रक्त सांडविणाऱ्या भाजप सरकारच्या उमेदवाराला हद्दपार करण्याची संधी रायगडच्या मतदारांना लाभली आहे, असे मत शिव विचारवंत सुभानअली शेख यांनी व्यक्त केले.महायुतीचे उमेदवार काळ्या पैशाचा वापर करून या निवडणुकीत जिंकण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु ज्यांनी गद्दारी केली आहे, त्यांना घरची वाट दाखविण्याचा निर्धार जनतेने केला आहे. ही परिस्थिती महाडमध्ये नव्हे, तर संपूर्ण लोकसभा मतदार संघात आहे. महाडमध्ये पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी उध्दव ठाकरे मुख्यमंत्री होते. त्यांच्या आदेशानुसार मदतीचा हात देण्यात आला. मात्र खासदार आणि आमदार म्हणतात. आम्ही मदत केली. परंतु, आताचे खासदार आणि आमदार यांनी स्वतःच्या झोळ्या भरण्याचे काम केले आहे. तटकरे कुटुंबियांचे त्या काळात गोडाऊन होते. आलेला निधी साहित्य त्यांच्या एजंटमार्फत गोडाऊनमध्ये टाकून करोडो रुपयांची लूट करण्याचे काम त्यांनी केले. असा आरोप शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे अनिल नवगणे यांनी केला.

## ‘एमआयएम दंगलीच्या तयारीत’

मी काम करीत आहे. शहरात काही होऊ नये, यासाठी प्रयत्न आहे. त्यासाठी एमआयएमला संपवून टाकायचे आणि शहर शांत ठेवायचे, ही माझी भूमिका आहे, असे खैरे म्हणाले. लेबर कॉलनी येथील घटनेप्रकरणी एमआयएम शहरात दंगल घडविण्याच्या प्रयत्नात असल्याचा आरोप विरोधी उमेदवाराकडून करण्यात येतोय, या प्रश्नावर उमेदवार तथा खा. इम्तियाज जलील यांनी बोलताना सांगितले की, विरोधकांकडून अनेक आरोप होतील. तर मी प्रत्येकाचे उत्तर देत बसणार आहे का? राहिला प्रश्न खैरे यांच्या आरोपाचा; तर मी एवढेच म्हणेन फिजूल लोग, फिजूल सवालों का मैं जवाब नहीं देता.हवे तर खैरे यांनी पोलीस ठाण्यासमोर धरणे देत बसावे. माझे काहीही म्हणणे नाही.

## उन्हेरे धरणात तरूणाचा मृत्यू

हळदीसाठी सुधागड तालुक्यात आला होता. बुधवारी (ता.१) तो आपल्या मित्रांसमवेत उन्हेरे येथील धरणात पोहण्यासाठी गेला. मात्र पोहता येत नसल्याने व पाण्याचा अंदाज न आल्यामुळे सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास तो धरणामध्ये बुडाला. गुरुनाथ साठीलकर यांच्या अपघात ग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे विजय भोसले, दर्श अभानी, राजेश पारठे, महेश भोसले, विशाल चव्हाण, सौरभ घरत, ओम ठकेकर, जय भोसले, निलेश यादव व प्रदीप गोळे यानी अद्ययावत उपकरणांच्या सहाय्याने या तरुणाचा मृतदेह बाहेर काढला. यावेळी पाली पोलीस देखील त्या ठिकाणी उपस्थित होते. सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांनी सदर ठिकाणी पंचनामा केला. तर रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी शैलेश कोळी व पाली पोलीस स्थानकाच्या पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण यांनी घटनास्थळी भेट दिली.

## क्रिकेटच्या वादातून मृत्यू; आरोपीला जन्मठेप

येथील प्राथमिक शाळेच्या पटांगणात क्रिकेट खेळत होते. या दरम्यान विनोद बामणे व गणेश खेरटकर यांच्यात वाईट बॉलवरून वाद झाला होता. आरोपी गणेश खेरटकर याने रागाच्या भरात विनोद बामणे याच्या डोक्यात बॅटने तीन ते चार वेळा मारहाण केल्याने तो गंभीर जखमी झाला होता. रोह्यात प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी त्याला मुंबई येथे नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. त्यानुसार आरोपी गणेश खेरटकर याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## विजयाचा गुलाल गीतेंचाच

आहेत. त्यांना आम्हीच निवडून दिले. आम्हाला आशा होती की रायगड जिल्ह्यातील अनेक प्रलंबित असलेले प्रश्न ते निकाली काढतील. परंतु, त्यांनी एकही रायगड जिल्ह्याचा प्रश्न मार्गी लावला नाही. मुंबई-गोवा महामार्ग आजही अपुऱ्या स्थितीत आहे. बाळगंगा धरण प्रकल्पात बाधित शेतकऱ्यांचे पुनवर्सन, खारेपाटातील सिंचन, रोजगार, प्रदुषण, पर्यटन यासारखे अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यांना एकही प्रश्न मार्गी लावता आला नाही. गेल्या पाच वर्षात तटकरे यांनी कोणती कामे केली त्यांनी ते जनतेसमोर आणावी. लांबपल्ल्याची एकही गाडी त्यांना रायगडमध्ये थांबवता आली नाही. आता पुन्हा त्यांच्या आश्वासनामध्ये तेच प्रश्न आणि तीच आश्वासने आहेत. नवा गडी नवे राज्य असे वाटले होते. परंतु, नवा गडी राज्य मात्र जुनेच आहे, असे पंडित पाटील म्हणाले. यावेळी त्यांच्या समवेत शेकापचे माजी सभापती महादेव दिवेकर, शिवसेनेचे तालुका प्रमुख जगदीश ठाकूर, जोहे सरपंच सचिन पाटील आदी उपस्थित होते.

## मंदिरे लुटणारी टोळी गजाआड

सीसीटीव्ही कॅमेराच्या मदतीने चोरट्यांचा शोध सुरू झाला. सीसीटीव्ही कॅमेरात कैद झालेल्या अज्ञातांची यांची माहिती घेण्यात आली.त्यांच्या वर्णनाची मंडळी पनवेलमध्ये असल्याचे समजले. त्याठिकाणी पथक रवाना झाला. मात्र ते गोवा येथे गेल्याची माहिती मिळाल्यावर पथक गोव्याला रवाना झाले. मात्र त्या चोरट्यांनी म्हापसा येथील मंदिर लुटून ते सावंतवाडीकडे गेल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी त्यांचा पाठलाग सुरुच ठेवला. अखेर चौघांना सावंतवाडीला ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केल्यावर त्यांच्याकडे सात लाख दोन हजार ८०० रुपयांची रोकड सापडली. ही रोकड जप्त केली. राजू शेख, इम्रान शेख व राकीब शेख व मुजाहिद खान या चौघांना अटक करण्यात आली.

**महड येथील मंदिर चोरीचा डाव फसला**

मंदिर चोरणारी आंतराज्य, आंतरराष्ट्रीय टोळी असून त्यांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्यांच्या मोबाईलची तपासणी केली असता, त्यामध्ये महड येथील गणेश मंदिराचे फोटो दिसून आले.त्यामुळे महड येथील गणेश मंदिरात चोरी करण्याचा त्यांचा डाव फसला असल्याचा अंदाज पोलीस अधीक्षक घार्गे यांनी वर्तवला.

**रेकी ठेवून करीत होते चोरी**

राजू शेख, इम्रान शेख व राकीब शेख व मुजाहिद खान हे चौघेही नोकरी, व्यवसायानिमित्त बेलापूर येथे मुजाहिद खानसोबत गेल्या पाच वर्षापासून राहत आहेत. बिगारीची कामे करून हे चौघेजण दिवस घालवित होते. मंदिरात चोरी करण्यापुर्वी एक दिवस अगोदर त्या परिसरातील पाहणी करणे, तेथील छायाचित्र काढणे अशा पध्दतीने चोरी करण्यापुर्वी ते रेकी करीत होते. या चौघांनी यापुर्वी गोवा म्हापसा, जुना पूणे हायवे पुणे - शिरूर आणि टिटवाळा येथील मंदिरे फोडून चोरी केल्याची माहिती उघड झाली आहे.

## ‘आरक्षणाबाबत मोदींचा खोटा प्रचार’

विकास कामांवर बोलावे, जी कामे अपूर्ण आहेत त्यावर बोलावे. अब की बार ४०० पार असा आत्मविश्वास मोदींचा असेल तर मग अशा खोट्या प्रचाराची का आवश्यकता भासत आहे याचे आश्चर्य वाटत असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.सॅम पित्रोदा हे भारताचे नागरिकही नाहीत, त्यांनी कुठे वक्तव्य केले त्याचा भारताशी काहीही संबंध नसताना वारसा कर लावला जाईल असा कांगावा मोदी यांच्याकडून केला जात आहे तो अत्यंत चुकीचा आहे. उलट भारतात लागू असलेला वारसा कराचा कायदा राजीव गांधी पंतप्रधान असताना १९८५ मध्ये रद्द करण्यात आला, याकडे चव्हाण यांनी लक्ष वेधले.जनतेचा मोदी सरकारवरील विश्वास उडालेला आहे, परत सत्तेवर येऊ की नाही याबाबत मोदींना आत्मविश्वास राहिलेला नाही म्हणून ते खोटी भीती घालून, धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे चव्हाण यांनी सांगितले.काळा पैसा एका व्यक्तीच्या नावावरपरदेशी बँकेत असलेला काळा पैसा भारतात आणण्याचे आश्वासन मोदींनी दिले होते. काळ्या पैशाबाबतची संपूर्ण माहिती स्वीस बँकेकडून तसेच पनामा पेपर्सच्या माध्यमातून सरकारकडे आहे. त्यांची नावे, पत्ते, रक्कम याची माहिती असूनही केंद्र सरकार कारवाई करत नाही. केवळ सेटलमेंट करण्यात येत आहे. आता हा सगळा काळा पैसा भारतातील एका व्यक्तीच्या खात्यावर जमा झाला असल्याची माहिती पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली.

## महिला आयोगातून २२३ कर्मचाऱ्यांची हकालपट्टी

समितीने २ जून २०१७ रोजी अहवाल सादर केला. समितीचे असे मत होते की, अशा प्रकारे निर्माण केलेली २२३ पदे आणि महिला आयोगाद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती अनियमित होती. कारण ठरवून दिलेल्या प्रक्रियेचे पालन केले गेले नाही आणि नायब राज्यपालांचीही मंजुरी घेतली नव्हती. त्यामुळे दिल्ली महिला आयोगाने डीसीडब्ल्यू नियम तरतुदींचं उल्लंघन केले. डीसीडब्ल्यूने केलेल्या या सर्व अनियमितता आणि बेकायदेशीरतेची दखल घेऊन नायब राज्यपालांनी नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या मंजूर पदांशिवाय आणि योग्य प्रक्रियेचे पालन न केल्याने रद्दबातल ठरवले.


## अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
## जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२४ दि.

| अ. क्र. | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/गाळा वगैरे | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १४४०/०१७०५ | कामतआळी, अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०१ | विजय लक्ष्मण कदम | स्नेहल विलास म्हात्रे व धनश्री युगांत म्हात्रे |
| २ | २ | ५५१/००७३३ | चेंढरे, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. ४ | मनोज बाळाराम पाटील | कैलास दत्तोबा टकले |
| ३ | २ | १६५०/०१९७४ | ब्राह्मणआळी, अलिबाग | तळमजला निवासी गाळा क्र. १ | कुदुमिनी रमेशचंद्र शेठ | अनंत देवजी पाटील व वृषाली अनंत पाटील |
| ४ | २ | १०७७ B- विंग/४/०४७५० | पागाची गल्ली अलिबाग | पहिला मजला, बी विंग निवासी सदनिका क्र. बी १०४ | गीता अमृत जैन व अमृत विजयराज जैन | मनस्वी महेंद्र पाटील |
| ५ | २ | १३६८/०५०८१ | ब्राह्मणआळी अलिबाग | तिसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३०३ | मे. दिपम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे पार्टनर मोहनिश दिलीप जोग व दिपा दिलीप जोग | माधवी मुकुंद शेजवलकर |
| ६ | २ | १६३८/०१९६० | ब्राह्मणआळी अलिबाग | पहिला मजला,निवासी सदनिका क्र. १०२ | रोहन प्रमोद टिल्लू व प्रणव प्रमोद टिल्लू | चिन्मय रामेश्वर टिल्लू |
| ७ | २ | १५९७/अ/०१९११ | रामनाथरोड अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०१ | प्रसाद कविश्वर साने | पुजा गजानन म्हात्रे |
| ८ | २ | ३१४/अ/००३८८ | मेटपाडा, कोळिवाडा अलिबाग | घर | कृष्णा शिवराम पेरेकर | सत्यजित हरिश्चंद्र पेरेकर |
| ९ | २ | ३१८/००३८९ | मेटपाडा, कोळीवाडा अलिबाग | निवासी सदनिका क्र. १ | कृष्णा शिवराम पेरेकर | सत्यजित हरिश्चंद्र पेरेकर |
| १० | २ | १५६४/०१८६४ | एस.टी. स्टॅण्ड, अलिबाग | दुसरा मजला, ए विंग निवासी सदनिका क्र. २०६/१८ | रफिका मकसुद चोगले | नुजैद बिलाल खान |
| ११ | २ | ६००/०५०६५ | चेंढरे, अलिबाग | पाचवा मजला, निवासी सदनिका क्र. ५०२ | मे. रेडियंट इन्फ्रातर्फे पार्टनर जगदीश बिखचंद कटारीया व कविता लच्छमण कटारिया | लच्छमण बिखचंद कटारिया |
| १२ | २ | १४८३ Dविंग/०४१३६ | स्टेट बँकेजवळ, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. डी-१०४ | मे. इनामोर रिॲल्टी प्रायव्हेट लि.तर्फे डायरेक्टर अशोक छगनलाल ठक्करतर्फे कबुलीजबाबाकरिता अखत्यारी समीर सुरेश विचारे | रुपेशकुमार प्रभाकर पाटील व प्रभाकर रघुनाथ पाटील |
| १३ | २ | १५८९/अB/ ०४८५८ | रामनाथ रोड, अलिबाग | दुसरा मजला, अे विंग, निवासी सदनिका क्र. २०६ | मे. रसिका कन्स्ट्रक्शनतर्फे भागीदार जयंत मधुकर वाखारकरतर्फे कबुली जबाबाकरिता अखत्यारी मनाली भरत माळी | दिलीप सदाशिव सुर्वे व स्मिता दिलीप सुर्वे |
| १४ | २ | १५९७ब/B wing/ ०३७७५ | रामनाथ रोड, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०३ | रश्मी रविंद्र महाडिक व विराज रविंद्र महाडिक तर्फे अखत्यारी रविंद्र दत्तात्रेय महाडिक | विनायक सदाशिव नाईक |
| १५ | २ | ७८८/०३८३८ | जुना भाजीमार्केट, अलिबाग | पहिला मजला, ए विंग निवासी सदनिका क्र. १०१ | रुपेश कांतीलाल जैन व अक्षदा रुपेश जैन | मनोहर भारती गोश्वामी |
| १६ | २ | १८३७/३/०४४०७ | कलेक्टर रोड, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. २०४ | एकॉन्स रिअल्टर्सतर्फे प्रो प्रा. शर्मिला अरुण गुलाटीतर्फे अखत्यारी अरुण खजानचंद गुलाटी | नंदा बाळकृष्ण दिघे व सुरज बाळकृष्ण दिघे |
| १७ | २ | १२७६/०१५४० | बालाजीनाक्या जवळ, अलिबाग | तळमजला, व्यापारीगाळा क्र. ११ | सुधीर भालचंद्र साखरे व सायली सुधीर साखरे | ओमकार गणेश पाठारे |
| १८ | २ | १२७६/०१५४२ | बालाजीनाक्या जवळ, अलिबाग | तळमजला, व्यापारीगाळा क्र. १२ | सुधीर भालचंद्र साखरे व सायली सुधीर साखरे | ओमकार गणेश पाठारे |
| १९ | ३ | ३८ श्रीबाग२/०२५६९ | श्रीबाग२, अलिबाग | घर | सुषमा विष्णू वर्तक व सुशिल विष्णू वर्तक | संतोष विष्णू वर्तक |
| २० | २ | १७७९/०२१०५ | कलेक्टर ऑफीस शेजारी, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०३ | मे.रत्ना रिअल्टर्सतर्फे प्रोप्रा. कमलेश जयरामदास तलरेजा | अरुंधती अजित पाटील |
| २१ | २ | १७००/०२०२१ | जिल्हान्यायालयाजवळ, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०६ | सलोनी परेश अडूरकर व परेश सुरेश अडूरकर | प्रशांत मोहन नार्वेकर व कांचन प्रशांत नार्वेकर |
| २२ | २ | ६४६/०५०९८ | चेंढरे, अलिबाग | पहिला मजला, ए विंग निवासी सदनिका क्र. २०१ | विनायक हरिश्चंद्र कोळगांवकर, शार्दुल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्सतर्फे भागीदार प्रशांत दिनकरराव फुलगावकर व कविता प्रशांत फुलगावकर | प्रथमेश प्रकाश कदम |
| २३ | २ | १६१९अ/१Eविंग/०४६५७ | ब्राह्मणआळी, अलिबाग | पहिला मजला, ई विंग निवासी सदनिका क्र. १०१ | मे. सावित्री कंन्स्ट्रक्शनतर्फे मुकेश बी जैन कबुलीजबाबाकरिता अखत्यारी सुभाष जैन | केतन शाम पाटील |
| २४ | २ | ४३३/अ विंग/००५१९ | ठिकरुळनाक्या जवळ, अलिबाग | तळमजला, वाणिज्यगाळा क्र. ६ | मंगेश दामोदर म्हात्रे | विश्वास शंकर म्हात्रे |
| २५ | ३ | १३५३/०१६२० | ब्राह्मणआळी, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. १०१ | गिता नरेश साटम | निरंजन नरेश साटम व अमेय नरेश साटम |
| २६ | २ | २०३८/Bविंग/०२५१३ | रायवाडी चेंढरे, अलिबाग | रेज्ड पहिला मजला, निवासी सदनिका क्र.५ | विजय जगन्नाथ सोमण व अंजली विजय सोमण | मयुर सुहास भातखंडे व किशोरी मयुर भातखंडे |
| २७ | २ | १६२४/Aविंग/०१९४६ | ब्राह्मणआळी, अलिबाग | तळमजला, ए विंग व्यापारी गाळा क्र. १ | अनिरुद्ध विष्णू आठवले | हिरालाल चोलाराम जाट |
| २८ | २ | १२८२अ/०१५४६ | बालाजीनाक्या जवळ, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र.(१०१)३ | राजेश गोपाळ पाटील | अश्विनी उदय पाटील |
| २९ | २ | /०२५६२ | श्रीबाग २, अलिबाग | तळमजला, निवासी सदनिका क्र. १-A (०१) | नंदकुमार लपालीकर | चित्रा रविंद्र राजदेरकर |
| ३० | २ | /०२५६२ | श्रीबाग २, अलिबाग | तळमजला, निवासी सदनिका क्र. १-B (१) | नंदकुमार लपालीकर | रविंद्र मुरलीधर राजदेरकर |
| ३१ | २ | ५९२/अ/०४९६४ | चेंढरे, अलिबाग | तळमजला, गाळा क्र.०५ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | व्यास श्रीजंगी सिंघ व पुनमदेवी व्यास सिंघ |
| ३२ | २ | ५९२/अ/०४९६३ | चेंढरे, अलिबाग | तळमजला, गाळा क्र.०४ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | अरविंद विष्णू केमकर व अनुजा अरविंद केमकर |
| ३३ | २ | ५९२/अ/०४९६७ | चेंढरे, अलिबाग | तळमजला, गाळा क्र.०८ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | चेतन जगदीश कवळे व मिनल चेतन कवळे |
| ३४ | २ | ५९१/अ/०४९८३ | चेंढरे, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका क्र. १०३ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | कल्पेश राजेंद्र म्हात्रे व कोमल कल्पेश म्हात्रे |
| ३५ | २ | ५९१/अ/०४९७१ | चेंढरे, अलिबाग | पहिला मजला, निवासी सदनिका १०४ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | अनघा आनंद करंबत व आनंद पांडुरंग करंबत |
| ३६ | २ | ५९२/अ/०४९७३ | चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका २०२ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | प्रज्ञा मोहन बानकर व मोहन बाबूराव बानकर |
| ३७ | २ | ५९२/अ/०४९७३ | चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका २०३ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | संध्या श्याम वाकडे व श्याम बाळकृष्ण वाकडे |
| ३८ | २ | ५९२/अ/०४९७३ | चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका २०४ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | निलेश प्रभाकर नाक्ती, व शुभांगी निलेश नाक्ती |
| ३९ | २ | ५९२/अ/०४९७३ | चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका ३०४ | मे. क्रिश कंन्स्ट्रक्शनतर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | हरिराम प्रभुदयाल भोजाका |
| ४० | २ | १०७३Bविंग/०५०२६ | छत्रपती शिवाजी चौक, अलिबाग | तिसरा मजला बी विंग, निवासी सदनिका क्र. ३०४ | प्रशांत मधुसुदन नाईकतर्फे कबुलीजबाबाकरिता अखत्यारी धनंजय अनंत दळवी | मीरा मंदार वर्तक व मंदार मनोहर वर्तक |
| ४१ | २ | २०३८/Aविंग/०२५१२ | रायवाडी चेंढरे, अलिबाग | दुसरा मजला, निवासी सदनिका क्र. ३ बिल्ट | मिरा मंदार वर्तक व मंदार मनोहर वर्तक | योगेशकुमार |
| ४२ | २ | १८२८/०२१६१ | कलेक्टर रोड, अलिबाग | सदनिका क्र. १ | मुनवर अब्दुल कादर वेग | जागार्टीअस वेंचरसतर्फे पार्टनर विमल सागरमल जैन व शीला विमल जैन |
| ४३ | २ | १८२८/अ/०२१६२ | कलेक्टर रोड, | सदनिका क्र. १ | मुनवर अब्दुल कादर वेग | जागार्टीअस वेंचरसतर्फे पार्टनर विमल सागरमल जैन व शीला विमल जैन |
| ४४ | २ | १४५२Aविंग/०१७१४ | स्टेट बँकेजवळ, अलिबाग | दुसरा मजला, अे विंग निवासी सदनिका क्र. २०३ | मयुर असोसिएट्सतर्फे प्रोप्रा. श्री. पारस बाबुलाल जैन | उषा रमेश करंजवाला व रमेश जयराम करंजवाला |

सही/-
मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद

# कोट्यवधींचा निधी लाटण्याचा प्रयत्न ?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**सरकारी निधी लाटण्याचा प्रयत्न सुरु आहे. एका विकसकाने तोडलेली भिंत सरकारी पैशातून बांधण्याचा घाट घातला जात असल्याची जोरदार चर्चा आहे. जुन्या भिंतीच्या कामासाठी नवीन बांधकाम करण्याचा प्रकार होत असल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. सदरचे काम किती खर्चाचे आहे याबद्दल ग्रामपंचायत देखील अभिज्ञ आहे.**



नेरळ गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने खेळाचे मैदान आहे. या मैदानाचा वापर एका विकसकाने आपले बांधकाम साहित्य ठेवण्यासाठी केला होता. त्यानंतर बांधकाम साहित्य नेण्यासाठी मैदानाची जुनी संरक्षक भिंत तोडून टाकली आणि आपले काम पूर्ण झाल्यावर भिंत बांधून देण्याचे नेरळ ग्रामपंचायतीला लेखी कळविले होते. मात्र, तीन वर्षात त्या ठिकाणी नवीन भिंत बांधण्याचे कोणतेही काम झाले नाही. आता त्याच मैदानाची संरक्षक भिंत बांधण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यामुळे त्या विकसकाने दिलेल्या पत्राचे काय झाले तसेच मैदानाची नासधूस झालेली असताना संबंधिताकडून कोणत्याही प्रकारची भरपाई नेरळ ग्रामपंचायतीने का घेतली नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास निधीमधून छत्रपती शिवाजी महाराज मैदानात संरक्षण भिंत आणि अन्य सुशोभीकरणाची कामे केली जाणार आहेत. मात्र, सध्या जुन्या भिंतीचे प्लास्टर काढून त्यावर नवीन दोन थर बांधकाम करून जुन्या भिंतीला नवीन करण्याचा प्रयत्न सुरु आहे. निधी लाटण्याच्या उद्देशाने जुन्या कामाला नवीन रूप देण्याचे प्रयत्न सुरु असून तेथे शासनाकडून मंजूर केलेले काम नियमानुसार व्हायला हवे, रस्त्याकडेही नेरळ ग्रामपंचायतीने लक्ष केंद्रित करायला हवे, अशी स्थानिक ग्रामस्थांची मागणी आहे.

सद्यस्थितीत या मैदानावर अपवाद वगळता सर्व भागात चांगल्या स्थितीत असलेली दगडी भिंत आहे. २०१४ मध्ये बांधण्यात आलेल्या भिंतीचे काम चांगल्या दर्जाचे असल्याने छत्रपती शिवाजी महाराज मैदान आजही सुरक्षित आहे, असे असताना कोट्यवधींचा निधी मैदानाची भिंत बांधण्यासाठी कशासाठी पाहीजे, निधी लाटण्यासाठी अशी कामे मंजूर करून घेण्यात आली आहेत काय?, राज्य सरकारच्या प्रादेशिक पर्यटन विकासमधून मैदानाच्या संरक्षण भिंतीसाठी निधी मंजूर केला आहे काय? असे अनेक प्रश्न नेरळ ग्रामस्थ विचारत आहेत.

> आमच्याकडे मैदानाच्या कामाबद्दल तक्रारी येत आहेत. त्यामुळे आम्ही देखील त्या कामाचे अंदाजपत्रक मागत आहोत. संबंधित विभागकडून अंदाजपत्रक आल्यानंतर नक्की कोणती कामे त्या निधीमधून केली जाणार आहेत. याची माहिती ग्रामपंचायतीकडे असणार आहे. त्यानंतर ती कामे अंदाजपत्रकानुसार होतात किंवा नाही याची पाहणी ग्रामपंचायत करणार आहे.
>
> - अरुण कारले
> ग्रामविकास अधिकारी,
> नेरळ ग्रामपंचायत

# विद्या विकास शाळेत शिबीर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

येथील विद्या विकास मंडळ संस्थेच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. १५ दिवसीय व्यक्तिमत्व विकास शिबिरात विद्यार्थ्यांना अनेक प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले असून सलग दुसऱ्या वर्षी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



१५ एप्रिल २०२४ ते २७ एप्रिल २०२४ या कालावधीत व्यक्तिमत्त्व विकास शिबिर पार पडले. १०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग असलेल्या या शिबिराचे उद्घाटन विद्या विकास मंडळाचे कार्यवाह अमित जोगळेकर आणि विद्या विकास मंडळाचे सदस्य विनायक पिंपुटकर यांच्या हस्ते पार पडले. यावेळी माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका शैलजा निकम तसेच इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका, प्राथमिक विभागाच्या ज्येष्ठ शिक्षिका, बालवाडी विभागाच्या ज्येष्ठ शिक्षिका तसेच सहशिक्षीका व विद्यार्थी उपस्थित होते.

विद्या विकास मंडळाचे माजी उपाध्यक्ष तसेच सल्लागार सदस्य अरुण धारप यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा व्यक्तिमत्त्व विकास शिबिर कार्यक्रम सलग दोन वर्षे अतीशय सुंदर प्रतिसादात सुरू आहे. या कार्यक्रमाचा समारोप प्रसंगी यावेळी संस्थेचे कार्यवाह अमित जोगळेकर तसेच मुख्याध्यापिका शैलजा निकम, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विनया काकडे तसेच सर्व शिक्षिका यांनी या शिबिरात सहभागी झालेल्या प्रशिक्षकांना विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या वस्तू भेट म्हणून दिल्या. या पंधरा दिवसांच्या कालावधीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विविध कलागुण विकसित करण्याचा प्रयत्न केला. या शिबिरात विद्याविकास मंडळाच्या सदस्या आणि माजी मुख्याध्यापिका आसावरी काळे यांनी विद्यार्थ्यांना छान गोष्टी शिकवल्या. ज्येष्ठ शिक्षिका तुपगावकर यांनी विद्यार्थ्यांना योगा प्रशिक्षण दिले. शिक्षिका गोतारणे, कांचन, रोशनी गोळे यांचा देखील या शिबिरात सहभाग होता. त्यावेळी शाडूच्या मूर्ती बनविणारे मूर्तिकार यांनी मातीपासून गणेशमूर्ती कशी बनवावी हे शिकवले. बँकेच्या कामकाजाची माहिती देण्यात आली. विद्यार्थी-पालक या उपक्रमाने खुश होते.

# माथेरानमध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून ध्वजारोहण

**। नेरळ । वार्ताहर ।**

महाराष्ट्र स्थापना दिनानिमित्त माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेच्या बीजे रुग्णालयात ध्वजारोहण करण्यात आले. महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिन असल्याने बीजे रुग्णालयात सफाई कामगार म्हणून सेवा बजावत असलेले कर्मचारी सखाराम सांबरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सखाराम सांबरी यांच्या सारख्या सामान्य कामगाराला ध्वजारोहण करण्याची संधी दिल्याने कामगार वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली मिसाळ यांनी आपल्या कर्मचारी वर्गाला सन्मान देण्याचे निर्णय घेतला आणि सफाई कामगार सखाराम सांबरी यांना ध्वजारोहण करण्याची संधी दिली. महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त शासकीय कार्यलयात ध्वजारोहण केले गेले. लोकसभा निवडणूक असल्याने राजकीय व्यक्ती किंवा माथेरान गिरिस्थान नगरपरिषदेचे पदाधिकारी यांचे हस्ते ध्वजारोहण केले जाणार नव्हते. त्यामुळे माथेरान पालिकेच्या बीजे रुग्णालयात नियमाप्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांचे हस्ते धवजरोहण होणे अपेक्षित होते.

माथेरान डोंगरातील आसलवाडी येथून सखाराम हे चालत माथेरान गाठतात. कर्तव्यावर असताना सखाराम सांबरी हे रुग्णालयात सेवा बजावताना आपली सेवेची वेळ न पाहता कितीही उशीर झाला, तरी त्याबद्दल कोणतीही कुचराई किंवा टाळाटाळ करत नाहीत. त्यामुळे डॉ. मिसाळ यांनी महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण करण्याची संधी सखाराम सांबरी यांना दिली. सांबरी यांनी देखील अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

## श्रमदानाने कामगार दिन साजरा

**नेरळ :** माथेरानमध्ये कार्यरत असलेल्या कुशल कामगार संघटनेच्यावतीने शहरातील कचरा संकलन आणि प्रेक्षणीय स्थळांवर असलेल्या लोखंडी रेलिंगची दुरुस्ती मोहीम राबवण्यात आली. आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून स्वच्छ्ता कामगारांनी श्रमदान करून आगळावेगळा पायंडा पाडल्याचे बोलले जाते. महाराष्ट्र राज्य स्थापना दिवस आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्यानिमित्ताने कुशल कामगार संघटनेने श्रमदान करण्याचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी श्रमदान करण्यात आले.

# श्री रत्नेश्वरी देवीची सर्वात मोठी जत्रा

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यात आगरी, कोळी, कराडी समाजाचे लोक मोठ्या संख्येने राहत आहेत. समाजातील बांधवांच्या ग्रामदैवताच्या जत्रा उत्सवाला सध्या गावा गावात सुरुवात झाली आहे. त्यामुळे या समाजाबरोबर इतर समाजातील बांधव गावोगावच्या ग्रामदैवतांच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात गर्दी करत असल्याचे दिसून येत आहे. तालुक्यातील जसखार गावातील श्री रत्नेश्वरी देवीची जत्रा, पालखी उत्सव हा सर्वात मोठा उत्सव असतो. यावेळी लाखोंच्या संख्येने जनसमुदाय, भक्त गण उपस्थित राहून श्री रत्नेश्वरी देवीच्या चरणी माथा टेकवून आपआपल्या कुटुंबाला सुख समाधान दे अशा प्रकारचे साकडे घालतात.



उरण तालुक्यातील जसखार गावातील श्री रत्नेश्वरी देवी, करंजा गावातील श्री द्रोणागिरी देवी, नवीन शेवा गावची श्री शांतेश्वरी देवी, डोंगरी गावची श्री अंबामाता, चिरनेर गावची श्री गावदेवी माता, फुंडे गावची श्री घुरबादेवी, कोप्रोली गावची श्री जरीमरी आई, कोट गावचा श्री राघोबा देव, तसेच इतर गावाचे ग्रामदैवत श्री बापूजीदेव या ग्रामदैवतांच्या जत्रा उत्सवाला सुरुवात ही कार्ला येथील श्री एकवीरा देवीच्या जत्रा उत्सवानंतर झाली आहे.

जसखार गावातील श्री रत्नेश्वरी देवी ही नवसाला पावणारी देवी म्हणून संपूर्ण रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई परिसरात श्री देवीची ख्याती आहे. एक जागृत देवस्थान म्हणून हजारो भक्त दरवर्षी रत्नेश्वरी देवीच्या चरणी माथा टेकवतात. श्री देवीच नवीन मोठ मंदिर देखील भाविकांना एक भक्तिमय अनुभव देऊन जातो. अशा ग्रामदैवताच्या जत्रा उत्सवाला सध्या सुरुवात झाली असून हजारो लाखो भाविक हे आपल्या लाडक्या श्री ग्रामदैवतांच्या दर्शनासाठी मंदिर परिसरात गर्दी करताना दिसत आहेत.

## महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**आगरदांडा :** महाराष्ट्र राज्याचा ६५ वा वर्धापन दिनानिमित्त मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील प्रांगणात प्रशासक तथा मुख्याधिकारी-पंकज भुसे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सकाळी ७ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीतासोबतच राज्यगीत "गर्जा महाराष्ट्र माझा" उपस्थितांनी गाऊन ध्वजवंदन करण्यात आले. भारत माता की जय, जय जवान जय किसान, वन्दे मातरम, जय भवानी जय शिवाजी, महाराष्ट्र दिनाचा विजय असो या घोषणा देण्यात आल्या.



# कर्जत संगीत सभेकडून महाराष्ट्र दिन संगीत मैफलीने साजरा

**। नेरळ । वार्ताहर ।**

महाराष्ट्र राज्य स्थापना दिवसाचे निमित्त साधून येथील कर्जत संगीत सभेने पंडित सुधीर फडके यांच्या अजरामर गीतांच्या मैफलीचा कार्यक्रम आयोजित केला होता. कर्जत येथील विद्या विकास मंदिर शाळेच्या सभागृहात आयोजित संगीत कार्यक्रमात गायक कलावंत अक्षय जोशी आणि साई दास्ताने यांनी आपल्या आवाजाने सर्वांनाच मंत्रमुग्ध केले.

गजानन सामवेदीका संगीत अकॅडमी कर्जत यांच्या माध्यमातून असे कार्यक्रम वर्षभर आयोजित केले जातात. सादरीकरणाने संयुक्त महाराष्ट्र चळवळीची आठवण करून दिली. गायक कलावंतांना छगन निमणे, सनद दळवी, मंदार खानावकर, अनिल करंजकर यांनी साथ दिली. स्वये श्रीराम प्रभू ऐकती, राम जन्माला ग सखी, समाधी साधन संजीवन नाम, घन निळा लडिवाळा, आकाशी झेप घे रे पाखरा, जिवलगा कधी रे येशील तू, प्रथम तुज पाहता, एकाच या जन्मी जणू, सखी मंद झाल्या तारका, हृदयी प्रीत जागते, धुंदी कळ्यांना- युगुल गीत, नवीन आज चंद्रमा युगुल गीत, कुणीतरी तरी बोलवा दाजिबाला (लावणी), थकले रे नंदलाला (लावणी), विठू माउली तू, देव देव्हाऱ्यात नाही, ब्रम्हा विष्णु, नाम घेता मुखी राघवाचे, झाला महार पंढरीनाथ, निजरूप दाखवा या गाण्यांनी मैफलीला बहर आली.

## उन्हाच्या तडाख्याने कार्यकर्ते हैराण

**पाताळगंगा :** सकाळी दहा वाजल्यापासून उन्हाचा तडाका मोठ्या प्रमाणात लागत असल्याने कार्यकर्त्यांसह उमेदवार घामाघूम होत असल्याचे चित्र तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे. एकीकडे मतदानाचा दिवस जवळ येत असल्याने प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. तर दुसरीकडे उमेदवार व कार्यकर्ते प्रचारासाठी धावपळ करत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. गावोगावी जाऊन संपर्क वाढवण्यावर मोठ्या प्रमाणात जोर धरलेला दिसत आहे.

ग्रामीण भागात मोठमोठे दौरे आखण्यात येत आहेत. प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते आपल्या पक्षाचा प्रचार करण्यासाठी गुंग झाले आहेत. आपल्या पक्षाला सत्ता मिळण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांची धडपडत सुरु झाली आहे. निवडणूक जवळ आल्याने प्रचाराचा वेग वाढला आहे. असे असतानाच उन्हाचा कडाका अर्थात पारा वाढत असल्याने सर्वच हैराण झाले आहेत.

# नवविवाहित दांपत्यासाठी "युगल सुरक्षा" आहेर

**। रायगड । वार्ताहर ।**

सध्या लग्नाचा मोसम सुरु आहे. लग्नाच्या निमिताने नवविवाहित दांपत्याला जवळचे लोक वेगवेगळ्या वस्तू भेट देत असतात. काही वेळेला या वस्तू त्यांच्याकडे अगोदरच असतात त्यामुळे दांपत्याच्या दृष्टीने निरुपयोगी ठरतात. अशावेळी त्यांना काय भेट द्यावी हा प्रश्न त्यांच्या नातेवाईकांना, मित्रांना पडू शकतो. यावर एक छान मार्ग रायगड डाक विभागाने दाखवून देत एक नवीन सुरवात केली आहे.

मयूर भोईलकर- आंबेपूर रायगड डाक विभागात कार्यरत असणाऱ्या या कर्मचाऱ्याच्या लग्नानिमित्त त्यांच्या सहकाऱ्यांनी लग्नाच्या दिवशी भारतीय डाक विभागाच्या "युगल सुरक्षा" नावाची विमा पॉलीसी काढून त्याचे विमापत्र लग्नात भेट म्हणून देऊन त्यांचे लग्न स्मरणीय केले. सर्व सामान्य जनतेसाठी असणाऱ्या या योजनेची माहिती लोकांना मिळावी असा उद्देश या पाठीमागे रायगड विभागाकडून साध्य केला गेला.



सहकाऱ्यांनी विवाहितांसाठी डाक विभागाकडे असणारी ही खास विमा पॉलीसी त्यांच्या लग्नात भेट देऊन एक नवीन पायंडा पाडला. याप्रसंगी रायगड डाक अधीक्षक सुनील थळकर, सहाय्यक अधीक्षक सुनील पवार, पोस्टमास्टर गजेंद्र भुसाणे, संतोष चिपळूणकर उपस्थित होते.

लग्नसमारंभात नवविवाहित दांपत्याला भेट देण्यासाठी "युगल सुरक्षा" नावाची एक विमापॉलीसी उपलब्ध आहे. याची माहिती सर्वसामान्यांना नाही. ५ वर्ष ते २० वर्ष मुदत असणारी ही विमा पॉलीसी लग्न केलेल्या व्यक्तीलाच काढता येते असल्याने नवपरिणीत दाम्पत्याच्या लग्नाच्या दिवशी या पॉलीसीचा प्रीमियम भरून ही विमा पॉलीसी त्यांना भेट देता येऊ शकते. एकच पॉलीसी, एकच विमा हप्ता यामधून पती- पत्नीचे एकत्रित विमा स्वरक्षण या विम्यामधून घेता येत असल्याने. याला वैवाहिक विमा ही म्हणता येईल. २० वर्ष मुदतीसाठी सामाहिक वय २१ असलेल्या कपलसाठी १ लाख विम्यासाठी रु ४२०/- व ४० वर्ष सामाहिक वय असलेल्या कपलसाठी रु ४७०/- दरमहा इतका कमी विमा हप्ता भरावा लागतो. मुदतपूर्तीनंतर आताच्या व्याजदराप्रमाणे साधारण २ लाख ४ हजार रुपये मिळतात. युगल सुरक्षा म्हणजे विम्याच्या कालावधीत दोघां पैकी एकाच काही झाल तर दुसऱ्याला बोनस सहित विम्याची पूर्ण रक्कम मिळते. मुदतीमध्ये काही झाले नाही, तरीही मुदतपूर्तीनंतर विम्याची पूर्ण रक्कम व बोनस विमा धारकास मिळतो.

# तळा पोस्ट ऑफिसमध्ये नागरिकांची हेळसांड

**। तळा । वार्ताहर ।**

पोस्ट ऑफिसमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडून नागरिकांना नेहमीच अरेरावी केली जात असून, मनमानी कारभारामुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर त्रस्त आहेत. येथील असभ्य अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचीही मागणी जोर धरू लागली आहे.

येथील पोस्ट ऑफिसची कार्यालयीन वेळ सकाळी ९ ते ५ अशी असतानाही दुपारी २ वाजताच कार्यालय बंद होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. येथे तळा शहर आणि ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांच्या पेन्शन असो अथवा लहान बालकांच्या योजना, दैनंदिन भरणा याच ठिकाणी केला जातो. यामुळे कार्यालयात नेहमीच गर्दी असते. परंतु, अधिकारी आणि कर्मचारी येणाऱ्या अनेकांशी असभ्य वर्तन करतात. तर दोन नंतर येणाऱ्या समस्त नागरिकांना थेट दुसऱ्या दिवशी येण्यास सांगितले जात आहे. तळा पोस्ट ऑफिसमध्ये अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी पंखे सुरू आहेत. परंतु, नागरिकांसाठी उपलब्ध असलेला पंखा गेले पंधरा दिवस बंद आहे. बसण्यासाठी आसन व्यवस्था नाही. विद्युत पुरवठा खंडित झाल्या नंतर विजेची सोय उपलब्ध नसल्याने कामकाज पूर्ण ठप्प असते, पोस्टात काळोख असतो. अधिकारी कर्मचारी कार्यालयात हजर नसतात, जनरेटर आहे. परंतु, तो सुरू करण्याची मानसिकता नाही. याबाबतीत विचारणा केली असता मागणी केली आहे अशी उत्तरे दिली जातात मागणी करून महिना झाला तरी कुठलीच सेवा मिळत नसल्याने पुन्हा विचारणा केली असता आमची तक्रार करा अशी अरेरावीची भाषा अधिकारी वर्गाकडून मिळत आहेत. अधिकारी वर्गाला नागरिकांशी काही देणे घेणे नाही. वरिष्ठांनी याची दखल घेऊन चांगल्या सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध कराव्यात व या कामचुकार अधिकारी वर्गावर कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- चेंबूर पूर्व मुंबई येथे स्टेशन जवळ ८६६ स्केअर फूट कारपेट बालकनी सह १ कारपार्किंग नवीन टॉवर ॲमेनीटी सह ताबा ३ महिन्यात मिळणार १० वा मजला नवीन कॉम्लेक्स मध्ये फ्लॅट विकणे आहे. मोबाईल : ९८२१२११४८०/९५७७२१६४९९
- कुकूचकू पोल्ट्री फार्म प्रा. ली. मध्ये कामगार पाहिजे निजामपूर माणगाव रायगड येथे पिल्लेच्या पीक अप गाडीवर ड्रायवर पगार सर्व साधारण रुपये २५,००० प्रती महिना व सुपरवायजर १० वी पास रुपये १३,००० प्रती महिना पगार मिळेल कुटुंबासहित राहण्याची, लाइट व पाण्याची मोफत सोय आहे. मापगाव अलिबाग येथे वॉचमन पाहिजे शिक्षण १० वी पास पुरुष कामाचे ८ तास पगार १०,००० प्रती महिना संपर्क :- अनुष्का राऊत मॅडम ७७९८८८३८६४
- मॉंटेसरी टीचर, आया (attendant) व पार्ट टाइम बेकरी शेफ हवा आहे. आया किड्स ॲक्टीव्हीटी सेंटरसाठी व Owner च्या मुलाला सांभाळण्यासाठी हवी असल्याने घरी राहाणारीच बघत आहोत. अनुभवी किंवा जबाबदार व मुलांची आवड असणारी हवी. संपर्क ९९२०७५२१४१/९४२२६९२४५०
- विद्यानगरमध्ये Fully Furnished Attached रुम paying Guest साठी देणे आहे. जेवणासकट किंवा जेवणाशिवाय भाडे ठरवता येईल. (लेडीज किंवा मॅरीड कपल्ससाठी) संपर्क : ९९२०७५२१४१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# राजेंद्र वालेकर, रेश्मा पाटील यांचा सेवापूर्ती सोहळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

परहुरपाडा केंद्रातील खिडकी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र वालेकर हे मंगळवार, ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले. तसेच परहूरपाडा केंद्रातील चरी शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा रमाकांत पाटील यादेखील सेवा निवृत्त झाल्या. दोन्ही शिक्षकांचा भेटवस्तू तसेच सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. वालेकर आणि रेश्मा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.





सदर कार्यक्रमात केंद्रप्रमुख अनिषा पाटील, साधनव्यक्ती वर्तक तसेच सर्व शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी आपल्या मनोगतातून वालेकर यांच्यासह रेश्मा पाटील यांच्या कार्याचा गौरव केला. सदर कार्यक्रमास त्यांचे संपूर्ण कुटुंब तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन गुरव यांनी केले.

# कानिफनाथ मंदिराचा उत्सव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

'असे श्रध्दा ज्याचे उरी, त्यासी दिसे हा कानिफा मुरारी'' या कानिफनाथ महाराजांच्या ओव्यांच्या प्रचितीतून अलिबाग तालुक्यातील पेझारी गावातील वरची आळी येथे चौलचे नाथसिध्द स्व. नारायण वार्डे गुरूजी व श्रीपंत सांप्रदाय रायगड जिल्हाप्रमुख दिगंबर राणे यांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आलेल्या श्री कानिफनाथ मंदिराचा १२ वा वर्धापनदिन उत्सव ४ मे २०२३ रोजी आयोजित करण्यात आला असून त्यानिमित्त वरची आळी पेझारी येथील कानिफनाथ मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार ४ मे रोजी सकाळी ६ वाजता अभिषेक व पूजा, ७ वाजता नवनाथांच्यापोथीतील १२व्या अध्यायाचे वाचन, ८ वाजता श्रीसत्यनारायणाची महापूजा, दुपारी १ ते ३ या वेळेत महाप्रसाद (भंडारा), दुपारी ४ वाजता कानिफनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरूवात होईल.

# महायुतीच्या कार्यकर्त्यांवर दिल्लीची नजर

**। रायगड । वार्ताहर ।**

दोनवेळा खासदार राहिलेले श्रीरंग बारणे यांच्या चिंतेत सातत्याने वाढ होताना दिसत आहे. महायुतीचे घटकपक्ष बारणे यांचा प्रचार किती सक्रियपणे करतात हे पाहण्यासाठी दिल्लीहून सहा जणांचे विशेषपथक दाखल झाले आहे. हे पथक भाजप पक्षनेतृत्वाला गोपनीय अहवाल सादर करणार असल्याचे बोलले जाते.




मावळ मतदारसंघातून महायुतीचे अनेक नेते लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छूक होते. पण सलग तिसऱ्यांदा बारणे मैदानात उतरले आहेत. मावळ मतदारसंघ हा दोन जिल्ह्यात विभागलेला आहे. यामध्ये पुण्यासह रायगड जिल्ह्याचा समावेश होतो. रायगडमधील उरण, पनवेल आणि कर्जतचा भाग मावळ मतदारसंघात येतो.

गेल्या काही दिवसांपासून आरोप-प्रत्यारोपांमुळे भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी बारणेंसाठी मनापासून काम करतील की नाही, याची भीती महायुतीला चांगलीच सतावत आहे. मावळमध्ये मागील १५ वर्षांपासून कमळ चिन्ह नसून या वेळी कमळावर लढणारा उमेदवार देण्याची मागणी भाजप कार्यकर्त्यांनी केली होती. मावळचे भाजपचे माजी आमदार बाळा भेगडे, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादीकडून माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, बापू भेगडे हे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. परंतु, मावळ मतदारसंघ महायुतीत शिवसेनेकडेच कायम राहिला. तसेच पुणे आणि रायगडमध्ये विभागलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघावर महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसनेही दावा केला होता. महायुतीचे काम नाही केल्यास कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी दिल्लीवरून आलेले हे पथक १० मेपर्यंत मतदार संघात तळ ठोकणार आहे. महायुतीसाठी प्रामाणिकपणे काम करीत असलेले पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या कामांची नोंद केली जाणार आहे. त्यानंतर त्यांच्या कामगिरीची चार श्रेणींमध्ये विभागणी करण्यात येणार आहे.

**■ सहा जणांचे विशेष पथक ठेवणार कामकाजावर लक्ष**

# राजेश कासारे यांना पितृशोक

**माणगाव :** तालुक्यातील आमडोशी गावचे रहिवाशी तथा तालुका शेतकरी कामगार पक्षाचे कार्यालयीन चिटणीस राजेश कासारे यांचे वडील बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रं.५ खरवली विभागाचे माजी उपाध्यक्ष दिवंगत शांताराम जयराम कासारे यांचे बुधवारी १ मे रोजी मध्यरात्री १२.३० वाजता आमडोशी येथे राहते घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.



मृत्यूसमई त्यांचे वय ७४ वर्षांचे होते. त्यांच्या पश्च्यात पत्नी, दोन मुलगे, दोन मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने कासारे कुटुंबियांबरोबरच आमडोशी गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्यावर आमडोशी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यांचा जलदान विधी व शोकसभा रविवार १२ मे रोजी सकाळी ११ वाजता राहते घरी आमडोशी येथे होणार असल्याचे त्यांचा मुलगा राजेश कासारे यांनी सांगितले.

# बोरीचीवाडी नळपाणी योजना रखडली
# पाण्यासाठी पायपीट

## केवळ चार हंडे मिळतेय पाणी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

पोशीर ग्रामपंचायतीतील बोरीचीवाडी येथील जलजीवन मिशन मधून राबविण्यात येणारी नळपाणी योजनेचे काम रेंगाळले आहे. विहिर आटल्याने बोरीचीवाडीमधील महिलांना फार्म हाऊस मधील खासगी बोअरवेल चा आधार घ्यावा लागत आहे. दरम्यान, या वाडीमधील कुटुंबाला दर दिवशी केवळ चार हांडे पाणी मिळत आहे. दरम्यान, ज्या बोअरवेलमधून आदिवासी ग्रामस्थांना पाणीपुरवठा होतो. त्या वाडीच्या बोअरवेलचे विजेचे पॅनेलदेखील सातत्याने बिघडत असते. त्यामुळे महिलांची पाण्यासाठी पायपीट वाढली आहे.

पोशीर ग्रामपंचायतीमधील बोरीचीवाडी हि आदिवासीवाडी देवपाडा वारे रस्त्यावर आहे. या वाडीच्या पुढे वाघाचीवाडी तसेच तात्याचीवाडीदेखील आहे. या सर्व आदिवासी वाड्यांसाठी शासनाकडून जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचे काम सुरु आहे. सध्या या वाडीमध्ये केवळ पाण्याचा जलकुंभ बांधण्याचे काम सुरु असून ते काम देखील अर्धवट आहे. मार्च महिन्यापासून या वाडीमधील आदिवासी लोक पिण्याच्या पाण्यासाठी दाहीदिशा भटकत आहेत.या वाडीमधील विहिर आटली असून जुन्या नळपाणी योजनेचे पाणी येणे देखील बंद झाले आहे. त्यामुळे आदिवासी लोकांना पिण्याचे पाणी आणण्यासाठी वारे गावाकडील भागात असलेल्या खासगी बोअरवेलच्या आधार घ्यावा लागत आहे. तात्याचीवाडी फाट्यावर एक बोअरवेल असून त्या बोअरवेलमधून सध्या प्रत्येक कुटुंबाला चार हांडे पाणी दिले जात आहेत. सध्या पाण्याची असलेली गरज लक्षात घेता पिण्याचे पाणी कमी पडत आहे आणि त्यामुळे आदिवासी महिला आणि घरातील लहान मुलांना घेऊन पाणी आणण्यासाठी सध्याच्या रणरणत्या उन्हात डांबरी रस्त्यावरून ये-जा करीत असतात.

त्यामुळे येथील आदिवासी लोकांची आणि महिलांची पायपीट शासनाला अद्याप दिसत नसल्याने आदिवासी महिलांनी नाराजी व्यक्त केली आहे. आमच्या वाडीमधील नवीन नळपाणी योजनेचे काम अर्धवट आहे. हे सरकारी अधिकाऱ्यांना माहिती असतानादेखील आमच्या वाडीला पाण्याचा टँकर आजपर्यंत सुरु झालेले नाही.भागी वामन निरगुडा यांनी तर संतप्त होऊन आमचे आयुष्य पाण्यासाठी पायपीट करून गेली आहे. मात्र आमच्या सुना यांना अशी सवय शासनाने लावू नये. घरोघरी नळ देण्याची शासनाची योजना असून हर घर जल कुठे आहे? असा प्रश्न निरगुडा यांनी व्यक्त केला. तर आम्हाला चार हांडे पाणी देणारी बोअरवेल सातत्याने बिघडत असते. त्यामुळे चार हांडेदेखील व्यवस्थित मिळत नाहीत असा आरोप गंगू भगत यांनी केला. शासन आमच्या आदिवासी गरीब लोकांच्या मागण्यांकडे लक्ष देणार आहे काय? असा सवाल वाडीमधील आदिवासी महिलांनी उपस्थित केला आहे.

## भिंत कोसळून दोघे जखमी

**पनवेल :** पनवेल शहरातील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोर नव्याने उभारण्यात येणाऱ्या वाहनतळाचे काम सुरु आहे. याठिकाणी भिंत बांधण्याचे काम सुरु असताना अचानक भिंत कोसळून दोन कामगार जखमी झाल्याची घटना घडली आहे. सदर जखमी कामगारांना पनवेल उपजिल्हा रुग्नालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोर नव्याने उभारण्यात येणाऱ्या वाहनतळाचे काम सुरु असून या ठिकाणी बांधण्यात येणाऱ्या भिंतीसाठी माती काढण्याचे काम दोन कामगार करत असताना भिंती कोसळली. सदर जखमी कामगारांना जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले असून उपचारासाठी पनवेल उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## आदिवासींच्या आरोग्यासाठी हेल्थकेअर युनिट

**। पालघर । वृत्तसंस्था ।**

पालघर जिल्ह्यात हेल्पएज इंडिया आणि प्रॉक्टर अँड गॅम्बल हेल्थ लिमिटेडच्या पुढाकाराने मोबाईल हेल्थकेअर युनिट सुरु केले आहे. यामाध्यमातून आदिवासी बहुल असणाऱ्या जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या आरोग्याची विशेष काळजी घेतली जाणार असल्याचे प्रॉक्टर अँड गॅम्बल हेल्थ लिमिटेडचे प्रबंध निदेशक मिलिंद थट्टे यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यात दुर्गम ठिकाणी, वृद्ध आणि वंचित अशा असुरक्षित लोकसंख्येच्या आरोग्यसेवांच्या गरजा पूर्ण करण्याच्या सामायिक उद्दिष्टातून उद्भवली आहे. मोबाइल हेल्थकेअर युनिट पालघर जिल्ह्यातील १९ गावांमध्ये पसरलेल्या संपूर्ण आदिवासी समुदायाची पूर्तता करेल. प्राथमिक आरोग्य सेवा गावकऱ्यांच्या दारापर्यंत पोहोचवेल. पूर्ण-वेळ डॉक्टर, फार्मासिस्ट आणि मूलभूत निदान उपकरणांसह, हे नवीन मोबाइल हेल्थकेअर युनिट मोफत सल्ला, औषधोपचार, समुपदेशन आणि स्क्रीनिंग सेवा प्रदान करेल आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना वेळेवर संदर्भ देण्याची सुविधा दिली जाणार असल्याचे थट्टे यांनी सांगितले. मोबाइल हेल्थकेअर युनिट प्राथमिक आरोग्य केंद्रांना वेळेवर संदर्भ देऊन फॉलो-अप घेणार आहे. असे थट्टे म्हणाले.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## दुकानातून मोबाईलची चोरी

**पनवेल :** बिलिंग काऊंटरवरून अनोळखी व्यक्तीने दोन मोबाईलची चोरी केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अक्षिता जत्रारा हे खारघर येथे राहत असून त्यांनी कामाच्या ठिकाणी काम करतेवेळी त्यांचा मोबाईल व दुकानातील पंकज चौधरी याचा आवफोन बिलिंग काऊंटरवर ठेवले होते. यावेळी दुकानात आलेल्या अनोळखी व्यक्तीने दुकानात येऊन रजिस्टर आणण्यास सांगितले. यावेळी अक्षिता रजिस्टर आणण्यासाठी गेले असता त्याने दोन्ही मोबाईल घेऊन तेथून पळ काढला.

## महिलेनेच केली महिलेची तब्बल पावणेतीन कोटी रुपयांची फसवणूक

**। पनवेल । वार्ताहर ।**

बांधकाम व्यवसायात गुंतवणूक केल्यास ५० टक्के नफा देण्याचे आमिष दाखवून एका महिलेने खांदा कॉलनी भागात राहणाऱ्या तीन महिलांकडून तब्बल पावणेतीन कोटी रुपये उकळून त्यांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले.

खांदेश्वर पोलिसांनी तिच्या विरोधात फसवणुकीसह अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी या प्रकरणात महिलेचा पती संतोष कोळी, मुलगा चैतन्य कोळी तसेच बिल्डर कृष्णमीलन शुक्ला ऊर्फ बाबा शुक्ला यांनादेखील सहआरोपी केले आहे.

या प्रकरणातील तक्रारदार या खांदा कॉलनीमध्ये राहण्यास असून, तीन वर्षांपूर्वी त्यांची महिलेसोबत ओळख झाली होती. त्यांनतर महिलेने मैत्री करून त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर मे २०२३ मध्ये महिलेने कोपरखैरणे येथील एक जुनी बिल्डिंग २ कोटी ३० लाख रुपयांमध्ये विकत घेत असल्याचे व त्यात गुंतवणूक केल्यास ५० टक्के नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले होते. त्यानुसार तक्रारदार महिलेने गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवली.

त्यामुळे तक्रारदार महिलेने चेकद्वारे व ऑनलाईन तसेच रोख स्वरुपात असे एकूण ५० लाख ५० हजार रुपये दिले. त्यानंतर आरोपी महिलेने ८५ हजारांची मागणी केली. मात्र, त्यांनी पैसे नसल्याचे सांगितल्यानंतर आरोपी महिलेने सोन्याच्या दागिन्यांची मागणी करून ते आठ दिवसांत परत करण्याचे आश्वासन दिले.

विश्वास ठेवून तक्रारदार महिलेने आपल्या आईचे अडीच लाख रुपये किमतीचे दागिने दिले. दरम्यान, गुंतवलेल्या रकमेतील नफ्याबाबत विचारपूस केली असता, तिने वेगवेगळी कारणे सांगून टाळाटाळ करण्यास सुरुवात केली.

## तळा तालुक्यात कामगार दिन उत्साहात

**। तळा । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५वा वर्धापन दिन आणि कामगार दिन तळा तालुक्यात उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील विविध संघटना, संस्था, सरकारी कार्यालये आणि राजकीय पक्षांच्या शाखा आणि कार्यकर्त्यांतर्फे सभा, रॅली, ध्वजारोहण, रक्तदान शिबिरे, साहित्यवाटप असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६५व्या वर्धापनदिनानिमित्त तळा तहसीलदार स्वाती पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. ध्वजारोहणास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड आणि त्यांचे सहकारी यांनी सलामी दिली. तहसील मुख्यालयाच्या मैदानावर झालेल्या या कार्यक्रमास नायब तहसीलदार मंगेश पालांडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कराड, कृषी अधिकारी आनंद कांबळे, डॉ.सतीश वडके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी तहसीलदार स्वाती पाटील यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६५व्या वर्धापन दिन आणि कामगार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. येणाऱ्या लोकसभा निवडणुकीसंदर्भात सर्वांनी मतदान करून आपला हक्क बजावावा असे आवाहन केले.

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग*
*दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## सागर जाधव यांचा सत्कार

**। तळा। वार्ताहर ।**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून बंधुत्व फाऊंडेशनतर्फे मुंबई पोर्ट ॲथॉरिटीच्या हॉस्पिटलमध्ये छत्रपती शिवाजी रहाराजांच्यासमोर महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान सागर जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

वडाळा येथील सर्जिकल ओपीडी जवळ एक बॅग मिळाली. त्यात १२ हजार रुपये व इतर सामान होते. तसेच १६ एप्रिलला गेट नंबर १ जवळ बॅग मिळाली. त्यात ७७० रुपये होते. या दोनही बॅगा त्याच्या मालकाला शोधून परत करण्यात आली. याप्रसंगी बंधुत्व फाऊंडेशनचे अध्यक्ष समीर राणे, सुरेश मुरुडकर, प्रदीप खोत, शरद पठाडे, महाराष्ट्र सुरक्षा बोर्डाचे विजय कानवडे, अक्षय सुर्वे, करण सिंग गिरासे, सुप्रिया शिंदे व हॉस्पिटलचे कर्मचारी उपस्थित होते.

## महाराष्ट्र दिन कर्जतमध्ये उत्साहात

**कर्जत :** महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिन कर्जतमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आज बहुसंख्य शाळांमध्ये परीक्षांचे निकाल असल्याने तत्पूर्वी त्या शाळांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले. १ मे महाराष्ट्र दिनानिमित तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित केलेल्या शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी कर्जतचे उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, कर्जत तहसीलदार डॉ. शीतल रसाळ, कर्जत गट विकास अधिकारी चंद्रकांत साबळे, कर्जत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता संजीव वानखेडे, कर्जत नायब तहसीदार सोपान बाचकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## उपअभियंत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा : जनतेची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

वीज कर्मचारी रविंद्र पांडुरंग पाटील या कामगाराचा शॉक लागून मृत्यू झाल्याची घटनाशनिवारी (दि.२७) दुपारच्या सत्रात घडली आहे. रविंद्र पाटील यांच्या मृत्यूस बेजबाबदार असणाऱ्या महावितरण कंपनीचे उप अभियंता राहुल शिंदे यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मृताचे नातेवाईक व उरणच्या जनतेकडून केली जात आहे.

रविंद्र पाटील हे मुळेखंड तेलीपाडा या परिसरात काम करत होते. शनिवारी (दि.२७) रविंद्र पाटील हे कामगार नेहमीप्रमाणे कामावर रुजू झाले होते. मुळेखंड तेलीपाडा येथील विद्युत वाहक दुरुस्तीचे काम करण्यासाठी दुपारच्या सत्रात विद्युत वाहक खांबावर गेले असता त्यांना विजेचा शॉक लागण्याची घटना घडली. त्यातच रविंद्र पांडुरंग पाटील या कामगाराचा मृत्यू झाला आहे. परंतु वीज खांबावर काम सुरू असताना विद्युत पुरवठा खंडित न करता तो सुरू ठेवण्यात आल्याचे समजते. याची माहिती कामगार रविंद्र पाटील यांना नसल्याने त्यांचा शॉक लागून जागीच मृत्यू झाला आहे.

सदर घटना घडली, त्यावेळी जबाबदार अभियंता कुठे होते? याचा खुलासा शिंदे यांनी करावा. यावरून मृत रविंद्र पांडुरंग पाटील या कामगारांच्या मृत्यूला जबाबदार उपअभियंता राहुल शिंदेच जबाबदार असल्याची माहिती कामगार वर्गाने दिल्याची चर्चा होती. त्यामुळे उपअभियंता शिंदे यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

उपअभियंता शिंदे यांच्याविरोधात अनेक तक्रारी असूनही वरिष्ठ कोणतीच कारवाई करताना दिसत नाहीत. उपअभियंता हे खासगी कामाकडे जास्त लक्ष देऊन कमाई करीत असल्याची ओरड करंजा ग्रामस्थांकडून सुरू आहे.

तशा त्यांनी तक्रारी करूनही दाद घेतली जात नसल्याची कबुली गामस्थ देत आहेत. तरी शिंदे यांच्या आजपर्यंतच्या कामकाजाची व मालमत्तेची सखोल चौकशीही करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मृत कामगार रविंद्र पाटील यांच्या कुटुंबियास न्याय मिळावा अन्यथा ग्रामस्थ रस्त्यावर उतरणार असल्याचे समजते. याबाबत उपअभियंता राहुल शिंदे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

## तरूणीचा मोबाईल लंपास

**पनवेल :** गर्दीमध्ये एका २६ वर्षीय तरुणीचा मोबाईल चोरल्याची घटना घडली. याकरणी तिने तक्रार दाखल केल्यानंतर कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तरंगिनी शर्मा या कामोठे, सेक्टर २१ येथे राहतात, त्या मॅकडोनाल्ड समोरील शिवनेरी बस थांबा येथे बसची वाट बघत उभ्या होत्या.

काही वेळातच बस आली. त्यावेळेस बसमध्ये बसण्याकरता गर्दी झाली. यावेळी एका व्यक्तीने त्यांना धक्का दिला. तेव्हा त्याला जागा द्यावी म्हणून त्या बाजूला झाल्या व वाहकाला बसायला जागा आहे का अशी विचारणा केली, यावेळी ऑनलाईन तिकीट काढण्याकरिता खिशात मोबाईल तपासला असता मोबाईल सापडला नाही.

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ८, हिस्सा नं. ४ ब/३ प्लॉट नं. ४ नवीन सर्व्हे नं. ८/४/ड/४, क्षेत्र ३९२ चौ.मी आकार रू. ३९.२० पैसे या बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक सोहनलाल गुणेजी माळी यांच्याकडून दिनांक ०१/०२/१९९७ रोजी दस्त क्र.२५२/१९९७ या नोंदणीकृत खरेदीखताने ही मिळकत शिवलाल वालाजी राईका व बबली किसन राईका दोघे रा. प्लॉट क्र. १७, श्री अन्नपुर्णा निवास हरीष बेकरी मागे चेंढरे अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड यांनी कायमस्वरूपी विकत घेतलेली आहे. त्याप्रमाणे सातबारा सदरी त्या दोघांची नांवे दाखल आहेत. सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखताचा मुळ दस्त आमच्या अशिलांकडून गहाळ झालेला आहे. सदरील दस्त कोणास मिळाल्यास खालील पत्त्यावर आणुन देणे ही सर्व लोकांस विनंती आहे.

तारीख :- ०२/०५/२०२४

सही /-
**ॲड. सोनाली कल्पेश गुरव**
रा. मु. पो. सासवने
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबाईल नं. ९२६०२३४३१२

### अलिबाग को-ऑप अर्बन बँक लि. अलिबाग-रायगड

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ नुसार

### जाहीर लिलाव नोटीस

बँकेचे कर्जदार सभासद श्री.रणजीत कृष्णा मोकल यांनी अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग बँकेकडून घेतलेले कर्ज थकीत झाल्यामुळे लवादी थकबाकीदार कर्जदार, सभासद श्री.रणजीत कृष्णा मोकल यांचेकडील येणे असलेल्या कर्जाची थकीत रक्कम वसुलीकरीता बँकेने रीतसर व कायदेशीररीत्या जप्त केलेली खालील परिशिष्टात नमुद वर्णनाच्या स्थावर मालमत्तेची जाहीर लिलावाने विक्री करणे आवश्यक झाले आहे. सदर लिलाव बुधवार दिनांक ०५/०६/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता करणेत येईल. सदर लिलाव बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी हे अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि., अलिबाग बँकेचे मुख्य कार्यालयात अलिबाग येथे हजर राहून खालील परिशिष्ट १ मधे नमुद स्थावर मालमत्तेची आहे त्या ठिकाणी, आहे त्या परिस्थितीत जाहीर लिलावाने विक्री करतील.

**परिशिष्ट-१**

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती अलिबाग व नगरपरिषद अलिबाग हद्दीतील मौजे अलिबाग येथील श्री.प्रविण रघुनाथ राऊत यांचे मालकीची खालील वर्णनाची मिळकत.

नगरपरिषद हद्दीतील मौजे अलिबाग ता.अलिबाग, जि.रायगड भुमापन क्रं.७७८, एकूण क्षेत्र ६१०४.६० चौमी सत्ता प्रकार सी, पैकी त्यांनी रजिस्टर्ड खरेदी खताने (दस्त क्रं.१२००/२००३) अन्वये खरेदी केलेली व त्यांचे नावे असलेली ३००.०० चौ.मी क्षेत्राची मिळकत.

**लिलावाच्या शर्ती व अटी :-**

१. जाहीर लिलावाच्या शर्ती व अटी बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर तसेच लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.
२.लिलावामध्ये भाग घेणे करीता व बोली बोलणे करीता रक्कम रू.२५,०००/- मात्र एवढी रक्कम 'अनामत' म्हणून बँककडे लिलावापुर्वी किमान एक तास अगोदर जमा करणे आवश्यक आहे.
३ लिलाव मंजुर करणे अगर काही कारणाने लिलाव तहकुब करणे, रद्द करणे किंवा पुढे ढकलणेचे सर्व अधिकार बँकेकडे राहतील.
४.लिलावाची तारीखेला लिलावाच्या वेळेपर्यंत कर्जदार यांनी येणे असलेल्या कर्जाची व्याजासह पूर्ण परतफेड केल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
५.लिलाव करावयाच्या मालमत्ते संबंधीची माहिती अगर कागदपत्रे बँकेच्या कार्यालयीन वेळेत मुख्य कार्यालयात पाहावयास मिळतील.
६.इच्छुक खरेदीदारांच्या लिलावाकरीता लेखी सिलबंद निविदा देखील स्वीकारण्यात येतील.

अलिबाग
दि.०२/०५/२०२४

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**अलिबाग को-ऑप.अर्बन बँक लि., अलिबाग.**

## मोकाट गुरांना उकिरड्याचा आधार




**आरोग्य धोक्यात**

उकिरड्यावरील प्लास्टिक व खराब अन्न खाऊन मोकाट गुरांचे आरोग्य धोक्यात येते. शिवाय घाण व दुर्गंधीदेखील पसरते. त्यामुळे यावर योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**। पाली /बेणसे । वार्ताहर ।**

उन्हाचा तडाखा सर्वत्रच वाढला आहे. अशातच जनावरांसाठी हिरव्या व सुक्या चाऱ्याचादेखील अभाव निर्माण झाला आहे. त्यामुळे मोकाट जनावरांना खाण्यासाठी अन्न पाण्याची कमतरता भासू लागली आहे. मग हि मोकाट गुरे पालीत डम्पिंग ग्राऊंड व उकिरड्यावर जाऊन मिळेल ते खात आहेत. त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय स्वच्छतेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला आहे.

येथील डम्पिंग ग्राऊंडवर तसेच जुने पोलीस स्थानक, मधली आळी, बल्लाळेश्वर मंदिर, बल्लाळेश्वर नगर या ठिकाणी उकिरड्यावर सकाळपासूनच मोकाट गुरांची गर्दी असते. त्यामुळे येथे घाण व दुर्गंधी पसरते. त्यामुळे नागरिकांचे आरोग्यदेखील धोक्यात येते. परिणामी गुरांच्या पोटात कमी अधिक प्रमाणात प्लास्टिक जाते. प्लास्टिक व सडके आणि कुजलेले अन्न पदार्थ खाऊन या जनावरांच्या आरोग्यावर घातक परिणाम होतात. त्यांची पचनशक्ती मंदावते, अन्नाच्या शोधात सतत चालल्याने त्यांची ऊर्जा कमी होते. अशक्तपणा येतो. डम्पिंग ग्राउंड व उकिरड्यावरील कचऱ्यात धातू तसेच टोकदार वस्तू उदा. घरगुती वापराची सुई, इंजेक्शनच्या सुया आदी घटक असतात. त्या पोटात गेल्यामुळे जनावरांच्या जठराला व अन्ननलिकेला इजा पोहचत आहे.

> उष्म्याने जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे शेतकरी किंवा गुरेपालक यांनी आपली गुरे चरण्यासाठी मोकाट सोडू नयेत. शासनाने मोकाट गुरांच्या चारा पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. किंवा पशुपालकांना यासाठी अनुदान दिले पाहिजे. नागरिकांनी रस्त्याच्या कडेला कचरा न टाकता घंटागाडीतच कचरा टाकावा. जेणेकरून गुरे तेथे येणार नाहीत.
>
> – प्रणाली सुरज शेळके, नगराध्यक्ष, पाली, नगरपंचायत

### नागाव, ता. अलिबाग येथे नारळ फोफळीच्या वाडीत प्लॉट उपलब्ध आहेत.

● शांत परिसर, ● बंगलो कॉटेजसाठी उत्तम. ● प्लॉटमध्ये आंबा, नारळ, सुपारीची झाडे. ● एकट्याच्या मालकीची (singal owner )
● टायटल क्लिअर ● अलिबाग- रेवदंडा रस्त्यालगत
● समुद्रापासुन जवळ ● नागाव बिच १ कि.मी. अंतरावर
● अलिबाग शहर ८ कि.मी. अंतरावर ● किंमत- १२.५० लाख प्रती गुंठा.

**संपर्क : ॲड. पराग गुरव**
८४४६८८०००९
**श्री. मोहित प्रधान**
७७४४०८३५७८

### जाहीर सूचना


याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आम्ही पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड अर्थात गट क्र. १३५/२, मोजमापित ३-४४-१० एच-ए-पी, गाव कोळगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड या विवरणाच्या मालमत्तेसंदर्भात (यापुढे जमीन म्हणून उल्लेखित) सचिन अनंत कर्दळे, केतन अनंत कर्दळे, संगीता राजेंद्र मखमले व निर्मला अनंत कर्दळे यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.

कोणाही व्यक्तीचा वा व्यक्तींचा सदर जमीन वा तिच्या कोणत्याही भागामध्ये वा संदर्भातविक्री हक्क वा विक्रीद्वारे हक्कासहित/अभिहस्तांकन, हस्तांतरण, वाटप, विनिमय, भेट, भाडेकरार, उप-भाडेकरार, वहिवाट, उप-वहिवाट, अनुज्ञप्ती, ताबा, वापर, कब्जा, गहाण, प्रभार, धारणाधिकार, न्यास, उत्तराधिकार, मृत्यूपश्चात वारसा, वारसा, कुटुंब व्यवस्था/तडजोड,इच्छापत्र, मृत्यूपश्चात केलेले दस्तावेज, प्रोबेट, प्रशासन पत्र, सुविधाधिकार, देखभाल, काणत्याही विधि न्यायालयाचा निवाडा वा आदेश, करार वा अन्य कोणत्याही स्वरूपात, गट क्र. ३१८ च्या प्रवाशासाठी मंजूर हक्क मार्गाव्यतिरिक्त, कोणताही हक्क, अधिकार, हितसंबंध, लाभ, दावा वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात त्यांच्या पुष्ट्यर्थ कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत लिखित स्वरूपात अधोहस्ताक्षरितांना खालील निर्देशित ई-मेल पत्त्यावर किंवा टपाली पत्त्यावर सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा अशा व्यक्तींचे दावे हे अधित्यागित सर्व हेतूने व दृष्टीने व/वा परित्यागित समजण्यात येतील व कोणत्याही स्वरूपात बंधनकारक नसतील.

दिनांक : ०३ मे, २०२४.

सही/-
**इंटेग्रम लीगल**
वकील व सॉलिसिटर्स
३०२, जन्मभूमी चेंबर्स, वालचंद हीराचंद मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
ई-मेल : frontdesk@integrum.co.in

# रिंकू सिंगने आईकडे मन मोकळं करत अखेर मौन सोडले



## ■ भावनिक व्हिडिओ होतोय व्हायरल

।नवी दिल्ली।वृत्तसंस्था। रिंकू सिंगची टी-२० वर्ल्ड कपसाठी भारतीय संघात निवड झाली नाही. त्यामुळे बऱ्याच जणांनी बीसीसीआय आणि निवड समितीवर जोरदार टीका केली. पण या सर्व गोष्टीनंतर रिंकू सिंग हा शांतच होता. पण रिंकूने संघाबाहेर झाल्यावर आपली पहिली प्रतिक्रीया आईला दिली आहे. रिंकूने आईला फोन केला आणि त्यानंतर त्याने आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. यानंतर रिंकूच्या वडिलांचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला आहे.

रिंकू सिंगची टी-२- वर्ल्ड कपसाठी भारतीय संघात निवड होईल, असे सर्वांनाच वाटत होते. कारण रिंकूला संघाबाहेर काढण्याचे कोणतेही कारण दिसत नव्हते. पण जेव्हा भारताचा संघ जाहीर करण्यात आला तेव्हा त्यामध्ये रिंकूचे नाव नव्हते. रिंकूला भारताच्या १५ सदस्यीय संघात स्थान देण्यात आलेले नाही. रिंकूला यावेळी संघाबरोबर ठेवण्यात आले आहे. त्यामुळे चाहते बीसीसीआयवर चांगलेच नाराज झाले होते. त्यानंतर रिंकूने आपलं मन आईकडे मोकळं केले.

रिंकूचे वडिल म्हणाले की, ''रिंकूची भारताच्या टी-२० वर्ल्ड कपसाठीच्या संघात निवड होईल, असे आम्हाला वाटले होते. त्यासाठी आम्ही आनंदात होतो. फटाकेवैगेरे आम्ही आणून ठेवले होते. पण टी-२० संघात रिंकूची निवड झाली नाही. त्यामुळे आम्ही नाराज आहोत.'' त्यानंतर पत्रकाराने वडिलांना विचारले की, यावेळी रिंकूबरोबर तुमचं काही बोलणं झालं आहे का, त्यावर रिंकूचे वडील म्हणाले की, ''भारताचा संघ जाहीर झाला आणि त्यानंतर रिंकूने फोन केला होता. यावेळी रिंकू त्याच्या आईशी बोलला. रिंकूने आईला सांगितले की, मी संघ जाहीर झाल्यावर निराश झालो आहे. राखीव खेळाडू म्हणून मी संघाबरोबर असणार आहे.'' रिंकू सिंगसारखा धडाकेबाज फलंदाज भारतीय संघात नाही, यावर अजूनही चाहत्यांचा विश्वास बसत नाही. रिंकूची निवड झाली नसल्यावर चाहते निराश झाले आहेत. पण त्याचवेळी रिंकूला या गोष्टीचा किती धक्का बसला असेल, याचा कोणीही विचार करू शकणार नाही. त्यांच्या आईने त्याला धीर दिला आहे.

# भारतीय संघाचा थॉमस करंडक हरपला

**। चेंगडू (चीन) । वृत्तसंस्था। भारतीय पुरुष संघाला थॉमस करंडक या प्रतिष्ठेच्या बॅडमिंटन स्पर्धेमधील 'क' गटातील अखेरच्या साखळी फेरीच्या लढतीत पराभव पत्करावा लागला. इंडोनेशियाने भारतीय संघावर ४-१ असा विजय मिळवला. या विजयामुळे क गटामध्ये इंडोनेशियाने पहिल्या स्थानावर झेप घेतली. भारतीय संघ दुसऱ्या स्थानावर राहिला.**



इंडोनेशिया व भारत या दोन देशांनी क गटामधून बाद फेरीत प्रवेश केला होता. या गटातील थायलंड व इंग्लंड या दोन देशांचे आव्हान साखळीतच संपुष्टात आले होते. त्यामुळे या गटातील अखेरच्या साखळी फेरीच्या लढतीत पहिल्या व दुसऱ्या स्थानासाठी चुरस होती. इंडोनेशिया - भारत यांच्यामधील लढतीतील विजेता पहिल्या क्रमांकाचा मानकरी ठरणार होता. त्यामुळे या लढतीच्या निकालावर विशेष लक्ष होते.

भारताच्या एच. एस. प्रणोय याने अँथोनी गिनटिंग याचा कडवा संघर्ष १३-२१, २१-१२,२१-१२ असा तीन गेममध्ये मोडून काढला. प्रणोय याने ही लढत एक तास व एक मिनिटात जिंकली. भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर मात्र भारतीय खेळाडूंना इंडोनेशियाच्या खेळाडूंचे आव्हान परतवून लावता आले नाही.

सात्विक साईराज रंकीरेड्डी - चिराग शेट्टी या दुहेरीतील जोडीकडून मोठ्या अपेक्षा होत्या. पण मुहम्मद फिकरी - बगार मौलाना या जोडीने सात्विक - चिराग या भारतीय जोडीवर २४-२२, २२-२४, २१-१९ अशी तीन गेममध्ये मात केली. भारतीय जोडीचा एक तास व सतरा मिनिटांमध्ये पराभव झाला.

### महत्त्वाच्या लढतीत लक्ष्यची हार

**इंडोनेशियाने १-१ अशी बरोबरी केल्यानंतर लक्ष्य सेनवर भारताची मदार होती. परतीच्या एकेरीच्या लढतीत त्याच्याकडून भारताला विजय हवा होता. पण जॉनाथन ख्रिस्तीने लक्ष्यवर २१-१८, १६-२१, २१-१७ अशी मात केली. लक्ष्यला एक तास व पंधरा मिनिटांत हार पत्करावी लागली. इंडोनेशियाने २-१ अशी आघाडी मिळवली. ध्रुव कपिला - साई प्रतीक या जोडीला दुहेरीच्या लढतीत निराशेचा सामना करावा लागला. त्यामुळे इंडोनेशियाला ३-१ अशी विजयी आघाडी घेता आली.**

### अखेरच्या लढतीत श्रीकांतकडून निराशा

**दोन देशांमधील अखेरच्या लढतीत किदांबी श्रीकांतकडून निराशा झाली. पहिला गेम त्याने २१-१९ असा जिंकला. दुसऱ्या गेममध्येही त्याने चिको वारडोयो या इंडोनेशियाच्या खेळाडूला झुंज दिली. पण दबावाखाली चिको याने आपला खेळ उंचावला व २४-२२ असा हा गेम जिंकत बरोबरी साधली. चिको याने अखेरच्या गेममध्ये यश मिळवत इंडोनेशियाला चौथा विजय मिळवून दिला.**

# पाकिस्तानने आयसीसीची डेडलाईन केली मिस

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।** पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आपला १८ सदस्यांचा टी २० संघ घोषित केला. मात्र, हा टी २० वर्ल्डकपसाठीचा संघ नाही. त्यांनी इंग्लंड आणि आयर्लंडविरूद्धच्या मालिकेसाठी संघ निवडला आहे. आयसीसीने वर्ल्डकपचा संघ घोषित करण्याची शेवटची तारीख ही १ मे अशी ठेवली होती. मात्र, पाकिस्तानने अद्यापही आपला संघ घोषित केलेला नव्हता. आयसीसीच्या परवानगीशिवाय प्रत्येक देश आपल्या संघात २५ मे पर्यंत बदल करू शकतात. याच नियमाचा फायदा घेत पाकिस्तानने संघ घोषित करण्यास विलंब केला असावा.



पाकिस्तानला संघातील खेळाडूंचा फिटनेस आणि सध्याची कामगिरी याबाबत चिंता असल्याने पीसीबी टी २० वर्ल्डकपचा संघ घोषित करण्यास उशीर करत आहे. पाकिस्तान आता आपला संघ इंग्लंडविरूद्धचा पहिला टी २० सामना झाल्यावर घोषित करणार आहे. हा सामना २२ मे रोजी होणार आहे.

# चेन्नईसाठी आनंदाची बातमी

## ऋतुराजने केले कोहलीचे संस्थान खालसा

**। मुंबई । वृत्तसंस्था ।** चेन्नई सुपर किंग्जचा कर्णधार रुतुराज गायकवाडने बुधवारी पंजाब किंग्जविरुद्धच्या सत्रातील चौथ्या अर्धशतकानंतर रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूच्या विराट कोहलीला मागे टाकले. ऋतुराज गायकवाड याने विराट कोहलीकडून आयपीएल २०२४ ची ऑरेंज कॅप हिसकावून घेतली आहे. ऋतुराज गायकवाडने पंजाब किंग्जविरुद्ध अर्धशतक ठोकून सर्वाधिक धावांच्या बाबतीत कोहलीला मागे टाकले आहे.

ऋतुराज गायकवाडने आयपीएल २०२४ मध्ये बुधवारी पंजाब किंग्ज विरुद्ध ४८ चेंडूत ६२ धावा केल्या. यासह त्याने स्पर्धेतील आपल्या धावांची संख्या ५०९ वर नेली. आयपीएल २०२४ मधील सर्वाधिक धावा आहेत.

या सामन्यापूर्वी विराट कोहलीच्या नावावर सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम होता. या टी-२० लीगमध्ये विराटने १० सामन्यांमध्ये ५०० धावा केल्या आहेत. ऋतुराजने १० व्या सामन्यातही विराटला मागे सोडले. आयपीएल २०२४ मध्ये विराट कोहली आणि रुतुराज गायकवाड यांचा जवळपास सारखाच रेकॉर्ड आहे. या दोन्ही फलंदाजांनी स्पर्धेत ७० पेक्षा जास्त सरासरीने धावा केल्या आहेत. दोन्ही फलंदाज १० पैकी ३ सामन्यात अपराजित राहिले. दोघांनी प्रत्येकी एक शतक झळकावले आहे. विराटने ४ आणि ऋतुराजने ३ अर्धशतके झळकावली आहेत.

विराट कोहली (१४७.४९) देखील स्ट्राइक रेटच्या बाबतीत रुतुराज (१४६.८९) पेक्षा किंचित चांगल्या स्थितीत आहे. दरम्यान, ऑरेंज कॅपच्या या यादीत साई सुदर्शन ४१८ धावांसह तिसऱ्या स्थानावर आहे. केएल राहुल (४०६) चौथ्या आणि ऋषभ पंत (३९८) पाचव्या स्थानावर आहे. आयपीएल २०२४ च्या ४९ व्या सामन्यापर्यंत (चेन्नई विरुद्ध पंजाब) फक्त ४ फलंदाज ४०० हून अधिक धावा करू शकले आहेत.

# मुलींची क्रिकेट निवड चाचणी

**रायगड :** जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे रायगड जिल्ह्याचा १९ वर्षाखालील मुलींचा संघ निवडण्यासाठी ४ मे रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. रिलायन्स कॉलनी लोधिवली येथे ही निवड चाचणी होणार आहे. १ सप्टेंबर २००५ नंतर जन्मलेल्या रायगड जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या मुली या निवड चाचणीत सहाभगी होऊ शकतात. खेळाडूंनी शनिवार ४ मे रोजी सकाळी ८.३० वाजता क्रिकेटच्या पांढऱ्या गणवेशात लोधीवली येथील मैदानावर उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी चंद्रकांत मते ९८२२८३६४४२, प्रशांत ओक ९८२२४२२६७६ यांच्याशी संपर्क साधावा.

# तरी मी गप्प राहिले..; सानियाच्या पोस्टने वेधले लक्ष

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।** भारतीय टेनिसपटू सानिया मिर्झा आणि पाकिस्तानी क्रिकेटर शोएब मलिक यांच्या घटस्फोटाला तीन महिन्यांहून अधिक काळ उलटला आहे. मात्र, आता सानियाने शेअर केलेल्या एका पोस्टमुळे पुन्हा एकदा या दोघांची चर्चा सुरू झाली आहे.



पाकिस्तानी क्रिकेटर शोएब मलिकला घटस्फोट दिल्यानंतर सानिया सोशल मीडियावरील पोस्टद्वारे अनेकदा अप्रत्यक्षपणे व्यक्त झाली आहे. त्यामुळे तिने लिहिलेली पोस्ट ही शोएब आणि तिच्या आताच्या परिस्थितीबाबत असू शकते, असा अंदाज नेटकरी बांधतात. बुधवारी सानियाने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये एक पोस्ट शेअर केली होती. त्यातील मजकूर वाचल्यानंतर पुन्हा एकदा नेटकऱ्यांनी सानियाविषयी सहानुभूती व्यक्त केली आहे. सानियाची ही पोस्ट मोकळेपणे व्यक्त होण्याबद्दलची होती.

'याआधी मला कधीच इतकी बोलायची इच्छा झाली नव्हती, पण तरी मी थोडंच बोलले. माझ्या मनात खूप काही वाटलं पण तरी मी गप्प राहिले,' अशा आशयाची ही पोस्ट आहे. सानिया आणि शोएबच्या घटस्फोटाला आता जवळपास तीन महिने झाले आहेत. मात्र, सानियाच्या या पोस्टमुळे पुन्हा एकदा शोएबसोबतच्या तिच्या नात्याची चर्चा होऊ लागली आहे. सानिया आणि शोएबने २०१० मध्ये हैदराबादमध्ये लग्न केले होते. भारत आणि पाकिस्तानात या दोघांचे नाते म्हणजे चर्चेचा मोठा विषय ठरला होता. घटस्फोटानंतरही पुन्हा एकदा ही जोडी दोन्ही देशांमध्ये चर्चेत आली. दुसरीकडे शोएब आणि सना हे गेल्या तीन वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते. याविषयी पाकिस्तानी पत्रकार नईम हनिफने एका पॉडकास्टमध्ये सांगितले, ''एका टेलिव्हिजन रिॲलिटी शोदरम्यान सना आणि शोएब यांची पहिल्यांदा भेट झाली होती. या शोदरम्यान दोघांची खूप चांगली मैत्री झाली आणि हळूहळू या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर शोएब जेव्हा कधी टीव्हीवर यायचा, तेव्हा तो सनालाही सोबत आणण्याबद्दल आग्रह करायचा.''

# 'ड्रॉप इन पिच'वर भारत-पाकिस्तान सामना

**। मुंबई । वृत्तसंस्था ।** आयपीएलच्या १७ व्या हंगामाच्या समाप्तीनंतर आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. ही स्पर्धा १ ते २९ जून दरम्यान अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये खेळवली जाणार आहे. यंदा प्रथमच अमेरिकेत आयसीसी स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. यावेळी तेथे नवीन स्टेडियम बांधले जात आहे. अशा परिस्थितीत कमी वेळात खेळपट्टी तयार करण्यासाठी विशेष योजना आखण्यात आली आहे. न्यूयॉर्कमध्ये 'ड्रॉप इन पिचेस' वापरण्यात येणार आहे. या मैदानावर भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे. याशिवाय टीम इंडिया आणखी दोन सामने खेळणार आहे.



फ्लोरिडाहून 'ड्रॉप इन पिचेस' न्यूयॉर्कला आणले जात आहेत. भारताच्या तीन सामन्यांसह एकूण आठ सामने येथे खेळवले जाणार आहेत. या मैदानावर भारताचा गट फेरीतील पहिला सामना ५ जून रोजी आयर्लंडविरुद्ध होणार आहे. येथे ९ जूनला पाकिस्तानविरुद्ध तर १२ जूनला अमेरिकेविरुद्ध सामना होणार आहे. भारत गट फेरीतील शेवटचा सामना कॅनडाविरुद्ध १५ जून रोजी फ्लोरिडामध्ये खेळणार आहे.

**कशा असतात 'ड्रॉप इन पिचेस'?**

'ड्रॉप इन पिच' ही खेळपट्टी मैदान किंवा ठिकाणापासून दूर कुठेतरी बनवली जाते आणि नंतर स्टेडियममध्ये आणली जाते. त्यानंतर ती तिथे सेट केली जाते. डिसेंबरपासून फ्लोरिडामध्ये दहा 'ड्रॉप-इन पिच' म्हणजे खेळपट्ट्या बनवल्या जात होत्या. या खेळपट्ट्या ॲडलेड ओव्हल टर्फ सोल्युशन्सच्या मार्गदर्शनाखाली तयार केल्या जात आहेत, ज्याचे नेतृत्व ॲडलेड ओव्हलचे मुख्य क्युरेटर डॅमियर हॉग करत आहेत. नासाऊ स्टेडियममध्ये चार खेळपट्ट्या सेट केल्या जातील.

# १४ कोटींचा खेळाडूला दुखापत

**मुंबई :** ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वातील चेन्नई सुपर किंग्सला पंजाबविरोधात घरच्या मैदानावर पराभवाचा झटका बसला. पण या धक्क्यापेक्षा मोठा धक्का म्हणजे पुढील काही सामन्यासाठी महत्वाचे खेळाडू उपलब्ध नसतील. यामध्ये १४ कोटींच्या मॅचविनर खेळाडू दीपक चाहरचाही समावेश आहे. त्याशिवाय दोन गोलंदाज दुखापतग्रस्त आहेत. तर एक खेळाडू मायदेशी परतणार आहे. त्यामुळे चेन्नईच्या अडचणी वाढल्या आहेत. चेन्नईनं यंदाच्या हंगामात दहा सामन्यात पाच विजय मिळवले आहेत. दहा गुणांसह चेन्नईचा संघ चौथ्या क्रमांकावर आहे.

# आंद्रे रसेल बॉलीवूडमध्ये करणार पदार्पण

**। मुंबई । वृत्तसंस्था ।** आयपीएलमधील केकेआर आणि वेस्ट इंडिजचा खेळाडू आंद्रे रसेल एका बॉलिवूड गाण्यात दिसणार आहे. पलाश मुच्छलच्या गाण्यातून रसेल आपल्या भेटीला येणार आहे.

कोलकाता नाईट रायडर्स संघाचा विस्फोटक खेळाडू आंद्रे रसेल क्रिकेटच्या मैदानावर तर प्रसिध्द आहेच. पण आता तो बॉलीवूडच्या मैदानातही आपल्याला दिसणार आहे. आयपीएलमुळे रसेल सध्या भारतात आहे आणि याचदरम्यान त्याने मुंबईत एक गाणे शुट केले आहे. या गाण्यात त्याच्यासोबत प्रसिध्द अभिनेत्री अविका गोर आहे.





## पलाश मुच्छलच्या गाण्यात झळकणार

यांचे 'लडकी तू कमाल की' गाणे ९ मे रोजी रिलीज होणार आहे.

रसेल हा पलाश मुच्छलच्या म्युझिक व्हीडिओमध्ये दिसणार आहे. पलाश मुच्छल हा सुप्रसिध्द गायक, दिग्दर्शक आहे. पलाशने त्याच्या इन्स्टाग्रामवर या गाण्याचे पोस्टर रिलीज केले आहे. ज्यात आंद्रे रसेल आणि अविका गोर आहेत. तर त्याआधी पोस्ट केलेल्या फोटोमध्ये फक्त आंद्रे रसेल हातात क्लॅप घेऊन बसला आहे. चाहत्यांना आता याची उत्सुकता लागली आहे.

# हार्दिक पांड्याला उपकर्णधारपद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था।** आयपीएलमध्ये खराब कामिगिरी करणाऱ्या हार्दिक पांड्यावर बीसीसीआयने विश्वास दाखवला आहे. हार्दिक पांड्याला टी विश्वचषकाच्या संघात स्थान देण्यात आले आहे. बीसीसीआयच्या या निर्णयामुळे क्रिकेट रसिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. हार्दिक पांड्याकडे उपकर्णधारपदही दिले, त्यावरुनतर आता टीकांचा जोर वाढला आहे.



पांड्याबाबत घेतलेल्या या निर्णयाबाबत अजित आगरकर आणि रोहित शर्मा यांनी स्पष्टीकरण दिले आहे. हार्दिक पांड्यामुळे संघ संतुलित होतो. फक्त उपकर्णधारपदाचा विषय नाही. खेळाडू म्हणून हार्दिक पांड्याच्या जागी दुसरा खेळाडू निवडणे कठीण आहे, असे अजित आगरकर यांनी सांगितले. उपकर्णधारपदाबद्दल कोणतीही चर्चा झालेली नाही. हार्दिक पांड्याने क्रिकेटपटू म्हणून काय केले, हे सर्वांना माहिती आहे. खेळाडू म्हणून त्याला बदलणे कठीण आहे. हार्दिक पांड्यामुळे कर्णधारालाही बरेच पर्याय उपलब्ध होत आहे. तो आतंरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दीर्घ विश्रांतीनंतर परत येत आहे.

आयपीएल २०२४ मध्ये हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सकडून खेळत आहे. तो संघाचा उपकर्णधारही आहे. पण हार्दिक पांड्याला अद्याप फलंदाजी आणि गोलंदाजीमध्ये प्रभावी कामगिरी करता आलेली नाही. हार्दिक पांड्याला नऊ सामन्यात १९७ धावा करता आल्या. त्याशिवाय गोलंदाजीत फक्त चार विकेट घेता आल्या. गोलंदाजीमध्ये धावाही रोखता आलेल्या नाहीत. हार्दिक पांड्याआधी रोहित शर्मा मुंबईच्या संघाचा कर्णधार होता. पण यंदा ही जबाबदारी हार्दिक पांड्याकडे सोपवण्यात आली. पांड्याला त्यामुळेही ट्रोलर्सचा सामना करावा लागला. शिवाय कामगिरीतही तो फ्लॉप गेलाय. तरीही बीसीसीआयने हार्दिक पांड्यावर विश्वास दाखवला आहे.

### पांड्याला टीम इंडियात मोठी जबाबदारी -

**हार्दिक पांड्याला विश्वचषकाच्या संघात स्थान मिळण्याची अनेक कारण आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये हार्दिक पांड्याने दमदार कामगिरी केली आहे. पांड्याचा अनुभव भारतासाठी फायद्याचा ठरेल. आयसीसी स्पर्धेमध्ये खेळण्याचा पांड्याकडे मोठा अनुभव आहे. त्याने अनेकदा मॅच विनिंग खेळी केल्या आहेत. त्यामुळेच पांड्यावर बोर्डाने विश्वास दाखवत उपकर्णधारपद सोपवल आहे.**

# आंतरराष्ट्रीय पैलवान शिवाजी चिंगळी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था । राष्ट्रकूल स्पर्धेचे पदक विजेते, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पैलवान, कुस्ती प्रशिक्षक शिवाजी निंगाप्पा चिंगळी यांचे रविवारी (ता. २१) निधन झाले. त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा.**



सांबरा येथील एका गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. बालपणापासून त्यांना कुस्तीची फारच आवड होती. गावातील महादेव व्यायाम मंडळाच्या तालमीत ते सराव करत होते. परिसरात आयोजित कुस्ती मैदानात त्यांनी अनेक कुस्त्या जिंकल्या.

कुस्तीची आवड जोपासण्यासाठीच १९७१ मध्ये बेळगाव येथील मराठा लाईट इन्फंट्रीमध्ये शिपाई म्हणून ते भरती झाले. मराठा सेंटरमध्ये नामवंत वस्तादाच्या मार्गदर्शनाखाली कुस्तीचे बारकावे आणि तंत्र आत्मसाद केले. राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक पटकावल्यानंतर त्यांची राष्ट्रकूल स्पर्धेसाठी निवड झाली.

न्यूझीलंडमध्ये १९७४ मध्ये झालेल्या राष्ट्रकूल स्पर्धेत रौप्यपदक पटकावत आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांनी चमक दाखवली. त्या पाठोपाठ इराणची राजधानी तेहरान येथे झालेल्या आशियाई स्पर्धेत कांस्य पदकाची कुस्ती अवघ्या एक गुणाने गमावली. पण, या पराभवाने निराश न होता सराव सुरूच ठेवला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत राष्ट्रीय पातळीवर १० सुवर्ण, तर सर्व्हिसीसच्या स्पर्धेत १४ सुवर्णपदके पटकावली.

पतियाळा (पंजाब) येथील क्रीडा संकुल केंद्रात कुस्ती प्रशिक्षकाचे प्रशिक्षण त्यांनी घेतले. त्यामुळे त्यांना आधुनिक पध्दतीचे कुस्तीचे धडे मिळाले. बेळगाव सेंटरमधील पैलवानांना ते कुस्तीचे प्रशिक्षण देत होते. दिल्लीतील आशियाई कुस्ती स्पर्धेसाठी कुस्ती प्रशिक्षक म्हणून त्यांची निवड झाली होती. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून त्यांनी सेवा बजावली. सध्या ते बेळगावच्या दर्गा तालमीत वस्ताद म्हणून सेवा बजावत होते. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)